म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०८२
9540

# एकच प्याला

## विवेचक रसास्वाद

रामचंद्र शंकर वाळिंबे ★

REFBK-0009300

नाटककार गडकरी...४

७४८८४
९५।३।६९
२०७२

# एकच प्याला

## विवेचक रसास्वाद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७४८८४ वि: निबंध
क्रमांक २०७२ नों: दि: ९५।३।६९

लेखक

डॉ. रामचंद्र शंकर वाळिंबे,
एम्. ए., पीएच्. डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३००

REFBK-0009300

१५ मे १९५७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

किंमत तीन रुपये

मुद्रक :

**प्र. भा. काळे**
प्रतिभा मुद्रणालय;
सदाशिव पेठ, टिळकरस्ता;
पुणें २.

आवृत्ति पहिली—मे १९५७

प्रकाशक :

**दे. श्री. जोशी,**
**म. द. लोखंडे,**
मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन
सदाशिव पेठ, टिळकरस्ता, पुणें २.

1425

# प्रास्ताविक

'नाटककार गडकरी' या माझ्या ग्रंथांतील 'एकच प्याला' हें चवथें प्रकरण विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी जसेंच्या तसें स्वतंत्र पुस्तकाच्या रूपाने छापलें आहे.

सुरवातीला विस्तृत अनुक्रमणिका दिली असून शेवटीं संदर्भ-ग्रंथांची व नियतकालिकांतील लेखांची सूची दिली आहे.

१५ मे १९५७ रा. शं. वाळिंबे

# अनुक्रमणिका

पहिला प्रयोग १; 'एकच प्याल्या'चा पूर्वेतिहास १; 'एकच प्याल्या'ची रचना ३; रचनेचा स्वैरपणा १३; 'एकच प्याल्या'चा विषय १४; भवितव्यतेची छाया १८; सुधाकराच्या स्वभावांतील मर्मस्थानें २०; आत्यंतिक मनोवृत्तीच्या प्रभावाला अवसर २२; कोर्टांतील विचित्र घटना २३; अपमानाच्या असह्य जाचण्या २४; दारूच्या मोहाचा पहिला क्षण २५; करुणनाटयाचें बीज २५; या बीजाचा विस्तार झाला नाही. २६; सुधाकराचा दुबळेपणा २९; संघर्षाचा अभाव ३०; आत्यंतिक मनोवृत्तीमुळे अधःपात ३१; सिंधूची असमर्थता ३२; रामलालची निष्क्रियता ३३; बेताल अनर्थाचा कळस ३५; सिंधूच्या यातनांच्या दर्शनाने पश्चात्ताप ३७; सुधाकराच्या पश्चात्तापाची मीमांसा ३७; हरपलें श्रेय पुन्हा मिळविण्याची तळमळ ४४; भितरा ओशाळेपणा ४५; गतपातकांचीं पिशाचें ४७; पाजी संभावितपणाचें दर्शन ४८; हें स्थित्यंतर असंभाव्य नाही! ५०; बंडगार्डनवरील प्रवेशाचें कार्य ५१; निर्वाणीच्या निराशेंतील वैताग ५२; मदिरेच्या अपार सामर्थ्याचा महिमा ५४; वैयक्तिक अनुभूतींतून झालेला भावनोद्रेक ५५; मृत्यूची अनावर ओढ ५८; निर्वाणीच्या निराशेंत स्फुरलेलें काव्य ५९; दुर्दैवी जीवनाचें भीषण भरतवाक्य ६१; निर्वाणीच्या निराशेंतील व्यक्तित्वाचा आविष्कार ६२; सिंधूची घराशीं झालेली एकरूपता ६३; सुधाकराभोवतीं घुटमळणारें मन ६४; भावी अनर्थाच्या कल्पनेने आलेली खिन्नता ६४; सिंधूची दुबळी निष्क्रियता ६६; सिंधूच्या स्वभावाचा अपरिहार्य परिपाक ६८; सिंधूच्या निर्णयाची मीमांसा ६९; दुबळेपणांतून निर्माण झालेला कठोरपणा २७; सिंधूच्या यातनांचा प्रभाव ७३; तिचा भीषण अंत ७४; सिंधूच्या स्वभावाचा अपरिहार्य परिपाक ७५; रामलालच्या भूमिकेचें मर्म ७६; दुबळया मनाची मोहवशता ७८; रामलालचें आत्माविष्करण ८०; सामाजिक जीवनांतील विसंगति ८१; सामाजिक सुधारणेंतील आत्मवंचना ८१; रामलालच्या भूमिकेचीं दोन कार्यें ८२; रचनेंतील शिथिलता ८३; भगीरथाच्या उपाख्यानामागील भूमिका ८४; भगीरथाचा अलौकिक त्याग ८६; रचनेंतील वगुण्य ८९; जगनिंदक तळिरामाच्या भूमिकेचें मर्म ९२; आर्यमदिरामंडळाची कामगिरी ९६; गद्यशैलीचें सोज्वळ रूप ९९; अनुप्रासाच्या हव्यासाची सौम्यता १०२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ५४८८४ दि: १०-१०-७५
क्रमांक २०४२ नों: दि: १५/३/८७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३००

## नाटककार गडकरी

# एकच प्याला *

### पहिला प्रयोग

'एकच प्याला' या नाटकाचा पहिला प्रयोग गंधर्व नाटक मंडळीने मुंबई येथे ग्रँटरोड न्यू एल्फिन्स्टन थिएटरमध्ये शनिवार ता. २९ मार्च १९१९ रोजीं करून दाखविला. हा पहिला जाहीर प्रयोग होय. तथापि १९१९ च्या फेब्रुवारी महिन्यांत केव्हा तरी बडोद्याचे सयाजीराव महाराज गायकवाड यांच्यासाठी 'एकच प्याल्या'चा खाजगी प्रयोग बडोदे मुक्कामीं झाला असला पाहिजे असें ४ मार्चच्या 'केसरी' पत्रांतील उल्लेखावरून दिसतें. गायकवाड सरकारनी 'एकच प्याला' या नाटकास १००० रुपयांचें बक्षीस दिलें असा 'केसरीं'त उल्लेख आला आहे. १ फेब्रुवारीपासून २२ फेब्रुवारीपर्यंत गंधर्व मंडळीने बडोदे मुक्कामीं सात खेळ केले. परंतु बडोद्याच्या मुक्कामांत 'एकच प्याला' जाहीर रीतीने रंगभूमीवर आला नाही. गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर सुमारें सव्वादोन महिन्यांनी हें नाटक मुंबईकरांना प्रथम पहावयास मिळालें.[1]

### 'एकच प्याल्या'चा पूर्वेतिहास

१९१७ च्या नोव्हेंबरमध्येच गडकऱ्यांनी 'एकच प्याल्या'चा गद्य

---

* १९४६ च्या सप्टेंबरमध्ये 'सुधाकर कीं एकच प्याला ?' हें माझें पुस्तक प्रसिद्ध झालें. या पुस्तकांत जें प्रतिपादन मीं केलें होतें त्यांतील मुख्य विषयांचा प्रस्तुत प्रबंधांत संपूर्ण पुनर्विचार केलेला आहे.

१. श्री. वि. सि. गुर्जर यांची प्रस्तावना असलेली 'एकच प्याला' या नाटकाची पहिली आवृत्ति १९१९ जूनच्या शेवटच्या आठवड्यांत प्रसिद्ध झाली. २४ जून १९१९च्या 'केसरीं'त पहिली जाहिरात आली आहे.

भाग लिहून पुरा केला असें श्री. वि. सि. गुर्जर पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत म्हणतात. हें नाटक गंधर्व कंपनीला वाचून दाखविण्यासाठी १९१७ च्या डिसेंबर महिन्यांत गडकरी कंपनींत येऊन राहिले होते, अशीहि गुर्जरांची साक्ष आहे.[२] १९१७ सालींच गडकऱ्यांनी 'एकच प्याल्या'चें लेखन संपविलें असें श्री. वि. स. खांडेकरहि म्हणतात.[३] श्री. गोविंदराव टेंबे यांच्या शिवराज संगीत मंडळीला गडकऱ्यांनी 'एकच प्याला' देण्याचें कबूल केलें होतें असें खुद्द गोविंदरावांनी दिलेल्या आठवणीवरून दिसतें. श्री. टेंबे म्हणतात— "पण त्यांचें एखादें नवें नाटक पाहिजे होतें. म्हणून मीं नवें नाटक लिहिण्यास त्यांना सांगितलें. त्यांनी 'एकच प्याला' हें नाटक आमच्या कंपनीकरितां देण्याचें कबूल केलें होतें व तशा मजकुराचें त्यांचें पत्रहि अद्याप माझ्याजवळ आहे. पण अनेक कारणांनीं या नाटकाचा योग जमून आला नाहीं."[४]

१९१४ च्या सुरवातीलाच 'एकच प्याल्या'चें कथानक गडकऱ्यांच्या डोक्यांत घोळत होतें असें श्री. वरेरकरांनी दिलेल्या माहितीवरून दिसतें. 'एकच प्याला' या नाटकाचें कथानक गडकऱ्यांनी सांगितलें, इतकेंच नव्हे तर बाळकृष्णपंत साठे यांनी सिंधूची भूमिका करावयाची व राजारामपंत सोहनी यांनी 'हीरो'ची भूमिका करावयाची असेंहि त्यांनी ठरविलें, अशी हकिकत वरेरकरांनी दिली आहे. 'एकच प्याल्यां'तील गीतेचें नांवहि गडकऱ्यांना आपल्या मुलीच्या नांवावरूनच सुचलें असेंहि वरेरकर म्हणतात.[५] तात्पर्य, 'एकच प्याल्या'चें प्रत्यक्ष लेखन १९१७ च्या अखेरीस पुरें झालें असलें तरी १९१४ च्या मार्च महिन्यांतच त्याचें कथानक गडकऱ्यांच्या मनांत घोळत होतें असें वरेरकरांनी दिलेल्या माहितीवरून दिसतें. 'सदरहू नाटक गडकऱ्यांनीं १९१६ जुलैपासून १९१७ नोव्हेंबरपर्यंत लिहिलें' असा खांडेकरांनी 'एकच प्याल्या'च्या लेखनाचा कालहि दिला आहे.[६] १ जुलै १९१६ रोजीं 'पुण्यप्रभाव' नाटकाचा पहिला प्रयोग झाला. म्हणजे 'पुण्यप्रभाव' लिहून झाल्यावर थोडयाच दिवसांत गडकऱ्यांनी 'एकच प्याला' लिहावयास सुरवात केली असली पाहिजे असें खांडेकरांच्या साक्षीवरून दिसतें. २३ जून १९१६ रोजीं गडकऱ्यांनी 'राजसंन्यासा'च्या पांचव्या अंकाचा पांचवा प्रवेश लिहिला. हा प्रवेश त्यांनी प्रथम

२. 'गडकरी यांच्या आठवणी,' पृ. १४८
३. 'मराठीचा नाट्यसंसार,' पृ. ६०
४. 'गडकरी यांच्या आठवणी,' पृ. १४८
५. 'गडकरी यांच्या आठवणी,' पृ. १२२
'गडकरी (व्यक्ति व वाङ्मय).' द्वितीयावृत्ति, पृ. १७२

लिहिला. ७ जानेवारी १९१७ पर्यंत गडकऱ्यांनी 'राजसंन्यासा'चे एकूण सात प्रवेश लिहिले आणि हें नाटक अर्धवट सोडून दिलें. याचा अर्थ असा की, 'राजसंन्यास' आणि 'एकच प्याला' हीं दोन नाटकें गडकरी एकाच वेळीं लिहीत होते. 'राजसंन्यासा'च्या शेवटच्या प्रवेशांतील संभाजीने मृत्यूला केलेलें आवाहन, आणि 'एकच प्याल्यां'तील सुधाकराने मृत्यूला केलेलें आवाहन (अंक ४ प्र. ४), यांच्यामध्ये स्वरूपाचें जें इतकें साम्य आहे त्याचें कारण आता स्पष्ट होईल.

## 'एकच प्याल्या'ची रचना

पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत तीन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. सुधाकराचा हितकर्ता व निःसीम मित्र रामलाल वैद्यकीय अभ्यासासाठी विलायतेला निघालेला आहे. सुधाकर व सिंधू यांचा निरोप घेण्यासाठी तो येण्यापूर्वी सुधाकर त्याने केलेल्या अनेक उपकारांचा अतिशय कृतज्ञतापूर्वक सिंधूजवळ उल्लेख करतो; आणि हें करीत असतां गतायुष्यांतील आपल्या जीवनकलहाचीहि सिंधूला माहिती देतो. इतक्यांत रामलाल तेथे येतो. सुधाकराच्या स्वभावांतील मुरलेल्या वैशिष्ट्यांची तो सिंधूला विलायतेला जाण्यापूर्वी तपशीलवार माहिती करून देतो. सुधाकराच्या अलौकिक बुद्धिमत्तेची तारीफ करून त्याच्या उग्र मानीपणाला कसें जपावयास पाहिजे हेंहि तो सिंधूला समजावून सांगतो.

याच प्रवेशांत नाट्यवस्तूच्या पर्यवसानासंबंधीं एक स्पष्ट सूचना नाटककाराने देऊन ठेवली आहे. (या नाटकाचें पर्यवसान भीषण होणार असून लहानसा पेला त्या पर्यवसानाला कारण होणार आहे हें या सूचनेच्या द्वारें नाटककाराने स्पष्ट केलें आहे. "सर्वासकट वाहून जायची तयारी" या सिंधूने अभावितपणें उच्चारलेल्या वाक्यांतहि नाटकाच्या पर्यवसानाची सूचना अंतर्भूत झाली आहे.) "यापुढें मला वकिलीची सनद सोडून देऊन एवढाच उद्योग करीत बसावं लागणार" या सुधाकराच्या थट्टेतील उद्‌गारांतहि नाटकांतील मध्यवर्ती घटनेचें दिग्दर्शन झालें आहे.

---

७. "सर्वांचं सर्वतोपरी रक्षण करण्याची जबाबदारी सर्वसमर्थ परमेश्वरावर आहे. सिंधू, तो अनुकूल असला म्हणजे हजारों कोसांवरच्या खवळलेल्या महासागरांत सुद्धां तुझ्या प्रयत्नांवांचून रामलाल सुरक्षित राहील आणि प्रभूची कृपा कुठं फिरली म्हणजे तुझ्या डोळ्यांदेखत, इथल्या इथं, तुझे आटोकाट प्रयत्न चालू असतां, महासागर नको, तलावसुद्धां नको, तो अतर्क्य सामर्थ्यवान् प्रभु मला एखाद्या लहानशा पेल्यांतसुद्धां बुडवून टाकील."

(नाटकांतील महत्त्वाच्या घटनांच्या विकासाची आणखी एक मार्मिक सूचना या प्रवेशांत आढळेल. इंग्रजींतील 'ड्रॅमॅटिक आयूरनी' सारखी किंवा संस्कृत नाट्यशास्त्रांतील 'पताकास्थानका' सारखी ही सूचना आहे. "तो अतर्क्य सामर्थ्यवान् प्रभु मला एखाद्या लहानशा पेल्यांतसुद्धां बुडवून टाकील" हें सुधाकराचें वाक्य पुरें होतें न होतें तोंच तळिराम येतो. दारूच्या ज्या पेल्यामुळे सुधाकराने आत्मघात करून घेतला तो पेला प्रथम तळिरामच कौशल्याने सुधाकराला पाजतो, हें लक्षांत घेतल्याबरोबर या पताकास्थानकाचें महत्त्व पटेल.)

सिंधू सहासात महिन्यांची गरोदर आहे याचीहि सूचना सुधाकराच्या तोंडून नाटककाराने या प्रवेशांत देऊन ठेवली आहे.

पहिल्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशाच्या सुरवातीलाच सिंधूचा भाऊ पद्माकर तिला माहेरी घेऊन जाण्यासाठी आला आहे. माहेरीं जावयाचें आहे तरी सुद्धा सिंधूचें मन तयार होत नाही. सिंधूच्या बरोबर शरदनेहि जावें असें ठरतें.(सिंधू माहेरीं जाण्यासाठी निघाली असतां तिच्या मनाचें समाधान करण्यासाठी सुधाकर म्हणतो—"सिंधू, या जगांत तुझ्याखेरीज अशी एकहि गोष्ट नाहीं कीं, जिचा म्हणून या सुधाकराला मोह पडेल." सिंधूच्या पश्चात् अगदी थोड्या काळांतच सुधाकराचा हा आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेला उद्‌गार सपशेल खोटा ठरावयाचा आहे.)

अंक १ प्र. ४ मध्ये कोर्टांत मुन्सफांना अद्वातद्वा बोलल्यामुळे सुधाकराची सनद सहा महिन्यांपुरती रद्द झाली, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आपल्याला तळिरामाकडून समजते. सुधाकराच्या अधःपाताला या क्षणापासून सुरवात झाली आहे.

अंक १ प्र. ५ मध्ये तळिरामाच्या सूचनेवरून सुधाकर प्रथमच दारूचा पेला तोंडाला लावतो. आदल्या दिवशीं कोर्टांत झालेल्या भयंकर अवहेलनेमुळे सुधाकराच्या मनाला दारुण वेदना होत असतांनाच तळिराम तेथे येतो. झालेल्या असह्य दुःखाचा थोडा तरी विसर पडावा म्हणून सुधाकर तळमळत आहे. त्याच्या या मनःस्थितीचा फायदा घेऊन तळिराम त्याला दारू पिण्याचा उपाय सुचवतो आणि 'यमयातना घडीभर तरी विसरण्यासाठीं' सुधाकर दारूशीं पहिला परिचय करून घेतो.

कोर्टांत झालेल्या विचित्र मानहानीमुळे सुधाकराचें मन अगदी बेभान झालें असतां त्याच्या मनाचें सांत्वन करून त्याला धीर देण्यासाठी एकहि जिव्हाळ्याचें माणूस या वेळीं त्याच्याजवळ असूं नये हा एक दुर्दैवी योगायोग

आहे. रामलाल विलायतेला गेलेला, आणि सिंधू बाळंतपणासाठी माहेरीं गेलेली. शरदसुद्धा सिंधूबरोबर गेलेली. घरच्या जिव्हाळ्याच्या माणसांच्या अभावीं तळिरामच सुधाकराच्या मनाला धीर देण्यासाठी हजर असावा ही भवितव्यता आहे.

पहिल्या अंकाचा शेवटचा प्रवेश घडल्यानंतर सहा महिन्यांनी दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांतील घटना घडलेल्या आहेत[८]. सिंधू माहेरीं गेली होती. तिला तार करून रामलालने तावडतोब बोलावून घेतली असें सुधाकराच्या स्वगतावरून समजतें. तसेंच अभ्यासासाठी विलायतेला गेलेला रामलाल मध्येच लढाई सुरू झाल्यामुळे परत आला आहे हेंहि सुधाकराच्या स्वगतावरून कळतें. अलीकडे रोज रात्रीं सुधाकर कोठे तरी बाहेर जातो, जेवण्यासाठीहि येत नाही, असें सिंधू रामलालला सांगते. सुधाकराची सनद रद्द झालेली आहे हें रामलालला समजलेलें असल्यामुळे सुधाकर पैशाच्या अडचणींत असावा अशी त्याला स्वाभाविकच शंका येते. त्याबरोबर शरद म्हणते—"ती अडचण मुळींच नाहीं. दादाची सनद गेली एवढं कळलं मात्र, त्या घटकेपासून वहिनींच्या वडिलांनीं, दादा नको नको म्हणून लिही, तरी मोकळ्या मुठीनं पैसे पाठवायला सुरुवात केली आहे." पैशाची कसलीहि अडचण नसून कांही तरी वेडावाकडा प्रकार आहे असें सिंधूचं मन तिला सांगत आहे. कसल्या तरी अनर्थाच्या शंकेने ती व्याकुळ झाली आहे.

सिंधू आणि शरद गेल्यावर गीता एकान्तामध्ये रामलालला सुधाकराच्या व्यसनाची हकिगत सांगते. तळिरामानेच सुधाकराला हें व्यसन लावलें हेंहि ती स्पष्टपणें सांगते. सुधाकर रोज रात्रीं बाहेर कशासाठी जातो तें अशाप्रकारें रामलालला निःसंदिग्ध रीतीने कळलें आहे.

दारूच्या मजलशींतील पांचसात लोकांचीं नावें गीता रामलालला सांगते. या लोकांपैकी भगीरथाची व रामलालची थोडीशी ओळख होती. या भगीरथाची व रामलालची अंक २ प्र. २ मध्ये रस्त्यांत भेट होते. आपल्यालाहि मंडळांत यावयाचें आहे, अशी रामलाल भगीरथाजवळ बतावणी करतो. भगीरथ त्याला मंडळांत घेऊन जाण्याचें कबूल करतो.

अंक २ प्र. ३ मध्ये सुधाकराला घेऊन येण्यासाठी[९] रामलाल भगीरथाबरोबर आर्यमदिरामंडळांत जातो. आर्यमदिरामंडळांत रामलालला अगदी

---

८. "उद्यां मुदत संपून सनद मिळायची आहे" असें सुधाकर सिंधूला सांगत आहे.

९. "माझ्या एका मित्राला, जो या शहराची केवळ शोभा त्याला—सुधाकराला—इथून परत नेण्यासाठीं म्हणून मी तुमच्याबरोबर आलों."

किळसवाणें दृश्य दिसतें. सुधाकर पूर्ण बेहोष झालेला आहे. तें दृश्य दाखवून रामलाल भगीरथाला उपदेश करतो. त्या उपदेशाचा परिणाम होऊन भगीरथ तत्काळ दारू सोडण्याचा निर्धार करतो व तळिरामाने त्याला आग्रहाने दिलेला पेला जमिनीवर फेकून देतो. रामलाल खरें म्हणजे सुधाकराला मंडळांतून घेऊन जाण्यासाठी आला होता. पण धुंद झालेल्या सुधाकराला घेऊन जाणें त्याला जमलें नसावें.

इकडे सिंधूच्या मनाची एकसारखी कालवाकालव होत आहे. सुधाकराला दारूचें व्यसन लागलें असून रोज रात्रीं तो पिण्यासाठीच बाहेर जात असतो हें अजून सिंधूला कळलेलें नाही. कांही तरी संकट आपल्यावर कोसळणार ही शंका मात्र तिच्या मनांत थैमान घालीत आहे. [10] तिचें मन असें व्याकुळ झालेलें असतांनाच रामलाल येतो. सुधाकराच्या व्यसनाची हकिकत सिंधूला कशी सांगावी हें त्यालाहि कळत नाही. परंतु केव्हा तरी सांगणें भागच आहे. "सुधाकराला दारूचं व्यसन लागलं" हे रामलालचे शब्द कानांवर पडतांच सिंधूला घेरी येते. आणि असल्या विचित्र क्षणींच भगीरथ येतो. सुधाकर दारू पिऊनच कोर्टात गेला व वाटेल तसें बोलूं लागला म्हणून मुन्सफांनी त्याची सनद कायमची रद्द करून टाकली, अशी भयंकर बातमी भगीरथ सांगतो न सांगतो तोंच झिंगलेल्या सुधाकराला घेऊन तळिराम येतो.

तिसऱ्या अंकाचा चवथा प्रवेश मोठा नाट्यपूर्ण आहे. सुधाकर व्यसनाच्या अतिरेकामुळे मनाने अगदी कमकुवत झाला आहे या गोष्टीचा तळिराम भलताच फायदा घेऊं लागला आहे. सुधाकर आता एका सामान्य कारकुनाच्या आहारीं गेला आहे. या घरांत तुमची आता काडीइतकीहि सत्ता नाही, घर रामलालचें आहे, सर्वांनी संगनमत करून पद्माकराला तार करून बोलावलें आहे, पद्माकर सारा खर्च चालवीत असल्यामुळे घरहि त्याचेंच आहे, अशा अनेक कुकल्पना मोठ्या हिकमतीने तळिराम सुधाकराच्या दुबळ्या मनांत भरवतो. विवेकशक्ति पूर्ण नष्ट झाल्यामुळे सुधाकराला त्या साऱ्या गोष्टी खऱ्या वाटतात. अशा स्थितींत सिंधू व शरद येतात. त्या दोघींच्या समोर पिण्याचा विचार सुधाकराच्या मनांत बळावला आहे. तळिराम त्याला आणखी डिवचतो. प्रत्येक क्षणाला सुधाकर अधिकच बेभान होत चालला आहे. "सिंधूच्या

१०. "वन्स, मला आपलं भलतंच स्वप्न पडायला लागलं आहे......चंद्र-सूर्यासारख्या वेळा सांगून का येत असतात? बरं व्हायचं तें जपातपानं होतं आणि वाईट मात्र झाल्यावर कळायला लागतं......एकेकांच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे जिवाला अगदीं कसा चरका असतो!" (अंक ३ प्र. १)

गळ्यांतलं मंगळसूत्र तोड !" असें तळिरामाला सांगण्याइतपत त्याची मजल जाते. रामलाल, पद्माकर व बाबासाहेब आलेले दिसतांच तो आणखी बिथरतो व अक्षरशः बेताल होतो. मेव्हण्याचा व सासऱ्याचा तो भयंकर उपमर्द करतो. रामलालवर तर त्याचा विशेषच राग. "रामलाल, आधीं तूं निघ! सिंधूशीं संगनमत करतोस माझ्या घरांत ?" असले आचरट शब्द सुधाकराच्या तोंडून बाहेर पडतांच तळिरामाला चेव येतो, आणि "तुमची सनद गेली त्यावेळीं यानं बाईसाहेबांना मिठी मारली !"[११] असली अत्यंत हलकट कल्पना सर्वांच्या समक्ष बोलून दाखविण्याइतपत त्याची मजल जाते. त्याबरोबर सुधाकर भयंकर खवळतो आणि 'थेरड्या, चलाव !' असें सासऱ्याच्या अंगावर तो खेकसतो. हा 'बेताल अनर्थ' पाहून सर्वांच्या काळजाचें पाणी पाणी होतें. सिंधूने तावडतोब या घरांतून बाहेर पडावें असा पद्माकर आग्रह धरतो. पण सिंधू तें ऐकावयास मुळीच तयार नाही. सुधाकराला सोडून एक क्षणभरहि दूर जाण्यास ती तयार नाही. "या चोरांच्या घरांतला एक पैसा देखील माझ्या घरांत आणायचा नाहीं; असं असेल तर या घरांत रहा !" असें सुधाकर सिंधूला बजावतो. याचा फायदा घेऊन सिधूने अशी शपथ घेतली पाहिजे असा तळिराम आग्रह धरतो. "शपथ घ्यायला लावा—हॅम्लेटच्या बापासारखा तुम्हांला इषारा देतों आहें ! बाईसाहेब, शपथ घ्या !" सुधाकरहि शपथेचा आग्रह धरतो आणि सिंधूहि शपथ घेते.

सिंधूने शपथ घेतल्यामुळे सर्वांचाच निरुपाय होतो. काय वाटेल तें झालें तरी सिंधू घराबाहेर पडावयास तयार होणें शक्य नाही हें त्यांना दिसत आहे. सर्वांना ती तेथून जावयास सांगते. आणि आपला विजय झाला या कल्पनेने बेहोष झालेला सुधाकर "सिंधूच्या देखत घेणार !" अशी घोषणा करून सिंधूच्या देखत पिऊं लागतो. नाट्याच्या विकासक्रमांतील हें उत्कर्षस्थान ( climax ) आहे.

सुधाकराचें व्यसन परमावधीला पोचून स्वप्नांतहि कोणाला खरा वाटणार नाही असला बेताल अनर्थ त्याच्या हातून घडल्यानंतर त्याच्या भावनाशून्य मनाला डंख मारून त्याला विचार करावयास लावणारी एक महत्त्वाची घटना चवथ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांत घडली आहे. घरांत दारिद्र्य परिसीमेला गेल्यामुळे व कोणाचाहि पैसा न घेण्याची शपथ घेतल्यामुळे, कागदांच्या घड्या

---

११. तळिरामाच्या या हलकट कल्पनेला वस्तुस्थितींत कसलाहि आधार नाही हें सांगण्याची जरूर नाही. तथापि योगायोग असा की, पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत सुधाकर अभावितपणें ही कल्पना बोलून दाखवितो. "मानलेला का होईना, पण तिचा भाऊ शोभतोस खरा ! सिंधूताई, आतां तूं दादाच्या गळ्याला मिठी मार !"

त्याची वृत्ति अशी बदललेली दिसतांच शरद फार खिन्न होते. त्याच्यावरचा तिचा विश्वास एका क्षणांत उडून जातो ( अंक ४ प्र. १ ).

हा प्रसंग घडल्यानंतर रामलाल भगीरथाशीं अगदीं तुटकपणाने वागूं लागतो. आरंभीं या तुटकपणाचें नेमकें कारण भगीरथाच्या लक्षांत येत नाही. पण मत्सरामुळे हा तुटकपणा उत्पन्न झाला आहे[१३]. रामलालने भगीरथावर जे उपकार केले आहेत त्यांमुळे त्याच्या मनांत रामलालविषयीं अत्यंत उत्कट कृतज्ञताबुद्धि आहे. या कृतज्ञतेमुळे भगीरथ एक विलक्षण त्याग करावयास तयार झाला आहे. शरदने भगीरथावरील प्रेम मारून टाकून रामलालशीं विवाहाला तयार झालें पाहिजे अशी ही त्यागाची कल्पना आहे. शक्य त्या उपायाने शरदचें मन या त्यागासाठी तयार करण्याची भगीरथाची धडपड चालली आहे ( अंक ५ प्र. १ ). रामलालच्या सुखासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास भगीरथ तयार झाला आहे. कर्तव्यासाठी स्वतःच्या परमसुखाचा त्याग करण्याची जी कल्पना यापूर्वी गडकऱ्यांनी ' पुण्यप्रभावां 'त व ' राजसंन्यासां 'त मांडली होती तीच कल्पना त्यांनी पुन्हा ' एकच प्याल्यां 'त भगीरथाच्या द्वारें मांडली आहे, आणि ' भावबंधन ' या शेवटच्या नाटकांतहि मालती व लतिका यांच्या द्वारें या कल्पनेचा त्यांनी आणखी एकदा आविष्कार केला आहे.

रामलाल व शरद, आणि रामलाल, शरद व भगीरथ यांच्या या दोन उपाख्यानांचा ( अथवा एकाच उपाख्यानांतील दोन भागांचा ) हा असा अन्वयार्थ आहे. हें उपाख्यान रचण्याचें आणखी एक कारण असूं शकेल. सुधाकराच्या व्यसनी आयुष्यांतील तीनहि अवस्थांचें आविष्करण आहे या स्थितींत बरेंचसें संक्षिप्त आहे. या तोकड्या कथानकाला थोडीफार जोड मिळावी याहि हेतूने गडकऱ्यांनी रामलाल, भगीरथ व शरद यांच्या उपाख्यानाची रचना केली असेल. १९२८ च्या पांचव्या आवृत्तीचीं एकूण पृष्ठें १२८ आहेत. या १२८ पृष्ठांपैकीं २१ पृष्ठें या उपाख्यानाने व्यापलीं आहेत. म्हणजे एकूण पृष्ठांपैकी सहावा हिस्सा या उपाख्यानाला मिळाला आहे. पण रामलाल, भगीरथ व शरद यांच्या या उपाख्यानाखेरीज आणखीहि एक उपाख्यान 'एकच प्याल्या'-मध्ये आहे. हें उपाख्यान तळिरामाच्या आर्यमदिरामंडळाचें आहे. या दुसऱ्या उपाख्यानाने पहिल्यापेक्षा पुष्कळच अधिक भाग व्यापला आहे. एकूण १२८ पृष्ठांपैकीं सुमारें ३५ पृष्ठें तळिराम व आर्यमदिरामंडळाचे दारूबाज सभासद यांच्या इब्लिस कोटयांनी व विनोदाने व्यापलीं आहेत. एकूण पृष्ठांच्या संख्येपैकी

१३. " हा रोगांतला रोग मनाला मारणारा, जिवाला जाळणारा, हा मत्सर आहे ! प्रेमाच्या स्पर्धेत निराश झालेल्या दीन जीवाचा हा निर्वाणीचा मत्सर आहे ! "

शेंकडा २६ पृष्ठें गडकऱ्यांनी आर्यमदिरामंडळाला बहाल केलीं आहेत. या दोन उपाख्यानांच्या पृष्ठांची बेरीज ५५ भरते. १२८ पृष्ठांपैकीं ५५ पृष्ठें, म्हणजे ४२ टक्के पृष्ठें अशाप्रकारें उपाख्यानांना देणें म्हणजे नाट्यरचनेंतील प्रमाणबद्धतेची हानि करणें होय, असा आक्षेप कोणीहि घेऊं शकेल. सामाजिक विसंगति व मानवी स्वभावांतील विसंगति, यांचा मार्मिक उपहास आर्यमदिरामंडळाच्या प्रवेशांत दिसून येतो हें कबूल केलें तरी रचनेच्या दृष्टीने त्यांच्यामुळे जें वैगुण्य उत्पन्न झालें आहे त्याचाहि उल्लेख करणें जरूर आहे.

सुधाकराच्या मनांत मृत्यूचे विचार अत्यंत तीव्रतेने येऊं लागले असतांना ( अंक ४ प्र. ४) तळिरामहि आसन्नमरण झालेला आहे. त्याचप्रमाणें सुधाकराचा मृत्यु व तळिरामाचा मृत्यु यांच्यामध्ये काळाचें फारच थोडें अंतर आहे.

## रचनेचा स्वैरपणा

रचनेच्या बाबतींत गडकरी किती स्वच्छंदीपणाने वागतात याचें प्रत्यंतर या नाटकांत भरपूर मिळेल. पहिल्या अंकांत एकुण पांच प्रवेश आहेत. यांच्यापैकी दुसरा व चवथा हे दोन प्रवेश विनोदाला वाहिलेले असून त्यांनी अंकाचा जवळजवळ निम्मा भाग अडविला आहे. साधारणपणें एकाआड विनोदी प्रवेश घालावेत असा गडकऱ्यांचा बेत दिसत आहे. दोन गंभीर प्रवेश व लगेच एक विनोदी प्रवेश असाच आराखडा गडकऱ्यांच्या डोळ्यांपुढे असला पाहिजे.[१४] अंक ४ प्र. ४ या प्रवेशाचा जवळजवळ निम्मा भाग पूर्ण विनोदी असून राहिलेला निम्मा भाग अगदी गंभीर आहे. याहीपेक्षा एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी की, अंक ४ प्र. ५ च्या शेवटीं सुधाकर आपल्या मुलाला ठार मारतो व सिंधूला जखमी करतो, ही विलक्षण घटना घडल्यानंतर अंक ५ प्र. १ हा भगीरथ व शरद यांचा प्रवेश आहे; लगेच अंक ५ प्र. १ हा आर्यमदिरामंडळाचा प्रवेश आहे; अंक ५ प्र. ३ हा रामलाल, भगीरथ व शरद यांचा प्रवेश आहे. सुधाकराचें मूल मेल्यानंतर व सिंधूला भयंकर जखम झाल्यानंतर पद्माकर ताबडतोब फौजदाराला बोलावून आणतो अशी घटनाच स्वाभाविक दिसली असती. परंतु पद्माकर फौजदारांना बोलावून आणतो ही गोष्ट मध्यंतरीं तीन मोठे प्रवेश झाल्यावर अंक ५ प्र. ४ मध्ये घडते. मुलाचा मृत्यु व सिंधूची जखम या गोष्टींनंतर उपाख्यानांचे सबंध तीन प्रवेश ( पांचव्या

---

१४. विनोदी प्रवेशांचा क्रम—

अंक १—प्र. २, ४; अंक २—प्र. ३; अंक ३—प्र. २; अंक ४—प्र. ४; अंक ५—प्र. २.

अंकाच्या एकूण २७ पृष्ठांपैकीं तब्बल १९ पृष्ठें या तीन प्रवेशांनी व्यापिलीं आहेत.) येण्यामुळे नाटकाच्या कथानकांतील एका अत्यंत महत्त्वाच्या घटनेचा विकास थांबून राहिला आहे हें गडकऱ्यांच्या ध्यानांत आलें नसेल असें नाही. पण रचनेच्या स्वैरपणाचा मोह त्यांना आवरला नसावा.

## ' एकच प्याल्या 'चा विषय

' एकच प्याल्या 'चा प्रतिपाद्य विषय कोणता या प्रश्नाचें विस्तृत विवेचन मीं १९४६ सालीं केलें होतें.[१५] दहा वर्षांपूर्वी केलेल्या या विवेचनांतील मुख्य मुद्दे येथे देतों.

( १ ) सुधाकराच्या आंतरिक दोषामुळे त्याचा नाश झाला हें खरें नसून दारूचें व्यसन या बाह्य साधनामुळे त्याचा नाश झाला.

( २ ) सुधाकर व्यसनाच्या पकडींत सापडून असहाय झाला आहे. दारूमुळे त्याची विवेकशक्ति नष्ट झाली आहे. तो जे अनाचार करतो ते सारे दारूच्या धुंदींतच करतो, सावध असतांना करीत नाही, हें लक्षांत घेतलें असतां त्याचा नाश त्याच्या स्वभावांतील कांही दोषामुळे अथवा कमकुवतपणामुळे होतो हें खरें नसून केवळ दारूमुळेच त्याचा नाश होतो हेंच सत्य होय.

( ३ ) एका गुणशाली व कर्तबगार पुरुषाची शोककथा दाखविणें एवढाच गडकऱ्यांचा उद्देश दिसत नाही. दारूचे दुष्परिणाम दाखविणें हा सुद्धा त्यांचा हेतु खास आहे. किंबहुना हा दुसरा हेतूच त्यांच्या मनांत प्राभुख्याने असावा हें सिद्ध करणारे अनेक निःसंदिग्ध पुरावे नाटकांत उपलब्ध आहेत.

( ४ ) कांही स्पष्ट हेतु मनांत धरूनच गडकऱ्यांनी हें नाटक लिहिलें आहे. दारूचे दुष्परिणाम दाखविणें हाच गडकऱ्यांचा प्रधान हेतु आहे. तो हेतु सफल करण्यासाठीच सुधाकरासारखा बुद्धिमान आणि कर्तबगार मनुष्य दारूचें भक्ष्य बनतो हें दाखविणें त्यांना भाग पडलें असलें पाहिजे.

( ५ ) दारूमुळे कसलाहि सर्वगुणसंपन्न पुरुष सर्वस्वीं वाया गेलाच पाहिजे हा सिद्धान्त गडकऱ्यांच्या मनांत प्रथमपासूनच तयार असावा. हा सिद्धान्त परिणामकारक रीतीने विशद करण्यासाठी मग पात्रें व घटना यांची निर्मिति त्यांनी केली असावी.

( ६ ) दारूमुळे ज्याचा संपूर्ण नाश होतो असा मनुष्य सामान्य दाखविला तर तें परिणामकारक होणें शक्य नाही, याची खात्री असल्यामुळे सर्वगुणसंपन्न नायक निवडणें गडकऱ्यांना भागच होतें. ज्याच्या बाबतींत दारूचे

---

१५. ' सुधाकर कीं एकच प्याला ? ' ( सप्टेंबर १९४६ ), पृ. ९–१५.

दुष्परिणाम होऊं नयेत असें आपणांस वाटत असतें तोच गुणी मनुष्य दारूच्या मोहांत सापडतो व स्वत:बरोबरच निष्पाप पत्नीचा व मुलाचा नाश करून घेतो ही गोष्ट विलक्षण परिणामकारक होईल अशी खात्री असल्यामुळेच अलौकिक बुद्धिमान आणि मानी सुधाकर नाटकाचा नायक झाला आहे.

सुमारें दहा वर्षांपूर्वी केलेल्या या विवेचनाचा पुन्हा विचार करणें मला भाग पडत आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळांत या विषयाचें जें चिंतन मीं सतत करीत आलों त्या चिंतनामुळेच माझ्या पूर्वींच्या प्रतिपादनांतील कांही मुद्दे सुधारून घेणें व कांहींचा अजिबात त्याग करणें आवश्यक वाटलें तर तें मी जरूर करीन.

सुधाकराच्या स्वभावांतील दोषामुळे त्याचा नाश होतो हें खरें नसून दारूमुळेच त्याचा नाश होतो हें माझें पूर्वींचें विधान पुन्हा पारखणें जरूर आहे. दारूच्या धुंदींत सुधाकराच्या हातून जे अनाचार होतात त्यांना तो स्वतः जबाबदार नाही हें मान्य केलें तरी दारूला स्पर्श करण्याचा त्याला जो पहिला मोह होतो त्याला त्याच्या स्वभावांत मुरलेला दोषच कारणीभूत आहे. त्याची आत्यंतिक मनोवृत्तीच या गोष्टीला कारण झाली आहे. तो जितका बुद्धिमान आणि मानी आहे तितकाच आत्यंतिक मनोवृत्तीचा व तापट आहे. या आत्यंतिक मतोवृत्तीमुळेच तो कोर्टांत अद्वातद्वा बोलतो, व तिच्या पायींच अपमानाच्या जाचण्या विसरण्यासाठी तो दारूच्या मोहाला बळी पडतो. तात्पर्य मोहाला बळी पडण्यासाठी ज्या प्रकारची मनोवृत्ति लागते ती प्रवृत्ति त्याच्या स्वभावांत मूळचीच आहे.

दारूचे दुष्परिणाम दाखविण्यासाठीच गडकऱ्यांनी हें नाटक लिहिलें हें माझें पूर्वींचें विधानहि दुरुस्त करणें जरूर आहे असें मला वाटतें. सुधाकराच्या बाबतींत दारूचे भयंकर दुष्परिणाम झाले हें तर प्रत्यक्षच दिसत आहे. परंतु दारूचे दुष्परिणाम दाखविण्यासाठीच त्यांनी नाटकाची रचना केली असें म्हणतां यावयाचें नाही. यासाठी पूर्वीं माझ्या लक्षांत न आलेले कांही पुरावे येथे देतों.

भर कोर्टांत झालेल्या विलक्षण मानहानीमुळे होणाऱ्या यातनांचा थोडा वेळ तरी विसर पडावा यासाठी सुधाकर दारूच्या मोहाला बळी पडतो. भगीरथाचाहि मनोभंग झाला आहे. तारुण्याच्या सुरवातीलाच प्रेमभंग झाल्यामुळे भगीरथ संसाराला विटला आहे. आपल्या व्यथांचा विसर पडावा म्हणून तो दारू पिऊं लागतो. सुधाकराच्या व्यसनाला सुरवात होण्यापूर्वीं भगीरथाचें व्यसन किती तरी बळावलें होतें. अशा स्थितींतहि रामलालच्या उपदेशावरून

त्याचें व्यसन अगदी कायमचें सुटतें. "अलीकडे दादाची स्थिती पाहून माझी आशा सुटत चालली आहे म्हणून विचारतें, या मद्यपानाचा मोह सुटणं शक्य असतं कां?" असा शरदने प्रश्न विचारतांच भगीरथ म्हणतो—"या प्रश्नाचं अस्तिपक्षानं उत्तर देण्यासाठीं स्वतः माझंच उदाहरण देतांना... आत्मस्तुतीच्या कल्पनेचा ओशाळेपणा जास्त वाटतो." (अंक ३ प्र. ३) मनुष्य किती कां गुणी असेना, तो एकदां दारूच्या मोहाला बळी पडला म्हणजे कायमचाच; दारूच्या तावडींतून त्याची कधीहि सुटका होणें शक्यच नाही हे सुधाकराचे निर्वाणीचे शब्द[१६] म्हणजे खुद्द गडकऱ्यांना मांडावयाचा सिद्धांत आहे असें म्हणतां येणार नाही. सुधाकराला स्वतःला जो अनुभव आला त्या अनुभवांतून उफाळून आलेले ते शब्द आहेत. एकदा जो दारूच्या मोहाला बळी पडला तो तिचा कायमचा गुलाम झाला, तिच्या पकडींतून तो कधीहि बाहेर पडणें शक्य नाही, हें तत्त्वज्ञान खरोखरच गडकऱ्यांना मांडावयाचें असतें तर या तत्त्वज्ञानाला पूर्ण हरताळ फासणारें भगीरथाचें चित्र त्यांनी रंगविलेंच नसतें. अट्टल दारुबाज झालेला भगीरथ उपदेशाच्या चार वाक्यांनी सुधारतो व पुन्हा दारूला शिवत देखील नाही; आणि सुधाकर मात्र कोणत्याहि उपायाने सुधारत नाही, या प्रकाराचें टीकाकारांना पुन्हा पुन्हा नवल वाटत आहे. पण यांत नवल वाटण्यासारखें कांहीहि नाही. 'प्रेमसंन्यास' नाटकांत सामाजिक सुधारणांचीं दोन परस्परविरोधी चित्रें ज्या नाट्यात्मक अलिप्ततेने गडकऱ्यांनी रंगविलीं त्याच नाट्यात्मक अलिप्ततेने त्यांनी 'एकच प्याला' नाटकांत सुधाकर आणि भगीरथ हीं दोन परस्परविरुद्ध चित्रें रंगविलीं आहेत. सुधाकर दारूच्या पाशांतून कधीच सुटत नाही, आणि व्यसनासक्त भगीरथ मात्र समजुतीचे शब्द ऐकतांच व्यसनमुक्त होऊन चांगल्या मार्गाला लागतो. म्हणजे व्यसनासक्त झालेला माणूस व्यसनांतून मुक्त होऊं शकतो हेंच गडकऱ्यांनी भगीरथाच्या द्वारें दाखविलें आहे. अशा स्थितींत दारूच्या पेचांतून मनुष्याची कधीहि सुटका व्हावयाची नाही, एकदा दारूच्या आहारीं गेलेला मनुष्य तिचा कायमचा गुलाम झाला, हाच सिद्धान्त सुधाकराच्या द्वारें मांडून दारूचे दुष्परिणाम दाखविणें हाच गडकऱ्यांचा मुख्य उद्देश होता असें म्हणतां यावयाचें नाही.

---

१६. "आतां माझी पुरी खात्री झाली आहे कीं, दारूच्या पेंचांतून मनुष्याची कधींही सुटका व्हावयाची नाहीं!......दारूची संवय सुटण्याची एकच वेळ असते आणि ती वेळ म्हणजे प्रथम दारू पिण्यापूर्वींचीच! पहिला एकच प्याला--मग तो कोणत्या कां निमित्तानं असेना--ज्यानं एकदां घेतला, तो दारूचा कायमचा गुलाम झाला!" (अंक ४ प्र. ४)

दारूच्या भयंकर दुष्परिणामाविषयीं सुधाकराने वेळोवेळीं जे अत्यंत कटु उद्‌गार काढले आहेत ते त्याच्या स्वतःच्या वैयक्तिक अनुभवांतून स्फुरलेले आहेत. गडकऱ्यांना त्यांच्या द्वारें हे सिद्धान्त सांगावयाचे होते असें मानणें योग्य होणार नाही. भगीरथाची व्यक्तिरेखा हा याचा सर्वांत महत्त्वाचा पुरावा होय.

सुधाकराच्या द्वारें दारूचे भीषण दुष्परिणाम दाखविणें हा जर गडकऱ्यांचा उद्देश नाही, तर 'एकच प्याला' लिहिण्यांत त्यांचा उद्देश तरी कोणता असावा? या प्रश्नाचें उत्तर असें की, सुधाकर अत्यंत बुद्धिवान, पराकाष्ठेचा मानी, व स्वावलंबनाने कर्तबगारीला चढलेला असला तरी तो आत्यंतिक मनोवृत्तीचा होता; या आत्यंतिक मनोवृत्तीमुळे आणीबाणीच्या प्रसंगीं मनाचा तोल राखणें त्याला अशक्य होतें; त्याच्या स्वभावांतच मुरलेल्या या वैगुण्यामुळे कोर्टा-मध्ये त्याचा तोल सुटतो व तो अद्वातद्वा बोलतो; यामुळे त्याची सनद रद्द होते व विलक्षण हेटाळणी सहन करण्याची पाळी त्याच्यावर येते. संकटाला धीराने तोंड देण्याइतपत मनाचा कणखरपणा नसल्यामुळे, मन कमकुवत असल्यामुळे, ज्या आत्यंतिक मनोवृत्तीच्या प्रभावाने तो कोर्टांत अद्वातद्वा बोलतो त्याच आत्यंतिक मनोवृत्तीच्या प्रेरणेने अत्यंत थोडया वेळांत तो दारूच्या मोहाला बळी पडतो; व या मनोवृत्तीमुळेच दारूच्या व्यसनांतून त्याची सुटका होणें अशक्य होऊन बसतें. 'सुधाकराचा नाश हा त्याच्या स्वतःच्या स्वभावांतील कांहीं दोषामुळें अथवा कमकुवतपणामुळेच होतो हें खरें नसून केवळ दारूमुळेच त्याचा नाश होतो हेंच सत्य होय!"[१७] या माझ्या पूर्वीच्या विधानाला मुरड घालणें मला जरूर वाटतें. व्यसनासक्त झाल्यानंतर सुधाकराने दारूच्या धुंदींत अनेक अनाचार केले हें खरें असलें तरी दारूचा त्याला जो मोह झाला तो त्याच्या स्वभावांतील कमकुवतपणामुळेच, त्याच्या आत्यंतिक मनोवृत्तीमुळेच, हें मान्य केलें पाहिजे. आत्यंतिक मनोवृत्तीमुळेच तो दारूच्या मोहाला बळी पडला, आणि या मोहाला कारण झालेली कोर्टांतील घटनाहि त्याच्या आत्यंतिक मनोवृत्तीमुळेच घडली. "एकच प्याल्याचा मुख्य विषय एका पाणीदार, बुद्धिवान आणि सरळ अशा पुरुषाची शोककथा-ट्रॅजेडी-हा होय या" प्रा. श्री. के. क्षीरसागरांच्या विधानाला[१८] थोडी मुरड घालून मी असें म्हणेन की, असामान्य बुद्धि प्राप्त झालेल्या, केवळ स्वावलंबनाने नांवलौकिकाला चढलेल्या, अतिशय

---

१७. 'सुधाकर कीं एकच प्याला?' (१९४६) पृ. १०

१८. 'एकच प्याला,' सातव्या आवृत्तीची प्रस्तावना, (१९४६) पृ. १२.

मानी असलेल्या सुधाकराने आत्यंतिक मनोवृत्तीमुळे केलेला प्रमाद त्याला दारूच्या मोहाला बळी पडावयास भाग पाडतो; व या आत्यंतिक मनोवृत्तीमुळे व्यसनमुक्त होणें अशक्य झाल्यामुळे त्याचा विनाश अपरिहार्य ठरता, हेंच गडकऱ्यांना दाखवावयाचें आहे. अनेक चांगल्या गुणांनी युक्त असलेल्या कर्तबगार मनुष्याचा त्याच्या आत्यंतिक मनोवृत्तीमुळे झालला नाश हाच 'एकच प्याल्या'चा प्रमुख विषय होय.

## भवितव्यतेची छाया

सुधाकराच्या भीषण अंतांत नाटकाचें पर्यवसान करावयाचें हें निश्चित करूनच गडकऱ्यांनी नाटकाची रचना केली आहे. पहिल्या अंकाच्या पहिल्याच प्रवेशांत या पर्यवसानाविषयीं अगदी स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या आहेत. "भाई, हिचं समाधान करतां करतां मला पुरेसं झालं आहे. मला वाटतं यापुढें मला वकिलीची सनद सोडून देऊन हा एवढाच उद्योग करीत बसाव लागणार!" हा सुधाकराचा उद्‌गार; "आमच्या इथं थट्टेला काळवेळ नाहीं आणि सुमारहि रहात नाहीं. एक गंगायमुना सांपडायची खोटी, सर्वांसकट वाहून जायची तयारी!" हा सिंधूचा उद्‌गार; आणि "प्रभूची कृपा एकदां फिरली म्हणजे तुझ्या डोळ्यांदेखत, इथल्या इथं, तुझे आटोकाट प्रयत्न चालू असतां, महासागर नको, तलावसुद्धां नको, तो अतर्क्य सामर्थ्यवान् प्रभु मला एखाद्या लहानशा पेल्यांतसुद्धां बुडवून टाकील" हा सुधाकराचा उद्‌गार, यांचा एकमेळाने विचार केला असतां नाटकाच्या पर्यवसानाविषयीं गडकऱ्यांनी निश्चित केलेलें धोरण स्पष्ट होतें.

सबंध नाटकावर परमेश्वरी इच्छेच्या प्रभावाची, दैवाच्या प्रभावाची, आणि जगाच्या कटुपणाची छाया पडलेली आहे. नाटकाच्या सुरवातीपासून या प्रभावाची जाणीव होऊं लागते. रामलाल विलायतेला जाणार म्हणून खिन्न झालेल्या सिंधूच्या डोळ्यांत आसवें तरारलेलीं दिसतांच सुधाकर म्हणतो— "ज्या जगांत आपण आलों आहों, तें इतकं चमत्कारिक आहे कीं, त्यांतल्या नुसत्या चांगल्या गोष्टींचीच अपेक्षा करायला निरंतर नुसत्या दुःखांत दिवस काढावे लागतील." विलायतेहून किती दिवसांनी परत येणार असा अगदी साधा प्रश्न मायेच्या पोटीं सिंधू विचारते. त्यावर कांहीहि कारण नसतां रामलाल म्हणतो—"संकल्प आणि सिद्धि यांच्यामध्यें परमेश्वराची इच्छा उभी असते. कुणाला ठाऊक दोन वर्षांनीं येईन कीं दोन महिन्यांनी येईन! इतकं होऊन कदाचित् जाणारहि नाहीं, कदाचित् येणारहि नाहीं; कदाचित् ही आपणां सर्वांची शेवटचीहि भेट असेल." सुधाकराचा संसार नाटकाच्या सुरवातीला अगदी सुखपूर्ण असल्यामुळे परमेश्वरी इच्छेच्या सामर्थ्याविषयीं व संसाराच्या

दुःखपूर्णतेविषयीं इतके कडवट उद्‌गार काढण्याचें त्याला जसें कारण नाही, तसेंच सिंधूने जिव्हाळयाने विचारलेल्या साध्या प्रश्नाचें असलें विरक्तपणाचें उत्तर देण्याचें रामलाललाहि कांहीच कारण नाही. सिंधूच्या प्रश्नाला इतकें कडु उत्तर देण्याचें कारण नाही असें सुधाकराने म्हटल्यावरोबर रामलाल म्हणतो—"मनाची भलती फसवणूक कधींहि करून घ्यावयाची नाहीं, हा माझा एक कृतसंकल्प आहे. सिंधूताई, या चंचल संसारांत असल्या कडू सत्यांची मनुष्यानं निदान तोंडओळख तरी करून ठेवलेली असावीच...ईश्वराच्या दयेनं आपल्या दुर्दैवीं तीं अनुभवानं भोगण्याचा प्रसंग आलाच तर त्यांच्या पहिल्या दर्शनानं अशा वेळीं आपण गांगरून तरी जात नाहीं." रामलाल विलायतेला जाण्यास निघाला आहे, आणि मायेचा माणसांचा तो निरोप घेण्यासाठी आला आहे. अशा वेळीं या प्रकारचे कडू उद्‌गार अत्यंत अस्थानीं आहेत हें आवर्जून सांगण्याची कांहीच जरूर नाही. परमेश्वराच्या अतर्क्य सामर्थ्याची आणि संसाराच्या दुःखपूर्णतेची जाणीव पहिल्यापासून करून द्यावी हा गडकऱ्यांचा उद्देश असल्यामुळेच रामलाल इतके कडवट उद्‌गार काढीत आहे हें उघड आहे.

हा संसार 'पापपूर्ण' असून "कधीं कधीं दुःखाचा अर्क वाटेल त्या रीतीनें कोळून प्यावा लागतो" असें भगीरथ संसाराच्या कटु अनुभवाचें स्वरूप वर्णीत आहे. आपल्या दुर्दैवाचा तो रामलालजवळ स्पष्ट उल्लेख करीत आहे. (अंक २ प्र. २). सुधाकर कोर्टातून दारू पिऊनच घरीं आल्यावर "ही परमेश्वराची कृपा आहे" असें रामलाल म्हणतो. सुधाकराच्या अतिरेकी व्यसनामुळे घरांत पूर्ण दारिद्र्य आल्यावर आपत्तींशीं झगडणारी सिंधू सतत आपल्या दुर्दैवाला दोष देत आहे. "आपलं दैव खोटं; देवाला काय वांकडं लावायचं तिथं? ......अर्ध्या डावावरून लक्ष्मी उठून गेली आणि आपल्या हातीं कवड्या राहिल्या! आपला हातगुण, त्याला कोण काय करणार?" (अंक ४ प्र. २). "चांगली शपथ घेऊन सोडणं झालं होतं, पण आपलं दैव आड आलं......म्हणतात ना, वासना तशीं फळं!......आतां सटवीच्या फेऱ्यांत सांपडून पुन्हा बाळपण लाभलं आणि दळण्याची हौस फिटली!" (अंक ४ प्र. ५) "पूर्वजन्मीं केलं तें कपाळीं उमटलं, त्याला तूं काय करणार?......आमचं संचित खोटं तिथं तुझ्याकडे काय वरं गाऱ्हाणं आणायचं!" (अंक ४ प्र. ५) "आपलीं नाशिवं अगदींच पांगळीं आहेत" (अंक ४ प्र. ५). सुधाकराच्या निर्वाणीच्या उद्‌गारांतहि दुर्दैवाचा प्रभाव जाणवतो. "दुर्दैवाचे दशावतर पहाण्याची आतां माझ्यांत ताकद नाहीं!" (अंक ४ प्र. ३). "तुम्हांला माझ्या स्वभावाची पारख झाली असें नाहीं, पण मला माझ्या दुर्दैवाची परीक्षा झाली नाहीं." (अंक ४ प्र. ४)

## सुधाकराच्या स्वभावांतील मर्मस्थानें

पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत दोन महत्त्वाच्या गोष्टी नाटककाराने साधल्या आहेत. खुद्द सुधाकराच्या तोंडून त्याच्या पूर्वचरित्रांतील कांही महत्त्वाच्या गोष्टींचा परिचय करून देणें, आणि रामलालच्या द्वारें सुधाकराच्या स्वभावांतील मार्मिक वैशिष्ट्यांची माहिती देणें, या त्या गोष्टी होत. रामलालने केलेल्या अनेक उपकारांबद्दल सुधाकर अत्यंत कृतज्ञ आहे. रामलालला तो वडिलांप्रमाणें मानीत आहे. रामलालची नुसती आठवण झाली तरी सुधाकराचें हृदय कृतज्ञतेने भरून येतें. सुधाकर आणि शरद या दोन पोरक्या भावंडांचा जीवन-कलह सुरू असतां देवच रामलालच्या रूपाने सुधाकराच्या मदतीला धावून आला. मानी स्वभावामुळे सुधाकराने शिक्षणासाठी रामलालकडून कधी मदत घेतली नाही. तथापि बालविधवा शरदला सांभाळण्याची जबाबदारी मात्र पहिल्यापासून रामलालने पत्करली, आणि या बाबतींत त्याने सुधाकराचा भार हलका केला. शिकवण्या वगैरे करून स्वावलंबनाने सुधाकराने आपलें शिक्षण यशस्वी रीतीने पुरें केलें. रामलालनेच सिंधू व सुधाकर यांच्या विवाहाच्या बाबतींत पुढाकार घेतला व हा विवाह जमवून आणला. सिंधूच्या माहेरच्या माणसांचा व रामलालचा दृढ स्नेह असल्यामुळेच हें त्याला शक्य झालें. आपल्या गतजीवनांतील या महत्त्वाच्या घटना सिंधूला सांगून सुधाकर म्हणतो—" हे सोन्याचे दिवस आज आपण पहातों आहों, याचं कारण एक, रामलालची कृपा ! "

सुधाकराच्या या आत्मकथनांत तीन महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख येऊन गेला आहे. रामलालचे सुधाकरावर व शरदवर झालेले अपरिमित उपकार, सुधाकराचा मानीपणा, आणि स्वावलंबनाने शिक्षण पूर्ण करण्याची त्याची कर्तबगारी, या त्या तीन गोष्टी होत.

सुधाकराच्या स्वभावांतील दोन वैशिष्ट्यें त्याच्या आत्मकथनांत आलीं असलीं तरी त्याच्या स्वभावाचें अतिसूक्ष्म व मार्मिक दर्शन घडविण्याचें काम रामलालने केलें आहे. सुधाकर म्हणजे ' जनसमुद्राच्या गरीब तळाशीं सांपडलेलें एक अमूल्य रत्न ' आहे; असें रत्न लाभणें हेंच फार कठिण, परंतु लाभल्यावर तें संभाळून ठेवणें त्याहूनहि अधिक कठिण आहे असें रामलाल म्हणतो. सुधाकराची बुद्धिमत्ता असामान्य कोटींतील आहे; तो " अलौकिक बुद्धिवान् " आहे. तो स्वभावतःच अतिशय ' मानी ' आहे. केवळ स्वावलंबनाने व स्वतःच्या कर्तबगारीने नांवलौकिक मिळविल्यामुळे सुधाकराचा ' मूळचा मानीपणा ' अतिशय उग्र झाला आहे. इतका की त्याच्या जवळच्या मित्रांना सुद्धा हा त्याचा मानीपणा असह्य व्हावा. तो जरी नांवलौकिकाला चढला असला तरी त्याच्या

## सुधाकराच्या स्वभावांतील मर्मस्थानें

पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत दोन महत्त्वाच्या गोष्टी नाटककाराने साधल्या आहेत. खुद्द सुधाकराच्या तोंडून त्याच्या पूर्वचरित्रांतील कांही महत्त्वाच्या गोष्टींचा परिचय करून देणें, आणि रामलालच्या द्वारें सुधाकराच्या स्वभावांतील मार्मिक वैशिष्ट्यांची माहिती देणें, या त्या गोष्टी होत. रामलालने केलेल्या अनेक उपकारांबद्दल सुधाकर अत्यंत कृतज्ञ आहे. रामलालला तो वडिलांप्रमाणें मानीत आहे. रामलालची नुसती आठवण झाली तरी सुधाकराचें हृदय कृतज्ञतेने भरून येतें. सुधाकर आणि शरद या दोन पोरक्या भावंडांचा जीवन-कलह सुरू असतां देवच रामलालच्या रूपाने सुधाकराच्या मदतीला धावून आला. मानी स्वभावामुळे सुधाकराने शिक्षणासाठी रामलालकडून कधी मदत घेतली नाहीं. तथापि बालविधवा शरदला सांभाळण्याची जबाबदारी मात्र पहिल्यापासून रामलालने पत्करली, आणि या बाबतींत त्याने सुधाकराचा भार हलका केला. शिकवण्या वगैरे करून स्वावलंबनाने सुधाकराने आपलें शिक्षण यशस्वी रीतीने पुरें केलें. रामलालनेच सिंधू व सुधाकर यांच्या विवाहाच्या बाबतींत पुढाकार घेतला व हा विवाह जमवून आणला. सिंधूच्या माहेरच्या माणसांचा व रामलालचा दृढ स्नेह असल्यामुळेच हें त्याला शक्य झालें. आपल्या गतजीवनांतील या महत्त्वाच्या घटना सिंधूला सांगून सुधाकर म्हणतो—" हे सोन्याचे दिवस आज आपण पहातों आहों, याचं कारण एक, रामलालची कृपा ! "

सुधाकराच्या या आत्मकथनांत तीन महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख येऊन गेला आहे. रामलालचे सुधाकरावर व शरदवर झालेले अपरिमित उपकार, सुधाकराचा मानीपणा, आणि स्वावलंबनाने शिक्षण पूर्ण करण्याची त्याची कर्तबगारी, या त्या तीन गोष्टी होत.

सुधाकराच्या स्वभावांतील दोन वैशिष्ट्यें त्याच्या आत्मकथनांत आलीं असलीं तरी त्याच्या स्वभावाचें अतिसूक्ष्म व मार्मिक दर्शन घडविण्याचें काम रामलालने केलें आहे. सुधाकर म्हणजे ' जनसमुद्राच्या गरीब तळाशीं सांपडलेलें एक अमूल्य रत्न ' आहे; असें रत्न लाभणें हेंच फार कठिण, परंतु लाभल्यावर तें संभाळून ठेवणें त्याहूनहि अधिक कठिण आहे असें रामलाल म्हणतो. सुधाकराची बुद्धिमत्ता असामान्य कोटींतील आहे; तो " अलौकिक बुद्धिवान् " आहे. तो स्वभावतःच अतिशय ' मानी ' आहे. केवळ स्वावलंबनाने व स्वतःच्या कर्तबगारीने नांवलौकिक मिळविल्यामुळे सुधाकराचा ' मूळचा मानीपणा ' अतिशय उग्र झाला आहे. इतका की त्याच्या जवळच्या मित्रांना सुद्धा हा त्याचा मानीपणा असह्य व्हावा. तो जरी नांवलौकिकाला चढला असला तरी त्याच्या

व्यवहारी आयुष्याची अजून पहिलीच अवस्था सुरू आहे. या अवस्थेंतून तो मार्गाक्रमण करीत आहे. अजून त्याच्या बुद्धिमत्तेचें खरें फळ त्याला मिळालेलें नाहीं. समव्यवसायी लोकांच्या तीव्र स्पर्धेवर मात करून व त्या स्पर्धेत यश मिळवूनच. हें फळ प्राप्त करून घेण्याची त्याची ईर्ष्या आहे. बुद्धिमत्तेच्या व कर्तबगारीच्या जोरावर सुधाकर जें यश मिळवीत आहे त्या यशाने चिडून जाऊन त्याच्या बरोबरीचे वकील त्याचा द्वेष व मत्सर करीत आहेत, इतकेंच नव्हे तर त्याचे पाय ओढण्याची ते शक्य तितकी खटपट करीत आहेत. वकिलीच्या धंद्यांत ज्यांनी अगोदरच भरपूर प्रतिष्ठा मिळविली आहे असे सीनिअर वकीलहि त्याला सहानुभूति न दाखवितां, त्याला उत्तेजन न देतां, त्याच्याकडे टाफरूनच पाहत आहेत व त्याच्या मार्गांत शक्य तेवढ्या अडचणी आणीत आहेत. सुधाकराच्या उसळत्या रक्ताचा, त्याच्या बुद्धिमत्तेचा, आणि त्याच्या विलक्षण आत्मविश्वासाचा हे प्रतिष्ठित वकील विपर्यास करीत आहेत. सुधाकर हा उर्मट आणि अहंकारी आहे असें वाटून ते त्याचा तिरस्कार करीत आहेत, इतकेंच नव्हे तर प्रसंगीं त्याचा उपमर्दहि करावयाची संधी ते दवडीत नाहीत. आपल्यापेक्षा क्षुद्र असलेल्या वकिलांना बाजूला लोटून, आपल्या बरोबरीच्या वकिलांवर मात करून, आणि पुढे असलेल्या प्रतिष्ठित व यशस्वी वकिलांवर केव्हा तरी मात करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून सुधाकर मोठ्या हिमतीने 'या वेळीं जीवनकलहाच्या गर्दीतून रस्ता काढीत आहे.'

सुधाकराच्या स्वभावांतील मार्मिक वैशिष्ट्यें अशा प्रकारें स्पष्ट करून रामलाल सिंधूला म्हणतो--"धंद्याच्या पटांगणांत त्याचं कौतुक करणारा, त्याला धीर देणारा, त्याचं समाधान करणारा, आणि रागाच्या भरांत त्याचा तोल सांभाळणारा कोणी तरी जिव्हाळ्याचा मनुष्य सध्यां त्याच्या नेहमीं जवळ असणं अवश्य आहे......सिंधू, त्याच्या अफाट बुद्धिमत्तेला पुरून उरण्याजोग्या कामगिरीमध्यें त्याला नेहमीं गुंतवून ठेव. कधीं काळीं त्याचा मनोभंग झाला तर......"

सुधाकराने स्वावलंबनाने मिळविलेला नांवलौकिक, त्याची अलौकिक बुद्धिमत्ता, अतिशय उग्र झालेला त्याचा उपजत मानीपणा, या गोष्टींचा रामलालने जसा उल्लेख केला तसाच त्याच्या रागीट स्वभावाचाहि त्याने उल्लेख केला आहे. तळिरामानेहि सुधाकराच्या तापट स्वभावाचा पुढे उल्लेख केला आहे. "दादासाहेब तुम्ही म्हणतां त्यापेक्षांही चांगले आहेत. पण त्यांचा स्वभाव फारच तापट आहे." ( अंक १ प्र. ४ ) सुधाकराच्या स्वभावाबद्दल व त्याच्या वागणुकीबद्दल समव्यवसायी लोकांत फार गैरसमज पसरले होते हें स्पष्ट दिसतें. इतरांना तो उर्मट व अहंकारी वाटत होता, आणि यामुळे ते त्याचा तिरस्कार

करीत व उपमर्द करीत हें रामलालच्याच बोलण्यावरून दिसत आहे. धंद्याच्या क्षेत्रांतील त्याचे सहकारी त्याचा द्वेष करीत व मत्सर करीत.

## आत्यंतिक मनोवृत्तीच्या प्रभावाला अवसर

याचा अर्थ असा की सुधाकर कितीहि बुद्धिवान असला तरी कमालीच्या अतिरेकाला पोचलेल्या मानीपणामुळे, व मानीपणांतून निर्माण होणाऱ्या तापट-पणामुळे, त्याच्या वागण्यांत केव्हा कशी चूक होईल तें सांगतां येऊं नये अशीच मुळी परिस्थिति आहे. हा मनुष्य अतिशय मानी व तापट असल्यामुळे याचा वाटेल तेव्हा तोल जाण्याची पूर्ण शक्यता आहे, व हा कोणाचाहि कसाहि अपमान देखील करावयाला कचरणार नाही, अशी रामलालला धास्ती वाटत आहे. आणि यामुळेच "रागाच्या ऐन भरांत त्याचा तोल सांभाळणारा कोणी तरी जिव्हाळ्याचा मनुष्य सध्यां त्याच्या नेहमीं जवळ असणं अवश्य आहे" अशी धोक्याची सूचनाहि त्याने देऊन ठेवली आहे.

सुधाकराच्या विलक्षण मानीपणाला व त्याच्या तापटपणाला त्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेवर मात करतां येईल व त्याच्या हातून भयंकर चूक होईल अशीच परिस्थिति निर्माण करणें नाटककाराला जरूर झालें आहे. प्रतिस्पर्ध्यांच्या गर्दीतून आपल्या बुद्धिमत्तेला योग्य अशा ठिकाणीं पोचण्याची सुधाकर पराकाष्ठा करीत असतांना, बरोबरीचे लोक द्वेषाने व मत्सराने त्याचे पाय ओढीत असतांना, आणि प्रतिष्ठित यशस्वी वकील त्याचा नित्य तिरस्कार व उपमर्द करीत असतांना रामलाल विलायतेला जाण्यासाठी निघाला आहे, व तो दोन वर्षें विलायतेंत राहणार आहे. सुधाकराच्या लहानपणापासून रामलाल त्याला जपत आला आहे. असा हा जिव्हाळ्याचा मित्र सुधाकर 'जीवनकलहाच्या गर्दीतून रस्ता काढीत' असतांनाच दोन वर्षें दूर विलायतेंत राहावा असा योग आला आहे.

स्वाभाविकच 'रागाच्या ऐन भरांत' सुधाकराचा तोल संभाळण्याचें, त्याचा मनोभंग झाला तर त्याचें समाधान करण्याचें, व त्याला धीर देण्याचें काम सिंधूकडे आलें आहे. परंतु सिंधू सुद्धा दूर जावी व सुधाकर एकटा रहावा अशी परिस्थिति लवकरच निर्माण होते. रामलाल विलायतेला जाण्याच्या वेळीं सिंधू निदान सहा महिन्यांची तरी गरोदर होती.[१९] तेव्हां ती पहिल्या बाळंतपणासाठी एकदोन महिन्यांतच माहेरीं जाणार हें उघड आहे. पण ती

१९. "आणखी दोनचार महिन्यांनीं एकदां मूल झालं म्हणजे त्याला काय सांगायचं तें सांग." (अंक १ प्र. १)

तावडतोब सुधाकरापासून दूर जावी अशी एक घटना घडून येते. सिंधूच्या माहेरच्या माणसांचा एका संस्थानिकाशी फार लोभाचा संबंध असतो. या संस्थानिकाची एकुलती एक मुलगी प्रथमच सासरीं जावयास निघाली असतां आपल्याबरोबर पाठराखणी म्हणून सिंधूनेच आलें पाहिजे असा ती हट्ट धरते. यामुळे नाइलाज होऊन सिंधूचा भाऊ पद्माकर तिला तावडतोब घेऊन जाण्यासाठी येतो. कां कोण जाणे, सिंधूला कसली तरी चमत्कारिक हुरहूर लागते आणि घरांतून तिचें पाऊल बाहेर पडत नाही. सिंधूबरोबर शरदहि जाते. 'शरदला न्यायलाच पाहिजे' असा आग्रह सुधाकरच धरतो. सिंधूबरोबर शरदहि कां जाते याचें स्पष्टीकरण नाटककाराने सिंधूच्या तोंडून दिलें आहे. "वन्संना एकट्यांना इथं ठेवून कसं चालेल? घरांत बायकोमाणूस कुणी नाहीं. बरं, दिवसभर कोर्टांत असावं लागणार. शिवाय भाई म्हणावा, तोही इथं नाहीं." शरदने सिंधूबरोबर जाण्यास हें कारण मुळीच पुरेसें नाही हें कोणीहि सांगेल. पण सुधाकर एकटाच राहावा अशीच तरतूद करणें जरूर वाटल्यामुळे गडकऱ्यांनी रामलालला विलायतेला पाठविला, आणि सिंधू व शरद या दोघींना सिंधूच्या माहेरीं पाठवून दिलें. सिंधू घरांतून बाहेर पडत असतां तिचें समाधान करण्यासाठी सुधाकर म्हणतो—"सिंधू, या जगांत तुझ्याखेरीज अशी एकही गोष्ट नाहीं कीं, जिचा म्हणून या सुधाकराला मोह पडेल." (अंक १ प्र. ३)

## कोर्टांतील विचित्र घटना

आणि अशा प्रकारें रामलाल, सिंधू व शरद यांच्यापैकी कोणीहि जवळ नसतां रामलाल ज्या गोष्टीला सारखा भीत हाता तीच गोष्ट नेमकी सुधाकराच्या हातून घडते. या विचित्र घटनेची पहिली हकिकत प्रथम तळिराम आर्यमदिरामंडळांतील आपल्या दारूबाज दोस्तांना तिखटमीठ लावून सांगतो. सुधाकराला अलिकडे शत्रूच फार होऊं लागले आहेत, त्याचें कोणालाहि बरें बघवत नाही, यामुळे तो अगदी चिडल्यासारखा होऊन गेला होता, अशी प्रस्तावना करून व त्याच्या अतिशय तापट स्वभावाचा उल्लेख करून तळिराम कोर्टांत घडलेली घटना रसभरित करून सांगतो. झाल्या प्रकारांत मुन्सफांची मुळीच चूक नव्हती असें तो सुरवातीलाच स्पष्ट करतो. कोणत्या तरी कायद्याच्या मुद्द्यावर सुधाकराचा व मुन्सफांचा खटका उडाला. आपलें म्हणणें नीटपणें मुन्सफांना समजावून देण्याचा प्रयत्नहि न करतां सुधाकर तापटपणाने बोलूं लागला. कोर्टांतील माणसें प्रथमपासूनच त्याच्या वाइटावर. तीं ही संधी कशी सोडणार? माणसें हसूं लागलेलीं पाहतांच सुधाकर भडकला, त्याचा तोल सुटला, आणि मुन्सफांना तो अद्वातद्वा बोलूं लागला. एका वकिलाने केलेल्या असल्या उपमर्दामुळे

मुन्सफहि चिडले आणि त्यांनी सहा महिन्यांपुरती सुधाकराची सनद रद्द केली.[२०] असा हा चमत्कारिक प्रकार पाहतांच सुधाकराचा मत्सर करणाऱ्या हितशत्रूंचें चांगलेंच फावलें, आणि त्यांनी सुधाकराची तोंडावर हेटाळणी करण्यास सुरवात केली. मूळचा स्वभाव अतिशय मानी असल्यामुळे व त्यांत तापटपणाची भर पडल्यामुळे भर कोर्टांत झालेल्या या भयंकर अपमानाच्या योगाने सुधाकराला मरणप्राय दुःख झालें. 'त्या बिचाऱ्याला मरणापेक्षां अपेश खोटं असं होऊन गेलं !' शेवटीं मोठ्या खटपटीने आपण त्याला घरीं पोचवलें असें तळिराम सांगतो.

## अपमानाच्या असह्य जाचण्या

अत्यंत उग्र झालेला मानीपणा व तापटपणा या वैगुण्यांमुळे सुधाकराच्या हातून कधी तरी भलतेंच वर्तन घडेल व त्याचा मनोभंग होईल अशी जी भीति रामलालला वाटत होती ती अशा प्रकारें खरी झाली आहे. हा प्रकार कोर्टाच्या बाहेर कोठेतरी घडला असता तर फार बरें झालें असतें. कारण त्याचा सुधाकराच्या वकिलीशीं संबंध आला नसता व त्याची सनदहि गेली नसती. ज्या क्षेत्रांत त्याची कर्तबगारी दिसून येत होती व प्रतिस्पर्ध्यांवर मात करून पुढे जाण्याची ईर्ष्या त्याच्या मनांत प्रबळ झालेली होती, आणि ज्या क्षेत्रांतील त्याच्या यशामुळे अनेक माणसें त्याचा द्वेष व मत्सर करीत होतीं. याच क्षेत्रांत असा विचित्र प्रकार घडल्यामुळे व सनद रद्द होण्यासारखी नामुष्की सहन करणें भाग पडल्यामुळे सुधाकराच्या अतिरेकी मानीपणाला भयंकर डंख झाला असला तर त्यांत कांहीच नवल नाही. झाल्या प्रकारानंतर पुन्हा धंद्यांत जम बसविणें फार कठीण जाईल याची जाणीव त्याला सतत वेदना देत असली पाहिजे.

'अपमानाची आपत्ति' असह्य झाल्यामुळे तो भयंकर वैतागला आहे. यावेळीं सिंधू जवळ असती तर त्याच्या दुखावलेल्या मनाला वेळींच धीर देण्याचें काम तिने केलें असतें आणि त्याच्या मनाच्या दारुण व्यथा थोड्याफार सह्य झाल्या असत्या.

---

२०. या ठिकाणीं गडकऱ्यांच्या हातून विचित्र गफलत झाली आहे. वकिलाची सनद रद्द करण्याचा मुन्सफाला अधिकार नसतो. प्रो. ना. सी. फडके व श्री. वसंत शांताराम देसाई यांनी या प्रमादाचा उल्लेख केला आहे. "पुण्याच्या कोर्टांत वकिलाची सनद मुन्सफ रद्द करूं शकतो......हें गडकऱ्यांना......कोणी सांगितलें?" असें श्री. देसाई विचारतात.— 'नट, नाटक, आणि नाटककार,' पृ. ८२.

अनुक्रम... 20842 नोंद दि १५।३।६७



पण दुर्दैवाचा योग असा की, या विलक्षण प्रसंगीं जवळ रामलाल नाही, सिंधू नाही, आणि शरदहि नाही. त्याच्या मनाच्या वेदना तळिरामाशीं बोलतांना तीव्रतेने प्रकट झाल्या आहेत. "आपत्तींची मी पर्वा करतों असं का तुला वाटतं ? मला ही अपमानाची आपत्ति सहन होत नाहीं ! हलकटांनीं हेटाळणी करावी, लब्धप्रतिष्ठितांनीं छीः थूः करावी, आपल्या वैऱ्यांनीं समाधानानें हंसावं ! तळिराम, मी कुबेराची संपत्ति लाथेनं झुगारून दिली असती, आणखी पुन्हां हातानं ओढून आणली असती; पण या अपमानाच्या जाचण्या सहन होत नाहींत." (अंक १ प्र. ५)

दोनचार दिवसांनी या प्रकाराचा विसर पडेल हें तळिरामाचें म्हणणें त्याला मुळीच पटत नाही. प्राण जाईपर्यंत अपमानाच्या या भयंकर वेदना नाहीशा होणें शक्य नाही असें त्याला वाटत आहे. आत्महत्या हा एक उपाय आहे. पण सिंधूची आठवण होतांच आत्महत्येचा विचार वितळून जातो. शिवाय आत्महत्या करणें हें नामर्दपणाचें आहे याचीहि त्याला जाणीव आहे. मग या असह्य यातनांतून मुक्त होण्याचा मार्ग तरी कोणता ? 'शरीराचा नाश केल्यावांचून मरणाची जोड देणारं एखादं विष' त्याला पाहिजे आहे. याचा अर्थ त्याला मरावयाचें नाही, पण यातनांचा ज्यायोगें विसर पडेल असें कांही तरी औषध त्याला हवें आहे.

## दारूच्या मोहाचा पहिला क्षण

"शरीराचा नाश केल्यावांचून मरणाची जोड देणारं एखादं विष नाही का ?" असा प्रश्न सुधाकराने विचारतांच तळिराम त्याला तावडतोब उपाय सुचवतो. 'तुम्ही स्वतंत्र बाण्याचे आहां !' अशी त्याची तारीफ करून मोठ्या कौशल्याने तो सुधाकराला दारू पिण्यास प्रवृत्त करतो. "व्यसन म्हणून दारू अति भयंकर आणि निंद्य आहे हें मलाहि कबूल आहे. पण आपणांला ती केवळ औषधाकरितां प्यायची आहे. एवढीशी घेतल्यानं संवय लागेल अशी नादानपणाची धास्ती आपल्याला वाटायचं कांहीं कारण नाहीं" असें मानभावीपणाने बोलून तळिराम सुधाकराला दारू पाजतोच. हाच क्षण सुधाकराच्या अधःपाताची सुरवात करतो.

## करुणनाट्याचें बीज

पहिल्या अंकांत घडलेल्या घटनांचा विचार केला असतां करुणनाट्याचें (ट्रॅजेडीचें) बीज नाटकाच्या या पहिल्या भागांत आहे हें कबूल केलें पाहिजे. सुधाकर हा केवळ स्वावलंबनाने नांवलौकिकाला चढलेला अत्यंत बुद्धिमान व अत्यंत मानी असा नव्या रक्ताचा तरुण आहे. मानीपणा हा कांही मुळांतच

दोष आहे असें कोणीहि म्हणणार नाही. मानीपणा हा एक सद्‌गुणच आहे. परंतु सुधाकराच्या ठिकाणीं हा मानीपणा अतिशय उग्र व असह्य झालेला असल्यामुळे त्याचा तो उग्रपणा घातक बनलेला आहे. या अतिरिक्त मानीपणांत तापटपणाची भर पडलेली असल्यामुळे त्याचा घातकपणा अधिकच धोक्याचा ठरलेला आहे. ट्रॅजिक हीरो होण्यास ही सामग्री भरपूर आहे यांत मुळीच शंका नाही. परंतु घटनांची जुळणी करण्यांत गडकऱ्यांना यश आलें नसल्यामुळे त्यांच्या मनांत असलेली ट्रॅजिक हीरोची मूळची कल्पना प्रत्यक्षांत मात्र उतरली नाही हें कबूल केलें पाहिजे.

## या बीजाचा विस्तार झाला नाही.

पहिली गोष्ट अशी की, सुधाकराच्या स्वभावांतील महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचा आपल्याला परिचय होतो तो रामलालच्या कथनाच्या द्वारें. सुधाकराच्या आत्यंतिक मानीपणाचा व तापटपणाचा प्रत्यक्ष आविष्कार गडकऱ्यांनी दाखविला नाही. किंबहुना रामलालच्या तोंडूनच सुधाकराचीं सारीं वैशिष्ट्यें वदविण्याऐवजीं प्रत्यक्ष एखाद्या घटनेच्या द्वारें त्याच्या आत्यंतिक मानीपणाचा आविष्कार झाला असता तर तें किती तरी अधिक परिणामकारक झालें असतें. परंतु गडकऱ्यांनी अशा घटनेची योजना केली नाही. कोर्टामध्ये सुधाकर मुन्सफांना दुरुत्तरें करतो ही अत्यंत महत्त्वाची घटना रंगभूमीच्या बाहेर घडली असून तळिरामाच्या तोंडून ती आपल्याला समजते. कोर्टांतील ही घटना गडकऱ्यांनी प्रत्यक्ष रंगभूमीवर कां दाखविली नाही? ‘प्रेमसंन्यास’ नाटकांत कोर्टाचा देखावा त्यांनी आणला आहे. प्रत्यक्ष कोर्टाचा देखावा न दाखवितां दुसरी एखादी सदृश घटना प्रत्यक्ष दाखवून तिच्या द्वारें सुधाकराच्या स्वभावांतील सर्वांत महत्त्वाच्या वैशिष्ट्याचें प्रात्यक्षिक गडकऱ्यांना खास दाखवितां आलें असतें. शेक्सूपियरच्या अनेक ट्रॅजिक नाटकांत प्रत्यक्ष घटनांच्या द्वारें नायकाच्या स्वभावांतील महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचा आविष्कार झालेला दिसून येईल. गडकऱ्यांनी हें केलें नसल्यामुळे नाट्यात्मक परिणामांत मोठेंच वैगुण्य निर्माण झालें आहे. दुसरें असें की, कोर्टांतील घटनेची तळिरामाकडून जी माहिती आपल्याला समजली आहे तिच्यावरून असें दिसतें की, मुन्सफांच्या समोर आपला मुद्दा मांडीत असतां सुधाकराच्या ‘अलौकिक’ बुद्धिमत्तेचा व त्याच्या वाक्‌कौशल्याचा प्रभाव दिसून येण्याऐवजीं केवळ त्याच्या रागीटपणाचा व तापटपणाचाच सारा प्रभाव दिसून आला. एखादा बुद्धिवान व वादकुशल वकील आपल्या प्रतिपादनांत जें कायदेपांडित्य दाखवितो, जो हजरजबाबीपणा दाखवितो, व जी सूक्ष्मता दाखवितो, त्या कायदेपांडित्याचा, हजरजबाबीपणाचा, व सूक्ष्मतेचा

कसलाहि पुरावा सुधाकराच्या कोर्टांतील प्रतिपादनांत दिसून आला नाही. उलट, आपला मुद्दा बिनतोड सिद्ध करण्याची खटपट न करतां तो अद्वातद्वा बोलूं लागतो, व बाजू घसरलेली दिसतांच स्वतःचा तोल सावरण्याऐवजीं तो अधिकच भडकतो, आणि आपली शोभा करून घेतो. वकिलीच्या धंद्यांत आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या जोरावर नांवलौकिकाला चढलेल्या कर्तबगार वकिलाचीं हीं लक्षणें खास नव्हत. आपल्या नायकाविषयीं सहानुभूति निर्माण व्हावी अशी इच्छा मनांत बाळगून गडकऱ्यांनी कोर्टांतील घटनेची योजना केली खरी. पण त्याचा परिणाम काय झाला आहे पाहा. स्वतःच्या बुद्धिमत्तेची व वादकौशल्याची कसलीहि चमक न दाखवितां व काळवेळ न पाहतां तापटपणाने भर कोर्टांत अद्वातद्वा बोलणाऱ्या नायकाबद्दल सहानुभूति निर्माण व्हावीच कशी ! घडलेली हकिकत सांगण्याच्या वेळीं तळिरामाने चांगली गोष्ट एकहि न सांगतां केवळ सुधाकराचा तापटपणा भडक रंगांत रंगवून सांगितला असेल असा आक्षेप येण्याचा संभव आहे. गडकऱ्यांनी ही किंवा यासारखी दुसरी एखादी घटना प्रत्यक्ष रंगभूमीवर दाखविणें जरूर होतें असें जें मीं वर म्हटलें आहे तें याच कारणामुळे. नाटकाच्या पर्यवसानाचा मूळ पाया असलेल्या घटनेचा आविष्कार एका पात्राच्या तोंडून करण्याची ही योजनाच फार तऱ्हेवाईक आहे.

कोर्टांत अतिप्रसंग करून व स्वतःची सनद तात्पुरती रद्द करून घेऊन सुधाकर घरीं परत आल्यावर जेव्हा तो झाल्या प्रकाराचा स्वतःच्या मनाशीं विचार करूं लागला असेल तेव्हा आपल्या मूर्खपणाचा व बेजबाबदार वागण्याचा पश्चात्ताप होऊन तो पराकाष्ठेचा खिन्न झाला असला पाहिजे हें उघड आहे. त्याच्या स्वभावांत जो आत्यंतिक मानीपणा मुरलेला होता त्यामुळे कोर्टांतील अवहेलनेचा प्रसंग त्याला मरणापेक्षाहि दारुण वाटला असला तर त्यांत अस्वाभाविक असें कांहीच नाही. पण त्याच्या मानीपणाला खरा डंख झाला तो कोर्टांतील विचित्र प्रकाराने भोवतालच्या लोकांनी त्याची हेटाळणी करावयास सुरवात केली तेव्हा. त्याच्यापूर्वी मुन्सफांना आपला मुद्दा तो पटवून देत असतां त्याच्या मानीपणाचा प्रश्न नसून त्याच्या बुद्धिमत्तेचा व वादकुशलतेचाच प्रश्न होता. आपल्या बुद्धिमत्तेची चमक दाखवून व उच्च प्रकारचें वादकौशल्य प्रकट करून सुधाकराने मुन्सफांना आपला मुद्दा बिनतोड पटवून दिला असता तर मुन्सफांनाहि त्याला टोचून बोलण्याचा धीर झाला नसता, व आजूबाजूच्या मत्सरी लोकांना त्याची हेटाळणी करण्याची संधीच मिळाली नसती. याचा अर्थ असा की, वकील या दृष्टीने सुधाकराच्या ठायीं जी अलौकिक बुद्धिमत्ता होती ( असा रामलालने निर्वाळा दिला आहे. ) तिचा आविष्कार मुळीच न होतां केवळ त्याच्या तापटपणाचाच असला तऱ्हेवाईक

आविष्कार झाला; आणि आपली हेटाळणी करण्यास लोकांना उत्कृष्ट संधी मिळावी अशीच परिस्थिति त्याने आपल्या हाताने निर्माण केली. आपल्या अलौकिक कायदेपांडित्याने व वादकौशल्याने चांगल्या मुरलेल्या न्यायाधीशांनाहि निरुत्तर करणाऱ्या वकिलांचीं उदाहरणें जाणत्या लोकांच्या ऐकिवांत असतात. पण सुधाकराने असलें कर्तृत्व न दाखवितां तापटपणाने आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. कोर्टांतील प्रसंगांत पुरावा मिळाला आहे तो त्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा किंवा आत्यंतिक मानीपणाचा नसून केवळ त्याच्या अमर्याद तापटपणाचाच आहे.

लोक आपली हेटाळणी करीत आहेत, हें दिसल्यावर त्याचा उग्र मानीपणा उफाळून आला असणें स्वाभाविक आहे. आणि 'अपमानाच्या जाचण्या' सहन होणें अशक्य आहे याची जाणीव झाल्यामुळे तें दारुण दुःख विसरण्याचा एखादा उपाय शोधण्याची त्याने तीव्र धडपड करणें हेंहि स्वाभाविक आहे.

यावेळीं रामलाल विलायतेंत होता व सिंधू माहेरीं होती. शरदहि जवळ नव्हती. सुधाकर एकटा होता. आपला मेव्हणा किंवा सासरा यांच्यापैकीं कोणाला तरी तावडतोब बोलावून घेऊन झालेला प्रकार त्यांना सांगणें हा एक मार्ग होता. किंवा स्वतः सुधाकरहि त्यांच्या गांवीं जाऊन त्यांना भेटूं शकला असता व सर्व घटना त्यांना सांगूं शकला असता. तेथे त्याला सिंधूहि भेटली असती आणि येणेंप्रमाणें सुधाकराच्या अपमानाच्या जाचण्या थोड्याफार सह्य झाल्या असत्या, व आलेल्या अडचणींतून मार्ग काढण्याची कांही तरतूद करणें मेव्हणा व सासरा यांच्याशीं विचारविनिमय करून सुधाकराला सहज शक्य झालें असतें.

परंतु सुधाकराचा पराकोटीला पोचलेला उग्र मानीपणा व त्याचा रागीटपणा या गोष्टी आड आल्या असल्या पाहिजेत, हें उघड आहे. भर कोर्टांत झालेल्या विचित्र अपमानाची हकिकत सासऱ्याला, मेव्हण्याला (किंवा सिंधूलाहि) सांगणें हें त्याच्यासारख्या आत्यंतिक मनोवृत्तीच्या माणसाला जमणें कठिण आहे हें कबूल केलें पाहिजे. आणि यामुळेच अपमानाच्या दारुण व्यथा सोसून आंतल्या आंत जळण्याशिवाय सुधाकराला गत्यंतर उरलें नाही हें स्पष्ट आहे.

सुधाकराचा जो सार्वजनिक अपमान झाला तो फार भयंकर आहे हें खरें आहे. त्या अपमानाच्या व्यथाहि अत्यंत दारुण असल्या पाहिजेत हेंहि खरें आहे. त्या दारुण व्यथांचा विसर पडावा अशी त्याला तीव्र इच्छा झाली असली तर तेंहि स्वाभाविक आहे. परंतु याच ठिकाणीं त्याच्या मनांतील संघर्ष पराकोटीला गेलेला दाखविणें गडकऱ्यांना जमलें नाही. अत्यंत प्रतिकूल बाह्य परिस्थिति, व

मनाचा आत्यंतिक मानीपणा, यांच्या संघर्षाचें चित्र नाट्याच्या दृष्टीने फारच परिणामकारक झालें असतें. सुधाकराच्या मानीपणाला त्यायोगाने केवढा उठाव मिळाला असता! इतकेंच नव्हे तर प्रतिकूल परिस्थितीने त्याच्यावर मात केली असती तरी देखील त्या धारदार मानीपणाला अधिकच उजळा मिळाला असता.

परंतु सुधाकराच्या मानीपणाचा व स्वाभिमानाचा उत्कट आविष्कार दाखविण्याची जी उत्कृष्ट संधी आलेली होती ती गडकऱ्यांनी दवडली आणि अपमानाच्या यातना थोडा वेळ का होईना विसरण्यासाठी त्यांनी त्याला दारूचा उपाय तळिरामाकडून सांगितला. ट्रॅजिक हीरोची जी कल्पना गडकऱ्यांच्या मनांत होती व ट्रॅजिक नाटकाच्या रचनेचा जो आराखडा त्यांनी तयार केला होता, त्या दोन्ही गोष्टी त्यांच्या या नाट्यात्मक प्रमादामुळे अपेशी ठरल्या, आणि नाटकाला बाह्यतः तरी दारूच्या दुष्परिणामांच्या प्रतिपादनाचें स्वरूप प्राप्त झालें. नाट्यात्मक रचनेच्या बाबतींतील प्रमादच याला कारण आहे हें स्पष्ट आहे.

## सुधाकराचा दुबळेपणा

कोर्टांतील प्रसंग घडल्यानंतर अवघ्या चोवीस तासांच्या आंतच सुधाकर दारू पितो या गोष्टीचें मूळ त्याच्या स्वभावांतच सापडेल. आत्यंतिक मनोवृत्ति व कमालीचा तापटपणा याच गोष्टींनी त्याला दारू पिण्यास प्रवृत्त केलें. अपमानाच्या यातना धीराने सोसण्याऐवजीं त्यांचा तावडतोब विसर पडावा अशी त्याची धडपड सुरू झाली. त्याने जर थोडासा मनाचा खंबीरपणा दाखविला असता तर एकदोन दिवसांनी त्याच्या व्यथा थोड्या फार सुसह्य झाल्या असत्या. आणि मग दारूऐवजीं दुसरा एखादा उपाय शोधून काढणें त्याला जमलें असतें. अथवा प्रतिकूल परिस्थितीशीं करारीपणाने व नेटाने तोंड देऊन आपल्या व्यक्तित्वाची रगहि त्याने दाखविली असती. परंतु संकटाला तोंड देण्यासाठी आवश्यक असलेल्या धैर्याचा व सहनशीलतेचा त्याच्या ठिकाणीं पूर्ण अभाव आहे. ज्या आत्यंतिक मनोवृत्तीमुळे भर कोर्टांत तो अद्वातद्वा बोलला, त्यांच आत्यंतिक मनोवृत्तीमुळे तो अवघ्या चोवीस तासांत दारूच्या आहारीं गेला. कोर्टामध्ये मनाच्या संयमाचा जो विलक्षण अभाव त्याने दाखविला तसाच अभाव यातना सहन करण्याच्या बाबतींतहि त्याने दाखविला. मुन्सफांचें म्हणणें ऐकून न घेण्याच्या बाबतींत जो उतावीळपणा त्याने दाखविला तोच उतावीळपणा दारू पिऊन व्यथा विसरण्याच्या इच्छेच्या बाबतींतहि त्याने दाखविला. कोर्टासारख्या ठिकाणीं, आपल्या भवितव्याचा विचार न करतां, तोल सोडून बेजबाबदारपणाने वागणारा आत्यंतिक मनोवृत्तीचा मनुष्य तळिरामाकडून

दारूची सूचना येतांक्षणीं तोल सोडून वागणारच हें त्याच्या स्वभावाने ठरवून टाकलेलें आहे. " मी कांहीं अशा दुबळ्या मनाचा नाहीं, कीं मला तिची संवय लागेल " हा त्याचा उद्‌गार त्याच्या मनाचा कणखरपणा प्रकट करीत नसून स्वतःच्या दुबळेपणाची त्याला वाटणारी भीतीच तीव्रतेने प्रकट करीत आहे. आपल्या पराकाष्ठेच्या दुबळ्या मनाची त्याने ही कबुलीच दिलेली आहे. अपमानाच्या यातना असह्य झाल्यामुळे त्यांचा थोडा वेळ तरी विसर पडावा यासाठी 'शरीराचा नाश केल्यावांचून मरणाची जोड देणारं एखादं विष' शोधण्याची त्याची जी धडपड चालली आहे ती त्याच्या मनाच्या दुबळेपणाचीच साक्ष देत आहे. कोणत्याहि प्रकारचा थोडा सुद्धा प्रतिकार न करतां व कसलाहि कणखरपणा न दाखवितां त्याचें मन तळिरामाच्या सूचनेला तत्क्षणीं बळी पडतें हा त्याच्या आत्यंतिक दुबळेपणाचाच स्पष्ट पुरावा आहे.

म्हणजे तो जितका तापट आहे तितकाच दुबळाहि आहे. आतापर्यंतच्या त्याच्या वागण्यांत बुद्धिमत्तेचा किंवा मानीपणाचा जो आविष्कार झाला आहे त्यापेक्षा त्याच्या तापटपणाचा व दुबळेपणाचाच किती तरी अधिक तीव्र आविष्कार झाला आहे. कमालीच्या तापटपणामुळे कोर्टांत त्याचा तोल सुटतो, आणि कमालीच्या दुबळेपणामुळे संकटाला तोंड देण्याचा कणखरपणा दाखविण्याऐवजीं यातना विसरण्यासाठी तो दारूच्या आहारीं जातो.

सुधाकराला दारूचें व्यसन लावावयाचें असें गडकऱ्यांच्या मनांत आल्याबरोबर करुणनाट्याच्या नायकाच्या ठायीं अभिप्रेत असलेली व्यक्तित्वाची भव्यता ('ट्रॅजिक ग्रॅंजर') तत्क्षणीं लयाला गेली व सुधाकर म्हणजे दारूच्या धुंदींत बरळणारा, व बेतालपणें वागणारा, एक सामान्य व्यसनी इसम एवढेंच त्याचें स्वरूप उरलें.

## संघर्षाचा अभाव

पहिल्या अंकाच्या शेवटच्या प्रवेशांत सुधाकर तळिरामाच्या सूचनेवरून दारू पितो ही त्याच्या अधःपाताची प्रत्यक्ष सुरवात आहे. पहिला अंक एकंदर नाटकाचा पांचवा हिस्सा आहे. सुधाकराचें आनंदी विश्व पहिल्या अंकांतच संपलें आहे व त्याच्या अधःपाताला सुरवातहि झाली आहे. प्रत्यक्ष कोर्टांत दारू पिऊन सुधाकर जातो ( अंक ३ प्र. १ ), ही घटना कथानकाचें उत्कर्षस्थान आहे असें मानलें, अथवा पद्माकर, बाबासाहेब व रामलाल यांचा भयंकर उपमर्द करून सिंधूच्या समोर दारू पिण्याचा अतिरेक तो करतो ( अंक ३ प्र. ४ ), ही घटना उत्कर्षस्थान मानली, तरी सुधाकराच्या अधःपाताची सुरवात पहिल्या अंकाच्या मध्याच्या सुमारासच झाली असून पहिल्या

अंकाच्या शेवटीं त्याला गति मिळालेली आहे. एकंदर नाटकाच्या विकासाच्या मानाने कथानकाचा हा आदि, अथवा पहिला भाग, फारच अल्प आहे असें दिसून येईल. याऐवजीं सुधाकराच्या मनाचा संघर्ष स्पष्टपणें दाखविण्यांत आणखी एक सबंध अंक खर्च केला असता तरी तें नाट्याच्या दृष्टीने निःसंशय अधिक उपयुक्त व परिणामकारकहि झालें असतें.

परंतु इंग्रजींत ज्याला 'ट्रॅजिक कॉन्फ्लिक्ट' म्हणतात त्या प्रकारच्या संघर्षाचा या नाटकांत पूर्ण अभाव असल्यामुळे रचनेच्या दृष्टीने, स्वभावलेखनाच्या दृष्टीने, व नाट्यात्मक परिणामाच्या दृष्टीने नाटकांतील मध्यवर्ती घटनेचें वैगुण्य अत्यंत तीव्रतेने जाणवूं लागतें. बाह्य संघर्ष ('एक्स्टर्नल कॉन्फ्लिक्ट') व अंतर्गत संघर्ष ('इनर कॉन्फ्लिक्ट') हे संघर्षाचे दोन्ही प्रकार येथे नसल्यामुळे ट्रॅजिक नाटकाच्या एका मूलभूत कल्पनेचाच चुराडा झालेला आहे हें कबूल न करणें हा दुराग्रह ठरेल.

### आत्यंतिक मनोवृत्तीमुळे अधःपात

सुधाकराच्या स्वभावांत मुरलेलीं मूलभूत वैगुण्यें एक क्षणभरहि विसरणें धोक्याचें ठरेल. आत्यंतिक मनोवृत्ति व कमालीचा तापटपणा हीं तीं वैगुण्यें होत. ज्या आत्यंतिक मनोवृत्तीमुळे प्रतिकूल परिस्थितीशीं कसलाहि प्रतिकार न करतां तो दारूच्या आहारीं जातो, त्याच आत्यंतिक मनोवृत्तीमुळे अत्यंत थोडया काळांत तो इरसाल दारूबाज बनतो. सुधाकराच्या वृत्तीचीं जीं माणसें असतात तीं एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वाहवत जाण्याचीच शक्यता अधिक असते. "त्याच्या अफाट बुद्धिमत्तेला पुरून उरण्याजोग्या कामगिरीमध्ये त्याला नेहमीं गुंतवून ठेव" असें रामलाल सिंधूजवळ म्हणाला होता (अंक १ प्र. १) त्यांत फार मोठा अर्थ आहे. नेहमी कांही तरी महत्त्वाच्या कामगिरीमध्ये गुंतलेलें राहणें, व मनाचा तोल सांभाळणारें जिव्हाळ्याचें माणूस सतत जवळ असणें, या दोन गोष्टींमुळेच सुधाकर ताळ्यावर राहणें शक्य आहे. आता या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे. सहा महिने सनद रद्द झाल्यामुळे कसलेंहि काम नाही, सारा वेळ रिकामपण आहे; कोर्टांतील बेअब्रूमुळे प्रतिष्ठित समाजांत जाणें किंवा प्रतिष्ठित मित्रांच्या सहवासांत राहणें या गोष्टींच्या बाबतींत स्वाभाविकपणेंच कमालीचा संकोच वाटत आहे; आणि घरांत रामलाल नाही, सिंधू नाही, व शरदहि नाही; अशा तिहेरी प्रतिकूल परिस्थितीमुळे आत्यंतिक मनोवृत्तीचा व तोल संभाळण्याच्या बाबतींत पूर्ण असमर्थ असलेला सुधाकर अतिशय थोडया वेळांत इरसाल दारूबाज बनणें हेंच अगदी स्वाभाविक आहे. त्याची आत्यंतिक मनोवृत्तीच याला जबाबदार आहे. "जळलेला उल्का मातींत मिसळून दगडाधोंडयांच्या पंक्तींत बसतो याचा दोष त्याच्या स्वतःच्याच

अधःपाताकडे आहे" असा जो उद्‌गार पुढे सुधाकर काढतो ( अंक ४ प्र. ३ ) तो अगदी यथार्थ असून त्याच्या आत्यंतिक मनोवृत्तीच्या घातकपणाचा अर्क त्यांत सामावलेला आहे.

## ✓ सिंधूची असमर्थता

माहेरीं गेलेली सिंधू जवळ जवळ सहा महिने परत येत नाही ही घटना यासाठीच गडकऱ्यांनी रंगविली आहे. सुधाकर पूर्ण व्यसनासक्त बनून पशूंच्या जगांत तो घुटमळत राहील इतकी त्याची अवस्था झाल्यानंतर सिंधू परत येते हें दाखविणें जरूरच आहे. कोर्टांतील प्रसंग घडला त्याच वेळीं सिंधू जवळ असती तरच सुधाकर वाचला असता. "दारूची संवय सुटण्याची एकच वेळ असते आणि ती म्हणजे प्रथम दारू पिण्यापूर्वीचीच !" हें सुधाकराचें म्हणणें ( अंक ४ प्र. ४ ) इतरांच्या बाबतींत कदाचित् खरें नसलें तरी त्याच्या स्वतःच्या बाबतींत मात्र पूर्णपणें खरें आहे. ज्या आत्यंतिक मनोवृत्तीमुळे तो कोर्टांत अतिप्रसंग करतो त्याच आत्यंतिक मनोवृत्तीमुळे तो अतिशय थोडया वेळांत दारूच्या मोहाला बळी पडतो, व अतिशय झपाटयाने व्यसनाच्या साऱ्या पायऱ्या ओलांडून पशूंच्या सृष्टींत घुटमळूं लागतो.

सुधाकराच्या व्यसनाने असली मर्यादा गाठलेली असतांना रामलाल अचानक विलायतेंतून परत येतो व घरांतील परिस्थिति पाहून तो ताबडतोब तार करून सिंधूला बोलावून घेतो.[२१] परंतु हा वेळपर्यंत सुधाकराचें व्यसन जवळ जवळ सहा महिन्यांइतकें जुनें झालेलें असतें. आणि खरें म्हणजे सिंधू यापूर्वींच जरी आली असती तरी त्याचा कांहीहि उपयोग मुळीच झाला नसता. कोर्टांतील प्रसंग ज्या दिवशीं घडला त्याच दिवशीं जर सिंधू जवळ असती

२१. सिंधू बाळंतपणामुळे सुधाकराकडे येऊं शकत नव्हती हें खरें, परंतु सुधाकराची सनद जाण्यासारखी अतिशय महत्त्वाची गोष्ट कळल्यानंतर पद्माकर किंवा सुधाकराचे श्वशुर या दोघांपैकीं एकजणहि सुधाकराला येऊन भेटत नाही हें कोडें कांही केल्या उलगडत नाही. त्यांचे परस्परसंबंध तर अगदीच निकटचे होते ( अंक १ प्र. ३ ). शिवाय "दादाची सनद गेली एवढं कळलं मात्र, त्या घटकेपासून वहिनींच्या वडिलांनी दादा नको नको म्हणत तरी मोकळया मुठींनं पैसे पाठवायला सुरवात केली आहे" असें प्रत्यक्ष शरद रामलालला सांगते ( अंक २ प्र. १ ). सनद जाण्यासारखा भयंकर प्रकार घडल्यावर सुधाकराला भरपूर पैसे पाठवूनहि त्याला प्रत्यक्ष न भेटणारा मेव्हणा व सासरा हे दोघेहि अजबच म्हणावे लागतील. या विचित्र घटनेचें कारण शोधणें मात्र कठिण नाही. सुधाकर पूर्ण व्यसनासक्त होईपर्यंत त्याला कोणीहि मायेचें माणूस भेटूं नये अशीच गडकऱ्यांची इच्छा आहे !

तरच उपयोग झाला असता. या सहा महिन्यांत सासऱ्याकडून सुधाकराला भरपूर पैसे येत होते असें शरद रामलालला स्पष्टपणें सांगते ( अंक २ प्र. १ ). यांत सुधाकराचा मानीपणा राहिला कोठे ? सुधाकराच्या आत्यंतिक मानीपणाचा गडकऱ्यांनी आविष्कार केलाच नाही. जो आविष्कार केला आहे तो त्याच्या तापटपणाचा व दुबळेपणाचाच केला आहे असें जें मीं मागे विधान केलें होतें त्याचा पडताळा यामुळे मिळेल.

## रामलालची निष्क्रियता

सिंधूच्या येण्यामुळे जसा सुधाकराच्या व्यसनांत कोणताहि उणेपणा आला नाही तसाच रामलालच्या येण्यामुळेहि आला नाही. वास्तविक रामलाल हा सुधाकराचा फार मोठा हितकर्ता. त्याच्या उपकारांचें केवढें मोठें ओझें सुधाकराच्या मनावर होतें. त्याला सुधाकर वडिलांसमान मानीत असे ( अंक १ प्र. १ ). अशा स्थितींत सुधाकर जेव्हा झिंगलेला नसेल अशा वेळीं रामलालने त्याला जर योग्य शब्दांत उपदेश केला असता तर कदाचित् त्या उपदेशाचा सुधाकरावर परिणाम झाला असता अशी शक्यता आहे. पण ही केवळ शक्यताच आहे, खात्री नाही, हेंहि तितकेंच खरें. शक्यता आहे असें म्हणण्यास एक पुरावा अंक २ प्र. १ मध्ये आहे. या प्रवेशांत तो सिंधूची समजूत घालण्याचाच प्रयत्न करीत आहे. "तुझ्याशीं बोलणं मोठं पंचाइतीचं काम आहे बुवा ! किती वेळां सांगूं कीं, माझं तुझ्यावर अगदीं पहिल्यासारखं प्रेम आहे म्हणून !" यापेक्षा तो तिला अधिक कटु कांहीच बोलत नाही. यावरून मनाच्या अशाच जरा सौम्य अवस्थेंत असतां रामलालने त्याला स्पष्ट शब्दांत त्याच्या व्यसनाच्या घोर परिणामांची जाणीव करून दिली असती तर कदाचित् तो सुधारण्याची शक्यता होती. पण रामलाल असा प्रयत्न सुद्धा करून पाहत नाही ही गोष्ट विचित्र वाटण्यासारखीच आहे यांत शंका नाही. सुधाकराला दारूचें व्यसन लागलें आहे हें गीता स्पष्टपणें रामलालला सांगते ( अंक १ प्र. २ ). ज्या लोकांच्या संगतींत सुधाकर दारू पीत बसतो त्यांच्यापैकी पांचसात जणांचीं नांवेंहि गीता त्याला सांगते ( अंक १ प्र. २ ). तळिरामानेच सुधाकराला हें व्यसन जडविलें हेंहि त्याला गीतेकडूनच कळतें. सुधाकराला व्यसनांतून सोडविण्याचा सद्विचार त्याच्या मनांत येतो, व दारूच्या अड्ड्यांतील भगीरथ नांवाच्या तरुणाला तो गाठतो. प्रत्यक्ष मदिरामंडळांत काय गोष्टी चालतात तें समक्ष पाहण्याच्या इराद्याने तो भगीरथाबरोबर मंडळांत जातो. "मंडळी रंगांत आली म्हणजे गेलेलं बरं" असें तोच भगीरथाला म्हणतो.

सुधाकराला त्याच्या दारूबाज दोस्तांच्या परिवारांतून घेऊन जाण्यासाठी रामलाल भगीरथाबरोबर आलेला आहे. "माझ्या एका मित्राला—जो या शहरांची केवळ शोभा त्याला--सुधाकराला—इथून परत नेण्यासाठीं म्हणून मी तुमच्याबरोबर आलों" असें तोच स्वत: भगीरथाला म्हणतो. पण मदिरा-मंडळांत 'रंगांत' आलेल्या माणसाला तेथून बाहेर काढणें हें महाकठिण कर्म आहे, एवढें रामलालला कळावयास हवें होतें. सुधाकराला उपदेश करावयाचा तो मदिरामंडळांत तो रंगांत आल्यावर करावयाचा नसून त्याची धुंदी उतरल्या-वर, तो थोडाफार शांत झाल्यावरच, केला पाहिजे हें रामलालला उमजलें नाही. यामुळे भगीरथाबरोबर मदिरामंडळांत पाऊल टाकल्याबरोबर त्याला पशूंच्या अवस्थेंत गेलेले दारूबाज दिसले. याच दारूबाजांच्या गर्दींत सुधाकर खूप पिऊन धुंद होऊन पडलेला रामलालला दिसला. असल्या अवस्थेंत तेथून सुधाकराला घेऊन जाणें रामलालला सर्वस्वीं अशक्य होतें. यामुळे भगीरथालाच तो लांबलचक व्याख्यान ऐकवितो. आणि शुद्धीवर असलेल्या भगीरथावर त्या व्याख्यानाचा तत्काळ परिणाम होतो, त्याला आपल्या व्यसनाबद्दल तीव्र पश्चाताप होतो व दारू सोडून देण्याचा तो ताबडतोब निर्धार करतो.

यानंतर दुसऱ्याच दिवशीं सुधाकर खूप दारू पिऊनच कोर्टांत जातो. कोर्टांत तो पुन्हा तमाशा करतो. याचा परिणाम असा होतो की, मुन्सफ त्याची सनद कायमची रद्द करतात.

यानंतर केव्हा तरी सुधाकर शुद्धीवर आला असलाच पाहिजे. परंतु सुधाकर शुद्धीवर असतां त्याला स्पष्ट शब्दांत त्याच्या व्यसनाचे परिणाम सागण्यांचें, अथवा सौम्य शब्दांत उपदेश करण्याचें काम रामलालने केलें याला नाटकांत प्रत्यक्ष घटनेचा पुरावा मुळीच नाही. अंक ३ प्र. ३ मध्ये तो शरदला म्हणतो—"आतांशा दोनतीन दिवस सुधाकरनं तुमच्या घरांत मद्य-पानाचा अड्डा घातला आहे हें तूं मला सांगितलं नाहींस.........याबद्दल सुधाकराजवळ गोष्ट काढायला मी गेलों, पण माझ्या सांगण्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं." या ठिकाणीं गडकऱ्यांनी पुन्हा तीच चूक केली आहे. रामलाल सुधाकराला उपदेश करतो ही घटना प्रत्यक्ष रंगभूमीवर दाखविणें जरूर नव्हतें का ?

यानंतर पद्माकराला आणि बाबासाहेबांना 'आतांच्या आतां' तार करून बोलावण्याचें काम तो भगीरथावर सोपवितो. सुधाकराची अवस्था इतकी विलक्षण झालेली असतां तार करण्याचें काम स्वतःच ताबडतोब न करतां नुकताच परिचय झालेल्या भगीरथावर तो तें कां सोपवतो ? पण खरी मौज यापुढेच आहे. "तार आतांच करून येऊं कां ?" असें भगीरथाने विचारल्यावर रामलाल म्हणतो—

" इतकी कांहीं घाई नाहीं. आणखी थोड्या वेळानं केलीस तरी चालेल. " रामलालकडून इतकी सवलत मिळतांच भगीरथ आपल्या गुरुवर्यांना म्हणतो— " मग भाईसाहेब, तितक्या वेळांतच कालचा विषय पुरा करून टाकाना!... लोककल्याणाचा मार्ग कोणता तें सांगितलं नाहींत—" शिष्याने असा प्रश्न जिज्ञासाबुद्धीने विचारल्यावर विवरण न करणें गुरूला कसें शक्य होणार! सुमारें चाळीस ओळींचें प्रदीर्घ भाषण करून लोककल्याणाच्या मार्गाचें विवेचन केल्यावर त्याला एकदम सुधाकराच्या भयंकर व्यसनाची आठवण होते व तो उद्‌गारतो —" आज आपल्याला आपलीं खाजगी कामं बरींच पडलीं आहेत आणखी तीं जरुरीचीं आहेत. पुढें केव्हा तरी सार्वजनिक शिक्षणाचा माझ्या दृष्टीनें जो व्यापकतम प्रयत्न वाटतो तो तुला यथाशक्त्या सांगेन......सध्यां आपलं दुर्दैव सुधाकराच्या व्यसनाशीं संलग्न झालें आहे." ( अंक ३ प्र. ३ )

## बेताल अनर्थाचा कळस

ज्या दिवशीं सुधाकराला सनद पुन्हा मिळावयाची होती त्या दिवशीं दारू पिऊनच सुधाकर कोर्टांत जातो.[२२] पुढे जे बेताल अनर्थ घरांत घडणार आहेत त्यांची ही नुसती नांदी आहे. तिसऱ्या अंकाच्या चवथ्या प्रवेशांत सुधाकराच्या व्यसनाचा बेतालपणा अक्षरशः कळसाला पोचला आहे. तळिरामाची दारू पिण्याची पहिली सूचना सुधाकराने ज्या तत्परतेने ऐकली त्याच तत्परतेने पुढेहि त्याची प्रत्येक सूचना तो ऐकतो. सुधाकराच्या मनावर विलक्षण परिणाम करण्याचें सामर्थ्य तळिरामाने पैदा केलें आहे यांत शंका नाही. हें तळिरामाचें सामर्थ्य नसून सुधाकराच्या कमकुवत मनाचा तो दोष आहे असेंहि म्हणावयास हरकत नाही. तळिरामासारखा मामुली कारकून सुधाकरासारख्या अलौकिक बुद्धीच्या मानी गृहस्थाला आपल्या हातांतील खेळणें बनवतो यांत सुधाकराचाच दुबळेपणा अधिक व्यक्त होत आहे. सुधाकर आता पूर्णपणें आपल्या तावडींत सापडला आहे असें दिसून येतांच त्याला माणसांतून उठविणारी एकएक गोष्ट तळिराम मोठ्या हिकमतीने करूं लागला आहे. एकान्तांत तो जें जें बोलेल तें तें सुधाकराला खरें वाटण्यासारखी परिस्थिति आता निर्माण झाली आहे. " या घरांत तुमची काय किंमत आहे? तुम्ही कोण आहां? " असा सूचक उद्‌गार काढून सुधाकराच्या मानीपणाला तो चावा घेऊन ठेवतो.

---

२२. आदल्याच दिवशीं आर्यमदिरामंडळांत " उद्यां त्या लोकांच्या नाकावर टिचून दारू पिऊनच कचेरींत हजर व्हा! " अशी तळिरामाने त्याला जी चिथावणी दिली होती ( अंक २ प्र. ३ ) त्या चिथावणीबरहुकूम वागण्याइतपत सुधाकराच्या मनोवृत्तीची मजल गेली आहे.

आपल्या सूचनेचा सुधाकराच्या मनावर थोडा परिणाम झालेला दिसतांच "हें घर तुमचं नाहीं. हें घर रामलालचं आहे" असें तो छद्मीपणाने बोलतो. रामलालविषयीं सुधाकराचें मन अधिकच कलुषित व्हावें यासाठीच तळिरामाची सारी धडपड चाललेली आहे. तळिरामाला रामलालचा राग येण्याचें कारण अंक ३ प्र. २ च्या शेवटीं घडलें आहे. सुधाकर कोर्टांतून झिंगलेल्या स्थितींतच घरीं येतांच "असाच्या असा चालता हो, इतःपर या घरांत पाऊल टाकशील तर खबरदार!" अशी रामलालने तळिरामाला धमकी दिली होती. आणि यामुळेच "हें घर रामलालचं आहे! . ...रामलालनं बंदी केली मला!" असें तो सुधाकराला म्हणत आहे. रामलालविषयीं सुधाकराच्या मनांत किल्मिष निर्माण झालें आहे असें दिसतांच तळिराम आणखी एक पायरी पुढे जातो. पद्माकर घरांतील सारा खर्च चालवतो, त्याला सर्वांनी संगनमत करून तार करून बोलावलें आहे, व तो आता बंदोबस्त करणार आहे, इत्यादि गोष्टी तो सुधाकराच्या मनांत भरवतो. इतक्यांत सिंधू व शरद येतात. सुधाकर धुंदींत असल्यामुळे तळिरामाचा प्रत्येक शब्द त्याच्या मनावर परिणाम करीत आहे. 'सिंधूच्या गळ्यांतलं मंगळसूत्र तोड' असें तळिरामाला सांगण्याचा अतिरेक सुधाकर करतो. तळिराम सिंधूचें मंगळसूत्र ओढीत आहे तोंच रामलाल, पद्माकर व बाबासाहेब येतात. सिंधूची भयंकर अप्रतिष्ठा करतांना थोडा सुद्धा न कचरणारा सुधाकर रामलालचा, पद्माकराचा, व बाबासाहेबांचा वाटेल तसा उपमर्द करतांना कसा कचरेल! या अवस्थेला सुधाकर पोचलेला असतांनाच एक भयंकर वाक्य तळिराम सर्वांदेखत उच्चारतो. "रामलाल, आधीं तूं निघ! सिंधूशीं संगनमत करतोस माझ्या घरांत?" असें सुधाकर म्हणतांच "तुमची सनद गेली त्यावेळीं यानं बाईसाहेबांना मिठी मारली!" असली भयंकर कल्पना तळिराम बोलून दाखवतो. या वाक्याचा परिणाम धुंद झालेल्या सुधाकराच्या मनावर अतिशय विपरीत झाला आणि बेतालपणाच्या सर्व पायऱ्या ओलांडण्याची त्याची तयारी झाली. सिंधूने त्याच्या पायांवर डोकें ठेवल्याबरोबर तो तिला लाथ मारतो. कोणाचाहि पैसा घरांत आणावयाचा नाही, कोणाची वस्तु घरांत आणावयाची नाहीं, अशी शपथ तळिरामाच्या सांगण्यावरून तो सिंधूला घ्यावयास लावतो. 'हरामखोर' या शब्दाने तो साऱ्यांची संभावना करतो आणि अखेर सारे निघून गेल्यावर मोठ्या दिमाखाने सिंधूच्या समोर दारू पितो.

दारूच्या अतिरेकाने पूर्ण बेशुद्ध होण्याची जी शेवटची अवस्था असते तिच्या पूर्वीच्या धुंदींत सुधाकर होता, आणि बाह्य परिस्थितीची अर्धवट जाणीव त्याला होती. अगदी शुद्धीवर नाहीं व अगदी बेशुद्धहि नाहीं असल्या मधल्या अवस्थेंत तळिरामाच्या प्रत्येक सूचनेचा सुधाकराच्या मनावर दर

क्षणाला अधिकच विपरीत परिणाम झाला व बेतालपणाच्या साऱ्या पायऱ्या त्याने फार थोड्या वेळांत ओलांडल्या.

### सिंधूच्या यातनांच्या दर्शनानें पश्चात्ताप

पद्माकर आणि बाबासाहेब सुधाकराला कोणत्याहि प्रकारें ताळ्यावर आणूं शकले नाहीत. प्रत्यक्ष पायांवर डोके ठेवणाऱ्या सिंधूच्या दीनवाणेपणाचाहि त्याच्यामनावर थोडा सुद्धा परिणाम झाला नाही. पण घर चालवण्यासाठी कागदाच्या घड्या घालून क्षुद्र मोबदला मिळवणाऱ्या सिंधूचे काबाडकष्ट पाहतांच त्याच्या मनावर परिणाम होतो. दळण दळण्याचीहि तिची तयारी आहे. तिचा तो आर्त उद्‌गार त्याच्या काळजाला घरें पाडतो. अमृतेश्वरीं लक्षभोजनें चाललेलीं आहेत, तेथे गोडधड खायला तरी मिळेल असें गीतेने तिला सुचवतांच तिच्या डोळ्यांत आसवें उभीं राहतात. आणि तें दृश्य पाहतांच सुधाकराच्या मनावर विलक्षण परिणाम होतो. लहानपणापासून पैशाच्या राशींत लोळलेल्या सिंधूच्या उपासमारीची दया येऊन गीतेने भोळ्या भावाने तिला सदावर्तांतील जेवणाचा मार्ग सुचवावा ही कल्पनाच त्याला असह्य होते. "अरेरे ! काय ऐकलं मीं हें ! या उदार मनाच्या पण गरीब कुळींच्या भोळ्या मुलीनं सहजासहजीं सिंधूच्या हृदयाला केवढी जबर जखम केली ही ! धनसंपन्नाची जी कन्या, ज्ञानसंपन्नाची जी पत्नी, तिच्या उपासमारीची दया येऊन या उदार मुलीनं तिला सदावर्ताचा उपदेश द्यावा ? सुधाकरा, काय हा तुझा संसार ! धिक्कार असो तुझ्या व्यसनाला आणि पुरुषार्थाला !"

### सुधाकराच्या पश्चात्तापाची मीमांसा

सुधाकराच्या वृत्तींत बदल होण्याची ही घटना अतिशय महत्त्वाची आहे. अतिशय उग्र झालेला मानीपणा व तापटपणा या गोष्टी सुधाकराच्या स्वभावांत मुरलेल्या आहेत हें मागे स्पष्ट केलेंच आहे. ही त्याची आत्यंतिक मनोवृत्ति कोर्टांतील त्याच्या बेताल वागण्याला जबाबदार ठरली, या आत्यंतिक मनोवृत्तीमुळेच त्याचा तोल सुटला, तिच्यामुळेच तो दारूच्या मोहाला बळी पडला, आणि तिच्यामुळेच दारूबाज आयुष्यांतील बेतालपणाच्या साऱ्या पायऱ्या त्याने ओलांडल्या. स्वतःच्या बुद्धिमत्तेचा विलक्षण अभिमान, आणि उग्र मानीपणा, यांचा मिलाफ ज्याच्या ठिकाणीं झालेला आहे असा आत्यंतिक मनोवृत्तीचा मनुष्य कोणाचाहि कसलाहि उपदेश ऐकावयास तयार नसतो. प्रत्येक क्षणाला आपला अधिकच अधःपात होत आहे हें स्पष्ट दिसत असलें तरी असा मनुष्य उपदेश अत्यंत योग्य असून सुद्धा तो ऐकावयाचाच नाही अशा वृत्तीने वागतो. शेक्सुपियरच्या कोरिऑलेनसने हेंच केलें. या वृत्तीमुळे

सुधाकर कोणाचाहि उपदेश ऐकावयास तयार झाला नाही तर त्यांत नवल नाही. "याबद्दल सुधाकराजवळ गोष्ट काढायला मी गेलों, पण माझ्या सांगण्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं" असें जें रामलाल म्हणतो ( अंक ३ प्र. ३ ) त्यांत विश्वास न ठेवण्यासारखें कांहीहि नाही. उपदेश कोणीहि केलेला असो, सुधाकर तिकडे लक्ष देणेंच शक्य नाही, अशीच त्याची मनोवृत्ति आहे. यामुळे त्याला रामलालने उपदेश केला, किंवा सिंधूने केला, अथवा पद्माकराने किंवा बाबासाहेबांनी केला, तरी त्याचा परिणाम शून्यच व्हावयाचा. 'मला उपदेश करावयाची कोणाची लायकी आहे ?" असाच जणूं त्याच्या बुद्धिमत्तेचा उग्र दर्प आहे. आपण फार बुद्धिवान आहोंत व इतर सारीं माणसें आपल्या मानाने बुद्धीच्या बाबतींत अगदीच सामान्य आहेत असाच त्याचा स्वतःचा समज झालेला होता;[२३] व जवळच्या माणसांनीहि तो समज वाढावा अशीच तरतूद वेळोवेळीं केली होती[२४] याचे नाटकांत भरपूर पुरावे आहेत.

आपल्याला कसल्याहि बाबतींत उपदेश करण्याची दुनियेंत कोणाचीच लायकी नाही ही कल्पना सुधाकराच्या मनांत इतकी दृढमूल झालेली असल्यामुळे त्याला कोणी रागावून बोललें तर त्याचा अनुकूल परिणाम होण्याऐवजीं तो उलट चिडणारच हें ठरलेलेंच आहे. अंक ३ प्र. ४ मध्ये पद्माकर खूप संतापतो, सुधाकराला तो 'दिवाणा दारुबाज' म्हणतो, व त्याच्या सहवासाला 'महारवाडा' म्हणतो. चांगल्या भावनेने केलेला सदुपयोग ऐकण्याची ज्याची तयारी नाही तो पद्माकराच्या तोंडचे हे कटु शब्द कसे ऐकून घेणार ! 'हरामखोर' या शब्दाने तो लगेच सर्वांचीच संभावना करतो.

---

२३. बुद्धिमत्तेच्या तीव्र अभिमानामुळं बहुतांशीं बरोबरीच्या माणसांच्यासुद्धां हातांत हात मिळविण्याची ज्यानं कधीं कदर केली नाहीं......" असें आपल्या बुद्धिमत्तेचें स्वतः सुधाकरानेच कौतुक केलें आहे. बंडगार्डनवर लाचारी पतकरून नोकरी मागण्यासाठी तो गेला होता तेव्हाचा हा उद्गार आहे ( अंक ४ प्र. ३ ) हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

२४. अंक १ प्र. १ मध्ये सिंधूसमोर व त्याच्यासमोर रामलालने त्याच्या अलौकिक बुद्धिमत्तेची जी विलक्षण तारीफ केली आहे ती पाहावी. रामलालने केलेल्या या अतिरेकी स्तुतीचा सुधाकरासारख्या आत्यंतिक मनोवृत्तीच्या माणसावर केवढा परिणाम झाला असला पाहिजे हें सांगण्याची जरूरी नाही. अंक १ प्र. ३ मध्ये पद्माकरहि प्रत्यक्ष सुधाकराच्या तोंडावर त्याच्या अलौकिक बुद्धीची अशीच अतिरेकी तारीफ करतो. "केवळ भाईची कृपा म्हणून तुमच्यासारख्या विद्वद्रत्नाचा आम्हाला लाभ झाला...... तुमच्याशीं बरोबरीनं बोलायची आमच्यासारख्या सजलेल्या मजुरांची लायकी तरी आहे का ?" पद्माकराचा उपदेश सुधाकराने कां ऐकला नाही त्याचा आता उलगडा होईल.

तात्पर्य, कोणाच्याहि उपदेशाचा किंवा संतापून बोलण्याचा सुधाकराच्या मनावर कसलाहि परिणाम होणें शक्यच नव्हतें. बुद्धिमत्तेचा फाजील अहंकार मिरवणाऱ्या त्याच्यासारख्या आत्यंतिक मनोवृत्तीच्या माणसाला कोणाकडून कांहीहि शिकण्यासारखें नव्हतें; आणि उग्र मानीपणामुळे दुसऱ्याचे संतापाचे कटु शब्द सहन करणें त्याला शक्य नव्हतें. परंतु या दोन्ही मार्गांपेक्षा अगदी निराळ्या मार्गाचा अवलंब करून त्याच्या दारुबाज मनावर विलक्षण परिणाम करण्याची कामगिरी गडकऱ्यांनी करून दाखविली आहे. गडकऱ्यांची ही कल्पना अत्यंत उच्च प्रतिभेची द्योतक आहे यांत शंकाच नाही. कोणाकडून एकहि पैसा न घेण्याची शपथ घेऊन सिंधूने त्याच्या पायावर डोकें ठेवलें तरी त्याचें मन द्रवलें नव्हतें. पण हेंच त्यांचें दारुबाज मन दारिद्र्याशीं झगडतांना अत्यंत हीन प्रकारचें काबाडकष्ट करणाऱ्या सिंधूच्या विलक्षण यातना प्रत्यक्ष डोळ्यांना दिसतांच द्रवलें आहे. सिंधू कागदाच्या घड्या घालीत असतां गीतेला तिची दया येते व ती सिंधूला मदत करावयाची तयारी दाखविते. पण "दुसऱ्याचे कष्ट आम्हांला अगदीं वर्ज्य आहेत" असें म्हणून सिंधू तिला घड्या घालूं देत नाही. जवळच मागे उभा राहून सुधाकर सर्व कांही पाहत आहे व ऐकत आहे. सिंधू दळण दळण्याची सुद्धा तयारी दाखवते. उपासमारीनें खंगलेल्या सिंधूची दया येऊन गीता भोळेपणानें तिला लक्षभोजनाचा फायदा करून घेण्याचा सल्ला देते. कोणाच्याहि कसल्याहि उपदेशाचा, किंवा समजावणीचा, अथवा रागावून बोलण्याचा ज्याच्या मनावर कधींच परिणाम होणें शक्य नव्हतें त्या सुधाकराचें इतका वेळपर्यंत बधिर झालेलें मन अत्यंत शांत मनानें दारिद्र्याशीं झगडणाऱ्या व हीन प्रकारचे काबाडकष्ट करणाऱ्या सिंधूच्या असह्य यातना पाहून द्रवलें आहे. त्याच्या मनावर परिणाम करावयास एवढी एकच गोष्ट समर्थ होती. आणि गडकऱ्यांनी हें अचूक हेरलें हें त्यांच्या प्रतिभेच्या थोरवीचें उत्कृष्ट गमक आहे. या ठिकाणीं गडकऱ्यांनी नाट्यात्मकतेची जशी परिसीमा केली आहे, तसेंच मानवी स्वभावांतील मर्मांचें सूक्ष्म ज्ञानहि प्रकट केलें आहे. उपासमारीनें खंगलेल्या व तरी सुद्धा दळण दळावयास तयार होणाऱ्या सिंधूचे डोळे आसवांनी भरलेले दिसतांच सुधाकराची खोल कुठें तरी दडून राहिलेली माणुसकी जागी होते, आणि "धनसंपन्नाची जी कन्या, ज्ञानसंपन्नाची[२५] जी पत्नी, तिच्या उपासमारीची दया येऊन या उदार मुलीनं तिला सदावर्ताचा उपदेश द्यावा! सुधाकरा, काय हा तुझा

२५. असल्या अवस्थेंतहि सुधाकर आपल्या ज्ञानसंपन्नतेचा उल्लेख करीत आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

संसार! धिक्कार असो. तुझ्या व्यसनाला आणि पुरुषार्थाला!" असे अत्यंत आर्त उद्गार आपोआपच त्याच्या तोंडून बाहेर पडतात.

त्याचें मन अशा प्रकारें द्रवलें असतांना व त्याची मेलेली माणुसकी पुन्हा जिवंत झाली असतांना, त्याच्या काळजाला घरें पाडणाऱ्या आणखी कांही घटना गडकऱ्यांनी कौशल्यानें आणल्या आहेत. "असे जुनेर आड करून चार लोकांत कसं बरं यायचं बाहेर? म्हणून मला वाईट वाटलं हो" असें म्हणून गीतेचेंच समाधान करण्याचा प्रयत्न सिंधू करीत आहे. "मग माझं पातळ आणून देऊं का?" असें गीतेने भोळ्याभावाने विचारतांच सिंधू म्हणते—"तुमचं पातळ मला थिटं नाहीं का व्हायचं?" सिंधूचा हा उद्गार ऐकतांच हा वेळपर्यंत पशुसृष्टींत घोटाळणाऱ्या सुधाकराच्या भावना आणखी हळुवार होतात व सिंधूविषयींच्या आदराने त्याचें मन भरून जातें. आणि "शाबास, सिंधू, शाबास! फाटक्या लुगड्याचं निमित्त करून माझ्या दारुबाज अब्रूवर पांघरूण घातलंस!" असा कृतज्ञतेचा उद्गार त्याच्या तोंडून आपोआप बाहेर पडतो.

सिंधूच्या कारुण्यपूर्ण व काबाडकष्टाने भरलेल्या जीवनाचें साक्षात् दर्शन घडवून सुधाकराच्या मनाला पाझर फोडल्यानंतर गडकऱ्यांनी आणखी एका उपायाचा अवलंब केला आहे. त्याच्या हळुवार भावना आता पूर्ण जागृत झाल्या आहेत. त्याची माणुसकी जागी झाली आहे. या स्थितींत त्याचा अहंकार व त्याचा मानीपणा यांचा अगदी लोप होऊन गेला आहे. आतापर्यंत बुद्धिमत्तेच्या तीव्र अभिमानामुळे आणि उग्र मानीपणामुळे कोणाचाहि एकहि शब्द ऐकून घेण्यास तयार नसलेला सुधाकर नुसता तात्त्विक उपदेशच नव्हे तर तिरस्काराचे कटु शब्दहि ऐकून घ्यावयास तयार व्हावा अशीच त्याच्या मनाची मोठ्या कौशल्याने अवस्था केल्यानंतर मगच गडकऱ्यांनी गीतेला खरी बोलकी केली आहे. मूळची अत्यंत फटकळ असलेली गीता इतका वेळ सिंधूशीं अतिशय प्रेमळपणाने व हळुवारपणाने बोलत होती. कधीकाळीं ही बाई तोंडाळपणा करूं शकेल यावर मुळीच विश्वास बसूं नये इतकें तिचें आतापर्यंत सिंधूशीं झालेलें बोलणें लाघवी व हळुवार आहे. परंतु ती एकदम खवळावी, आणि सारा संयम सोडून देऊन स्पष्टपणें बोलूं लागावी, अशीच योजना गडकऱ्यांनी केली आहे. सिंधूकडे पाहतांच तिच्या मनाच्या चिंधड्या होत आहेत. इतक्या सात्त्विक बाईविषयीं तळिरामाने अत्यंत गलिच्छ उद्गार काढले (अंक ३ प्र. ४ पाहा.) याची आठवण होतांच ती एकदम तळिरामावर चिडते व त्याला शिव्याशाप मोजते. तळिराम हा गीतेचा नवरा. "आपण बायकांनीं असं बोलावं का? नवरा म्हणजे देवासारखा--" असें

सिंधू बोलतांच तळिराम ही विशिष्ट व्यक्ति बाजूला झाली, आणि 'नवरा' या जातीसंबंधींच गीता अगदी फटकळपणें बोलूं लागली. सिंधूजवळ अभावितपणें का होईना सुधाकराला नांवें ठेवणें गीतेला शक्य झालें नसतें. पण तळिरामाच्या निमित्ताने साऱ्या बेवकूब, व्यसनी व दुराचारी नवऱ्यांची यथास्थित खेटरपूजा करणें तिला शक्य झालें. इतका वेळ सिंधूशीं बोलत असतां कमालीचा हळुवारपणा दाखविणाऱ्या गीतेने आता चंडिकेचा अवतार धारण केला आहे. आणि इतके दिवस कसल्याहि समजुतीच्या बोलण्याकडे पूर्ण दुर्लक्ष करण्याइतपत अहंकारी असलेल्या, परंतु सिंधूच्या यातना पाहिल्यामुळे द्रवलेल्या, व पुन्हा माणुसकीला वश झालेल्या सुधाकराला गीतेचे सारे कटु शब्द ऐकून घेणें भाग पडत आहे. इतकेंच नव्हे तर तिचा प्रत्येक शब्द त्याच्या जिव्हारीं लागत आहे. असें नसतें तर तो तावडतोब पुढे झाला असता व गीतेचें तोंड त्याने उर्मटपणाने बंद केलें असतें. पण गीतेच्या वाक्ताडनाचा त्याच्या मनावर इतका विलक्षण परिणाम झाला की, तिचे शब्द कितीहि कठोर असले तरी ते शांतपणाने ऐकून घेणें त्याला भागच पडलें. इतके कटु शब्द ऐकून घेऊन त्यांचा अभिप्राय समजावून घेण्याची ताकद यावेळीं त्याच्या द्रवलेल्या हळुवार मनांत निर्माण झाली होती हाच याचा अर्थ होय. "देवानेंच मुळीं आतांशा लाज सोडलेली दिसते!......असले नवरे जाळायचे का आहेत? यांच्या अकला चुलींत का जातात? मेल्या एकाच्या अंगीं वकूब नाहीं काडीचा अन् हे म्हणे देव! या देवांची नित्य नेमानं खेटरांनीं पूजा करायला हवी! तो देव हातीं सांपडता किनई तर तुमच्यापुढं उभा करून, चांगला कान पिळून त्याला हडसून खडसून विचारलं असतं, कीं या माउलीकडे नीट एकदांचा डोळे फोडून पहा अन् मग सांग कीं, पोराबाळांनीं भरल्या घरांत अशी ओतायला का दारू केली आहेस?..... तुमची काय ओज ठेवली आहे हो दादासाहेबांनीं?... सांगा बघूं, काय केलं हो यांनीं तुमच्यासाठीं? कधीं गोळाभर अन्न घातलं तुम्हांला वेळेवर, का बोटभर चिंधी आणली धडोतीसाठी? अष्टौप्रहर बाटलींत बुडया मारूनच बसल्या ना यांच्या मोठाल्या बुद्धया?[२६] हे हो कसले देव? अहो हे शेंदूरकमी देव, निव्वळ दगडधोंडे?... नवरा म्हणे देवासारखा! अशानं तर नवरेपणाचे देव्हारे माजले! दारू पितो तो कसला हो नवरा? माणसांत देखील जिमा व्हायची नाहीं त्याची!"

गीतेचे इतके भयंकर कठोर शब्द सुधाकर मागे उभा राहून इतक्या

२६. आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेचा तीव्र अभिमान बाळगणाऱ्या अहंकारी सुधाकराला हा फटकारा चांगलाच झोंबला असला पाहिजे.

शांतपणाने ऐकून घेतोच कसा याची वर केलेली मीमांसा नीट लक्षांत घेतली तर यांत चमत्कारिक कांहीच वाटणार नाही, इतकेंच नव्हे तर गडकऱ्यांनी या ठिकाणीं दाखविलेल्या असामान्य नाट्यात्मक कौशल्याची व मानवी मनांतील सूक्ष्म अंतर्व्यापारांच्या ज्ञानाची मोकळेपणाने तारीफ करावीशीच वाटेल.

या प्रवेशाचें वर उकलून दाखविलेलें मर्म लक्षांत न आल्यामुळे आपल्या श्रेष्ठ टीकाकारांनीहि गडकऱ्यांना फार मोठा अन्याय केला आहे. उदाहरणार्थ, प्रो. ना. सी. फडके म्हणतात– "भगीरथ ज्याच्या उपदेशाने दारूच्या कैचींतून सुटला त्या रामलालला सुधाकराला पवित्र मार्गावर आणतां येऊं नये, आणि शेवटीं गीताबाईच्या चार भरड शब्दांनीं सुधाकराची दृष्टि निवळावी — या. . . . .गोष्टी असंबद्धतेच्या बाबतींत एकमेकींशीं स्पर्धा करीत आहेत असें वाटतें." [२७] गीतेच्या चारच काय पण चारशें भरड शब्दांनीहि सुधाकर ताळ्यावर आलाच नसता. परंतु गीतेचे शब्द शांतपणाने ऐकून घ्यावयास त्याने तयार व्हावें यासाठी गडकऱ्यांनी सिंधूच्या व गीतेच्या कमालीच्या हृदयस्पर्शी संवादाच्या द्वारें जी उत्कृष्ट पूर्वतयारी करून ठेवली आहे, तिच्याकडे साफ दुर्लक्ष झाल्यामुळेच प्रो. फडके यांनी हा शेरा मारला आहे हें उघड आहे.

गीतेच्या या फटकळ बोलण्याने आणखी एक कार्य साधलें आहे. सुधाकराचे सारे अनाचार एक शब्दहि न बोलतां सिंधू अगदी निमूटपणें सोशीत आहे. तिच्या असह्य यातना पाहून सुधाकराला कोणी तरी खूप तोडून बोलावें, त्याच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालावें, असा आपल्याला प्रत्येक क्षणाला मोह होत असतो. परंतु सुधाकराला बोलण्याच्या बाबतींत रामलाल, पद्माकर व बाबासाहेब या सर्वांनाच अपयश आल्यामुळे गीतेचे कटु शब्द ऐकतांच प्रेक्षकांना एक प्रकारचें उत्कट समाधान लाभतें. आपल्याच मनांतील सारा संताप गीता बोलून दाखवीत आहे या विचाराने हें समाधान निर्माण होतें. शेक्सुपियरच्या 'ऑथेलो' या नाटकांत ऑथेल्लोने देस्दिमोनाचा खून केल्यानंतर एमीलिया-सारखी अगदी मामुली दासी त्याला उद्देशून जे असह्य कटु शब्द उच्चारते त्यांनी प्रेक्षकांच्या दुखावलेल्या व भारावलेल्या मनाला विलक्षण समाधान वाटतें. तोच प्रकार गीतेच्या फटकळ बोलण्याच्या बाबतींतहि झाला आहे.

गीता निघून गेल्यावर अगोदरच पराकाष्ठेचा हादरलेला सुधाकर आपोआप अंतर्मुख होतो. गीतेवर रागावण्याचा विचारहि त्याच्या मनांत येत

२७. 'मासिक मनोरंजन,' सप्टेंबर १९१९, पृ. ९१

नाही, उलट गीतेने केलें तेंच बरोबर आहे असें त्याला वाटत आहे. त्याचें या वेळचें स्वगत विचारांत घेतलें असतां त्याच्या जाग्या झालेल्या मनाचें उत्कृष्ट दर्शन घडेल. "सिंधू, इतक्या थोरपणानं गीतेला बोलती बंद कां केलीस? दारूच्या धुंदीनं वाहिरून निजलेला माझा जीव तुझ्या नाजुक बोलाफुलांनीं कसा जागा होणार? त्याच्यावर गीतेच्या तोंडचा दगडधोंड्यांचा असा निष्ठुर मारच व्हायला पाहिजे! गीतेचा एक एक बोल जिवाला चाबकाच्या फटकाऱ्याप्रमाणं लागत होता!" आणि दारूच्या धुंदींत आपण सिंधूची विटंबना केली हें मनांत येतांच त्याचा सारा राग दारूवरच पाखडला जाणें स्वाभाविक आहे. मुळांत जो अनर्थ झाला तो त्याच्या तापटपणामुळेच हें खरें असलें तरी यावेळीं त्याला खरा परिणाम जाणवत आहे तो केवळ दारूचाच. यामुळे तो दारूची निर्भर्त्सना करीत आहे. "सिंधू, नवऱ्याच्या पोटांत दडी धरून बसलेल्या या दारूची तुम्हीं कदर केलीत म्हणून सांवाच्या पिंडावर बसलेल्या विंचवाच्या नांगीप्रमाणें ती तुम्हां सर्वांना अजून छेडते आहे! सुधाकरा, चांडाळा, दारूच्या दुष्ट नादानं केवळ पशू बनून या देवतेची काय विटंबना केलीस ही! तुझं सारं शहाणपण गेलं कुठं?" गीता इतका वेळ जें बोलत होती तेंच जवळजवळ आता सुधाकर बोलत आहे. आपली बुद्धि, उच्च कुळांतील जन्म, कुटुंबाची जबाबदारी, या साऱ्या गोष्टींची आपण दारूच्या नादाने घोर उपेक्षा केली व बेताल अनर्थ आपल्या हातून घडले याची त्याला तीव्र जाणीव होण्याचा हाच क्षण आहे. आणि ही जाणीव होतांच उत्कट पश्चात्तापाच्या भावनेने त्याचें मन भरून गेलें आहे. पायावर डोकें ठेवणाऱ्या ज्या सिंधूला त्याने लाथेने ठोकरलें होतें ती साधीसुधी स्त्री नसून देवता आहे ही जाणीव प्रथमच त्याला होते व भावनांचा उद्रेक अनावर झाल्यामुळे तो तोंड झाकून रडूं लागतो. आणि या भावनोद्रेकांतच दारू सोडण्याचा निर्धार तो सिंधूजवळ बोलून दाखवितो.

सुधाकराचे या वेळचे उद्‌गार अत्यंत भावनोत्कट व प्रामाणिक आहेत. कठोर आत्मपरीक्षण करण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळेच त्याचा पश्चात्ताप तीव्रतेच्या परिसीमेला पोचला आहे. त्याचा प्रत्येक शब्द त्याचें हृदय पिळवटूनच बाहेर पडत आहे. सबंध आयुष्यांत जें आत्मपरीक्षण करण्याची त्याला बुद्धीच्या अहंकारामुळे व मानीपणामुळे कधी जरूरी वाटली नाही तें आत्मपरीक्षण यावेळीं करणें त्याला परिस्थितीमुळे भाग पडलें आहे. आपण आपल्या विद्येला, ज्ञानाला, नांवलौकिकाला, घराण्याच्या मोठेंपणाला बट्टा लावला; आणि सिंधूसारख्या लक्षाधीशाच्या मुलीची घोर विटंबना केली या गोष्टींची कठोर जाणीव त्याच्या प्रत्येक शब्दांत कांठोकांठ भरली आहे. "तोच हा पातक्यांतला पातकी सुधाकर! त्या माझ्या पायांवर तूं

मस्तक ठेवतेस ? त्यापेक्षां लाथेसरशीं मला दूर नरकांत कां लोटून देत नाहींस ? सिंधू, गीतेनं काय खोटं सांगितलं ? भलत्या भावभक्तीनं माझ्यासारख्या दगडाची देवपूजा कशाला करीत बसलीस ? तुझा नवरा होण्याला मी पात्र आहे का ! बाबासाहेब,......आपण सर्वस्वीं फसून या रत्नाला दारूंत बुडविलं ! पण आपणांला तरी आधीं काय ठाऊक, कीं ब्राह्मणकुलांतला हा विद्यासंपन्न सुधाकर [२८] पुढं असा दारूबाज दिवटा निघणार आहे म्हणून !"

आणि व्यसनासक्ततेमुळे आपल्या हातून वेळोवेळीं जे घोर अनाचार घडले ते सारे धीराने व शांतपणाने सहन न करितां सिंधूने वेळींच वृत्तीचा कठोरपणा धारण केला असता तरी बरें झालें असतें असें त्याला गतगोष्टींची आठवण होतांच वाटूं लागतें. "सिंधू, तक्षकाला मारण्यासाठीं जनमेजयानं त्याला पाठीशीं घालणाऱ्या इंद्रदेवतेलाही आगींत उडी टाकण्याला आमंत्रण केलं त्याप्रमाणं या दारूच्या व्यसनाला घराबाहेर घालविण्यासाठीं तुझ्यासारख्या साध्वींनींसुद्धां या दारूच्या व्यसनाला पोटांत थारा देणाऱ्या पतिदेवतेला लाथेनं घराबाहेर हाकललं तरच आजच्या संभावित समाजांतून हें दारूचं व्यसन हद्दपार होईल."

दारू कायमची सोडण्याचा त्याने जो निर्धार केला आहे त्यामुळे चिरकालीन निराशेंत सिंधूला ब्रह्मानंद झालेला पाहतांच त्यालाहि उत्कट आनंद होतो; आणि मुलाची शपथ घेऊन दारू कायमची सोडण्याचा तो निर्धार करतो.

## √ हरपलें श्रेय पुन्हा मिळविण्याची तळमळ

सुधाकराच्या दारूबाज आयुष्यांत हें जें अत्यंत महत्त्वाचें स्थित्यंतर झालें तें दुर्दैवाने क्षणजीवी ठरावयाचें होतें. मनाच्या साऱ्या शक्ति एकवटून मोठ्या कराराने दारू सोडण्याचा निश्चय तो करतो, आणि मोठ्या उत्साहाने नवीन आयुष्यक्रम सुरू करण्याची ईर्ष्या तो बाळगतो. आपल्या संसाराची विसकटलेली घडी पुन्हा बसवावी, मध्यंतरीं घडलेल्या भीषण घटनांवर कायमचा पडदा टाकावा, आणि सिंधूला सुखी करावें, अशी तळमळ त्याच्या पश्चात्तापदग्ध मनाला लागली आहे. या अवस्थेंतील त्याची प्रत्येक भावना अगदी प्रामाणिक आहे. आपल्याच प्रमादामुळे प्रतिष्ठित समाजाला आपण पारखे झालों याची त्याला चांगली जाणीव आहे. या प्रतिष्ठित समाजांतील आपली पूर्वीची जागा पुन्हा परत मिळेल कीं नाही या विचाराने तो व्याकुळ झाला आहे. त्याच्या

---

२८. याही अवस्थेंत आपल्या विद्यासंपन्नतेचा उल्लेख केल्याखेरीज सुधाकर राहणार नाही.

मनाचा भितरा ओशाळेपणा कांही केल्या कमी होत नाही. भोवतालच्या सुंदर जगाकडे पाहण्याचाहि त्याला धीर होत नाही.[२९]

जगाचा सुंदरपणा कायम आहे, पण बिघाड झाला आहे तो आपल्या मनांतच, या जाणिवेमुळेच भितरा ओशाळेपणा त्याला व्यथित करीत आहे. ज्या प्रतिष्ठित समाजांत पूर्वी त्याला मानाचें स्थान होतें त्या प्रतिष्ठित समाजांत पुन्हा जावें असें तर वाटत आहे, पण पातकीपणाच्या जाणिवेने तसें करावयाचा धीर मात्र होत नाही. पूर्वाश्रमींचे 'जिवलग बंधु' आपल्यासारख्या दारूबाजाला तोंडओळख सुद्धा दाखविणार नाहीत अशी त्याला भीति वाटणें स्वाभाविक आहे. आपली 'हरवलेली जागा' पुन्हा कशी हुडकून काढावी हा त्याला प्रश्न पडलेला आहे. 'हजारों शंकांनीं' त्याचा जीव कासावीस झाला आहे.

## भितरा ओशाळेपणा

अशा स्थितींत सुधाकर काय करूं शकेल ? रामलाल, पद्माकर, अथवा बाबासाहेब यांच्यासारख्या जिव्हाळ्याच्या हितचिंतकांजवळ एक शब्द त्याने काढला असता तर या तिघांनी त्याला तावडतोब नोकरी मिळवून दिली असती असें अनेकांना वाटतें. खांडेकरांनी तर असें स्पष्टच म्हटलें आहे.[३०] परंतु सुधाकराची या वेळची मनःस्थिति नीट लक्षांत घेतली असतां तो रामलालकडे किंवा पद्माकराकडे कां गेला नाही तें सहज कळेल. या उदारचरित सज्जनांशीं आपण माणुसकी सोडून वागलों, त्यांचा भयंकर उपमर्द केला, या गोष्टींची जाणीव त्याच्या मनाला सतत टोचणी देत आहे. आपल्या पशुतुल्य वर्तनाची आठवण होतांच त्याचें मन खचलें असलें पाहिजे. या लोकांना पुन्हा

---

२९. "सुंदर परंतु निर्दोष वस्तूकडे पतित मनाला ओशाळेपणामुळं उघड्या डोळ्यांनीं पाहण्याचा धीर होत नाहीं !........एकंदर जगाकडेच पाहतांना माझ्या दृष्टींतला हा भितरा ओशाळेपणा कमी होत नाहीं. दारूसारख्या हलक्या वस्तूच्या नादानें ज्या सोज्ज्वळ समाजांतून, प्रतिष्ठित परिस्थितींतून, बरोबरीच्या माणसांतून, अगदीं माणसांतूनच मी उठलों, त्या जगांत काळं तोंड पुन्हा घेऊन जातांना मला चोरट्यासारखं होत आहे. या सुंदर जगांत माझी जागा पुन्हा मिळेल का ?" ( अंक ४ प्र. ३ )

३०. "पण 'एकच प्याल्या'ला शिवलेल्या गडकऱ्यांच्या सुधाकराला हें व्यवहारज्ञान कुठून सुचावें ? रामलाल अगर सिंधूचे वडील आपल्यापुढें एक सोडून छप्पन्न नोकऱ्या आणून उभ्या करतील हें कांहीं त्याला कुणी सांगायला नको होतें."—'गडकरी ( व्यक्ति व वाङ्मय )', द्वितीयावृत्ति, पृ. १९५.

तोंड दाखवावें कसें ? त्यांच्याकडे पुन्हा गेलों तर ते उलट कसे वागतील ? इत्यादि शंका त्याच्या मनांत थैमान घालीत असल्या तर त्यांत कांहीच नवल नाही. "अजून तोंडाला दारूची दुर्गंधी कायमची असतांना माझ्या पूर्वाश्रमींच्या जिवलग बंधूंना माझी तोंडओळख तरी पटेल काय ?" हें त्याचें वाक्य फार महत्त्वाचें आहे. या लोकांनी त्याचा अपमान केला असता तर तो त्याच्या दुबळ्या मनाला सहन झाला असता काय ? आणि ही भीति असल्यामुळेच "उदार सज्जनांच्या समोरसुद्धां आश्रयासाठीं जाण्याची माझ्या चोरट्या मनाला हिंमत होत नाहीं" असें तो म्हणत आहे. अजून आपल्या तोंडाला दारूची दुर्गंधी येत आहे अशा स्थितींत प्रतिष्ठित समाजांतील निर्व्यसनी उदार सज्जनांपुढे जाण्याची त्याची हिंमत नाही. "दारूच्या खाणाखुणा अजून अंगावर आहेत अशा स्थितींत निर्व्यसनी जगांत जाववत नाहीं" अशी आपल्या दुबळ्या मनाची केविलवाणी स्थिति त्याने स्पष्टपणें वर्णिली आहे.

जवळच्या आप्तेष्टांकडे जाण्याचा धीर होत नाही, प्रतिष्ठित समाजांतील सभ्य लोकांकडे जाण्याची चोरी वाटते, अशा स्थितींत सुधाकर मदतीसाठी जाणार तरी कुणाकडे ? ज्यांना भेटण्यांत त्याला अशा स्थितींतहि संकोच वाटणार नाही अशाच लोकांकडे तो जाणार हें उघड आहे. हे लोक म्हणजे मद्यपानाच्या बैठकींतील त्याचे स्नेही. पूर्वी केव्हा तरी मजलशींत अशा कांही लोकांनी सनद रद्द झाल्यावर त्याला नोकरी लावून देण्याचें कबूल केलेलें त्याला आठवत असेल.[३१] मदिरामंडळांतील हे वजनदार लोक भेटतील या अपेक्षेने सुधाकर बंडगार्डनवर जातो. या गोष्टीची थट्टा करण्याचा टीकाकारांना मोह आवरला नाही. "बंडगार्डनवर एखादी सर्व्हिस सिक्युअरिंग एजन्सी आहे काय ?" असा प्रश्न प्रो. फडके यांनी विचारला आहे.[३२] गांवांतील सभ्य आणि प्रतिष्ठित समाजांत हिंडण्याची सुधाकराला चोरी वाटली तर त्यांत अस्वाभाविक असें कांहीच नाही. आपल्या भित्र्या ओशाळेपणाचा त्याने स्वतःच स्पष्ट उल्लेख

---

३१. सहा महिने रद्द झालेली सनद पुन्हा मिळण्याच्या आदल्या दिवशीं आर्यमदिरामंडळांत रावसाहेब सुधाकराला म्हणतात–" तुम्ही आम्हांला पाठच्या भावासारखे –तुमच्या जिवासाठीं जीव देऊं ! दारू पिऊनच कचेरींत जा ! मग सनद कायमची रद्द झाली तरी हरकत नाहीं ! तुम्हांला वाटेल तितक्या आम्ही नोकऱ्या देऊं ! हें घ्या वचन ! तुम्हांला गरज पडेल त्यावेळीं तुम्हांला वाटेल तेवढी मोठी नोकरी लावून देण्याचं मी तुम्हांला वचन देतों ! भाऊसाहेब, बापूसाहेब, आपणहि त्यांना वचन द्या !" (अंक २ प्र. ३)

३२. 'मासिक मनोरंजन,' सप्टेंबर १९१९, पृ. ९३

केला आहे. प्रतिष्ठित लोकांना टाळण्याची त्याची धडपड चालू आहे. आणि म्हणून तो गांवाबाहेर ज्या ठिकाणीं ओळखीचे प्रतिष्ठित लोक भेटण्याची शक्यता बरीचशी कमी अशा ठिकाणीं गेला असला तर त्यांत हसण्यासारखें काय आहे ? दुसरें असें की, मदिरामंडळांतील व्यसनी, श्रीमंत, गुलहौशी व चंगीभंगी लोक बंडगार्डनसारख्या गांवापासून पुष्कळच दूर असलेल्या चैनीच्या ठिकाणीं घोटाळत राहण्याचीच शक्यता जास्त नाही काय ? त्यांचा हा नित्याचाच शिरस्ता असेल. आणि सुधाकराला तो माहीतहि असेल. आर्यमदिरामंडळांतहि रावसाहेब, बापूसाहेब, भाऊसाहेब इत्यादि माणसें त्याला सहज भेटली असतीं. पण दारू सोडण्याची प्रामाणिक शपथ घेतल्यावर सुधाकर आर्यमदिरामंडळांत कसा जाणार ? मग या माणसांना गाठावयाचें तरी कोठें ? बंडगार्डनसारख्या विलासी श्रीमंतांचें आश्रयस्थान असलेल्या जागीं हीं माणसें भेटण्याची शक्यता आहे असें सुधाकराला वाटलें असेल आणि म्हणून तो तेथे गेला असेल.

## गतपातकांचीं पिशाचें

बंडगार्डनवर त्याला शास्त्री व खुदाबक्ष हीं त्याच्या 'गतपातकांचीं मूर्तिमंत पिशाचं' भेटतात. "आता मला क्लबांत यायचं नाहीं !·····आजच नाहीं, पण मी कधीं येणार नाहीं" असें तो त्यांना बजावतो. हा केवळ या घटकेपुरताच हा पश्चात्ताप आहे असें त्या दोघांनाहि अनुभवावरून वाटतें. "तूं आपण होऊन क्लबांत आला नाहींस तर यज्ञोपवीत काढून ठेवीन, हें ब्रह्मवाक्य लक्ष्यांत ठेव !" अशी शास्त्री त्याला धमकी देतो.

प्रतिष्ठित समाजांत व निर्व्यसनी सज्जनांच्या सहवासांत पुन्हा आपल्याला जागा मिळावी म्हणून तळमळणारा सुधाकर गांवापासून दूर कसली तरी नोकरी मिळविण्यासाठी आला असतां तेथें या पिशाचांनी जे कुत्सित उद्गार काढले त्यांच्यामुळे 'घाणेरड्या व्यसनानें दुबळ्या झालेल्या' सुधाकराच्या मनाला भयंकर जखम झाली. इतक्या क्षुद्र माणसांच्या सहवासांत आतापर्यंत आपण वाह्यवत आलों या विचाराने तो कष्टी झाला आहे. पण या अधःपाताचा सारा दोष आपल्याकडे आहे हें त्याला माहीत आहे. "पण यांना दोष देण्यांत काय अर्थ आहे ? जळलेला उल्का[३३] मातींत मिसळून दगडाधोंड्यांच्या पंक्तीला बसतो याचा दोष त्याच्या स्वतःच्याच अधःपाताकडे आहे." स्वतःच्या अधःपाताचा विचार मनांत येतांच आपलें तेजस्वी गतायुष्य आणि आताची केविलवाणी स्थिति या दोहोंमधील भयंकर विरोध सुधाकराला असह्य होतो. "बुद्धि-

३३. एका काळच्या आपल्या तेजस्वीपणाची जाणीव सुधाकर कधीच विसरूं शकणार नाही.

मत्तेच्या तीव्र अभिमानामुळं बहुतांशीं बरोबरीच्या माणसांच्या सुद्धां हातांत हात मिळविण्याची ज्यानं कधीं कदर केली नाहीं[३४], तो मी आज दारूच्या समुद्रांतून बाहेर निघण्याकरतां त्याच समुद्राच्या कांठावर बसलेल्या नालायक माणसांच्या पायांचा आधार मिळविण्यासाठीं आशेनं धडपडतो आहें."

## पाजी संभावितपणाचें दर्शन

क्षुद्र माणसांना प्रसन्न करण्याचें दुर्दैव ओढवलें असलें तरी तें करण्यावाचून सुधाकराला आता गत्यंतर नाही. परंतु त्यांनी दाखविलेल्या बेपर्वाईमुळे सुधाकराचा स्वाभिमान जास्त जास्तच दुखावला जातो. उघड अपमान, आणि पाजी संभावितपणा, या दोन्ही शस्त्रांचा दुर्दैवाने त्याच्यावर मारा केला आहे. तरी सुद्धा होईल तो अपमान गिळून लाचारी पतकरण्याचा त्याने निर्धार केला आहे. आर्यमदिरामंडळांतील दादासाहेब तर त्याची भयंकर निर्भर्त्सना करतात, 'बेशरम मनुष्य', 'पायखान्यांतला पायपोस' यांसारख्या शब्दांनी त्याची विटंबना करतात. इतकें झालें तरी 'सुधाकराच्या निर्लज्जपणांत अजून थोडी धुगधुगी' उरली आहे. इतक्यांत सुधाकराला पाठच्या भावासारखे मानणारे व संकटकाळीं त्याला नोकरी लावून देण्याचें चारचौघांत वचन देणारे ( अंक २ प्र. ३ पाहा.) रावसाहेब येतात. 'अनुभवाच्या औषधाचा कडवटपणा' अजून तोंडांत घोळत असतांनाच विलक्षण लाचारीने सुधाकर त्यांच्याजवळ नोकरीचा विषय काढतो. त्याच्या विद्वत्तेचा, हुषारीचा, लायकीचा, मोठ्या मानभावीपणाने उल्लेख करून सदर रावसाहेब सुधाकराच्या उरलेल्या स्वाभिमानाची नांगीच ठेचून टाकतात. "तुम्ही बोलूनचालून व्यसनी, तुमची जामीनकी म्हणजे धोतरांत निखारा बांधूनच हिंडायचं" असें म्हणून दारू पिणें हें वाईट कसें याचाच वस्तुपाठ ते सुधाकराला देतात.

बंडगार्डनच्या या प्रवेशांत सुधाकराने मनोनिग्रहाची परिसीमा गाठली हें कोणालाहि कबूल केलेंच पाहिजे. त्याच्या आत्यंतिक मनोवृत्तीचा विचार करतां त्याने दाखविला हा मनोनिग्रह असामान्यच म्हणावा लागेल. प्रतिष्ठित समाजांतील निर्व्यसनी सज्जनांनी व आप्तेष्टांनी सुधाकराचा या स्थितींत अपमान केला असता तर त्याला जितक्या यातना झाल्या असत्या त्यापेक्षा किती तरी अधिक जहरी यातना दारूच्या व्यसनांत आकंठ बुडालेल्या व तरी सुद्धा मानभावीपणाने साळसूद उपदेश करणाऱ्या पाजी संभावितांनी आणि व्यसनाच्या खातेऱ्यांत लोळणाऱ्या क्षुद्र जंतूंनी केलेल्या हेटाळणीमुळे त्याला

३४. बुद्धिमत्तेचा तीव्र अभिमान आणि त्यामुळे उत्पन्न होणारा तुसडेपणा या आपल्या स्वभावांतील मर्मांचा स्पष्ट उल्लेख सुधाकराने केला आहे.

झाल्या असल्या पाहिजेत. 'पूर्वाश्रमींच्या जिवलग बंधूंना' आपली तोंड-ओळखहि पटणार नाही ही भीति त्याला होती. पण दारूच्या अड्ड्यांतील पैसेवाले लोक किंवा इतर 'पामर कीटक' आपल्या स्वाभिमानाची असली हत्या करतील अशी त्याला कल्पनाहि नसावी. परंतु त्याचा अंदाज मूर्ख-पणाचा ठरला. हें त्याचें दुर्दैव होय. आपली 'हरवलेली जागा' पुन्हा हुडकून काढण्याच्या ईर्ष्येने मनाच्या कमकुवत अवस्थेंत त्याने ज्या मार्गाचा अवलंब केला तो मारेकरी ठरला.

सिंधूच्या दारुण यातना पाहून द्रवलेलें त्याचें मन गीतेचे भयंकर फटकळ शब्द शांतपणाने सहन करूं शकलें. याच शांतपणाने बंडगार्डनवर त्याने एकापेक्षा अधिक दारुण असे अपमानहि पचविले. परंतु व्यसनाच्या अतिरेकामुळे कमालीच्या दुबळ्या झालेल्या त्याच्या मनाची शक्ति कांही मर्यादेपर्यंतच तग धरून राहणार हें उघड आहे. आणि ही शक्ति एकदा संपली म्हणजे मनावरचा ताबाहि संपला. दुबळ्या मनाने उसनें आणलेलें अवसान संपल्याबरोबर दुबळेपणाचेंच साम्राज्य सुरू होणार. आणि या दुबळे-पणाने पूर्वी ज्या गोष्टी सुधाकराच्या हातून घडविल्या त्याच गोष्टी तो पुन्हा तशाच, किंबहुना अधिक तीव्रतेने, करणार हें न सागतां समजण्यासारखें आहे.

बंडगार्डनवर सोसलेले अपमान व दिसलेले पाजी संभावितपणाचे नमुने यांचें स्वरूप इतकें विचित्र होतें कीं, मनाच्या असल्या अवस्थेंत सुधा-कराला ते सहन करणें सर्वथैव अशक्य होतें. सुधाकराची गोष्ट सोडून द्या. चांगल्या कणखर मनाच्या रगेल माणसालाहि या प्रकारची अवहेलना सहन करणें फारच कठिण होईल. मग ज्याचें मन पराकाष्ठेचें कमकुवत झालें आहे, व जो कालपर्यंत व्यसनांत बुडालेला होता, अशा आत्यंतिक मनोवृत्तीच्या सुधाकराच्या ठायीं 'दुर्दैवाचे दशावतार पाहण्याची' मुळीच ताकद उरली नसली तर त्यांत अनाकलनीय असें कांहीहि नाही. इतके भयंकर अपमान सोसूनहि त्याने शांत मनाने घरीं जावयास हवें होतें, आणि 'टाइम्स'मधील जाहिराती वाचून नोकरीसाठी अर्ज करावयास हवा होता,[३५] असें कोणी वाटल्यास म्हणावें. परंतु मानवी स्वभावाला, आणि विशेषेंकरून सुधाकरासारख्या

---

३५. ही कल्पना श्री. खांडेकरांची आहे. "नाहींतर मुंबईच्या 'टाइम्स' मधल्या 'पाहिजे' या सदरांतील जाहिराती सोडून दारुबाजांचीं घाणेरडीं तोंडें पाहायला तो कशाला गेला असता?"

—'गडकरी (व्यक्ति व वाङ्मय)' द्वितीयावृत्ति, पृ. १९५

आत्यंतिक मनोवृत्ति असलेल्या माणसाच्या स्वभावाला, तें मुळीच धरून नाही. आणि यामुळेच सुधाकराच्या मनाचा तोल पुन्हा पूर्णपणें सुटला, वैताग पराकोटीला पोचला, आणि यापुढे जगण्यांत कसलाहि अर्थ उरला नाही असें त्याचें दुबळें मन त्याला पुन्हा पुन्हा बजावूं लागलें. पण आत्महत्या करण्यालाहि एक प्रकारचें धैर्य लागत असतें. आणि त्या धैर्याचा लेशहि या स्थितींत सुधाकराच्या ठायीं नव्हता. पुन्हा अगतिक अवस्था आली. कोर्टांतील भयंकर अवहेलना विसरण्यासाठी त्याच्या आत्यंतिक मनोवृत्तीने मागे दारूकडे धाव घेतली होती. आणि आताहि दुर्दैवाचे दशावतार पाहण्यास पूर्ण असमर्थ असलेल्या त्याच्या दुबळ्या मनाने, वैतागाने पुन्हा दारूकडेच धाव घेतली आहे. "सुदृढ मनालासुद्धां मृत्यूच्या उग्र रूपाकडे पाहतांना भीति वाटते, मग दारूबाज दुबळ्या मनाला[३६] एवढं धैर्य कुठून येणार ? दारूबाजाच्या ओळखीचं मृत्यूचं एकच रूप म्हणजे दारू ! तडफणाऱ्या जीवाच्या जाचण्या बंद करण्याचा[३७] दारूखेरीज आतां मार्ग नाहीं." आता मूल, पत्नी, सद्गुण, परमेश्वर, यांपैकी कशाचीहि सुधाकराला पर्वा नाही. साऱ्या जगाला 'निर्वाणीच्या निराशेंतला शेवटचा प्रणाम' करून जगाच्या रंगभूमीवरून कायमचें अंतर्धान पावण्याचीच त्याच्या मनाला आता तळमळ लागली आहे.

## हें स्थित्यंतर असंभाव्य नाही !

सुधाकराचें हें स्थित्यंतर प्रो. फडके यांना 'असंबद्ध' वाटत आहे. किंबहुना बंडगार्डनवरील सारा प्रवेशच ( अंक ४ प्र. ३ ) त्यांना 'असंभाव्य व असंबद्ध' वाटतो. "तीनचार दारूबाज नालायकांनीं नोकरी मागणाऱ्या सुधाकराशीं अश्लाघ्य वर्तन केलें म्हणून एकंदर जगाला विटून जाणाऱ्या सुधाकराचें मन अत्यंत उतावळें असल्याचा आरोप कोणीहि करील. 'जिथं कवडी किमतीच्या कंगालांनीं माझी पैजारांनीं पायमल्ली केली, तिथं सद्गुणी मनुष्याची सहानुभूति मला कशी मिळणार ?' ही सुधाकराची निराश उक्ति विनाकारण त्याच्या तोंडून बाहेर पडल्यासारखी वाटते ! ज्या लोकांजवळ सुधाकराने साहाय्य मागितलें ते बोलूनचालून त्याच्याच मताप्रमाणें 'दारूच्या

---

३६. आपल्या मनाच्या दुबळेपणाची सुधाकराने ही स्पष्ट कबुली दिलेली आहे.

३७. अंक १ प्र. ५ मध्ये 'अपमानाच्या जाचण्या सहन होत नाहींत' हें दिसून आल्यामुळें 'शरीराचा नाश केल्यावाचून मरणाची जोड देणारं एखादं विष' सुधाकराला हवें होतें. त्यावेळीं आत्महत्या ही त्याला 'नामर्दपणाची गोष्ट' वाटत होती. पण आता त्याच्या दुबळ्या मनाला आत्महत्या करण्याचें धैर्य नाही. त्यावेळीं यातना विसरण्यासाठी त्याला दारू हवी होती, आता मरण जवळ यावें यासाठी हवी आहे.

समुद्राच्या कांठावर बसलले नालायक' असे लोक होते. आणि ज्या सज्जनांपुढें जावयाची त्याला लाज वाटत होती ते त्याच्याच मताप्रमाणें 'उदार' होते. असें असतांना, दारूबाज 'क्षुद्र माणसांनीं' त्याचा अव्हेर केल्याबरोबर सुधाकरानें मुलासकट माणुसकीला, सिंधूसकट संसाराला, जगासकट जगदीश्वराला 'निर्वाणीच्या निराशेंतला शेवटचा प्रमाम' ठोकणें किती असंबद्ध आहे!"[३८] असें या प्रकरणीं प्रो. फडके यांचें प्रतिपादन आहे.

सुधाकराचें मन 'अत्यंत उतावळें' असल्याचा प्रो. फडके यांचा आरोप अगदी बरोबर आहे. सुधाकर हा आत्यंतिक मनोवृत्तीचा मनुष्य असून त्याचें मन पराकाष्ठेचें उतावीळ असल्यामुळेच आपल्या हातानें त्याने स्वतःचा घात करून घेतला आहे. आणि याच आत्यंतिक मनोवृत्तीमुळे बंडगार्डनवर दारूबाज दोस्तांनी केलेल्या अपमानाने त्याचें दुबळे मन खचतें, विषारी निराशा त्याला व्यापून टाकते, आणि मरणाचा विचार प्रबळ होऊन सर्व जगालाच 'निर्वाणीच्या निराशेंतला शेवटचा प्रणाम' करण्याचा तो निर्धार करतो. सुधाकराच्या स्वभावांतील मर्मस्थानें नीट लक्षांत घेतलीं तर या प्रकारांत 'असंभाव्य' असें कांहीहि दिसणार नाही, व तो 'असंबद्ध' तर मुळीच वाटणार नाही.

६३०

## बंडगार्डनवरील प्रवेशाचें कार्य

बंडगार्डनवरील प्रवेशाने एक उपयुक्त कार्य साधलें आहे. सुधाकराच्या स्वैर वर्तनाने व स्वैर बोलण्याने प्रतिष्ठित समाजांतील सज्जन त्याला दुरावले, आणि रामलालसारख्या हितचिंतक मित्राला व पद्माकर आणि बाबासाहेब यांच्यासारख्या जिव्हाळ्याच्या नातेवाईकांना त्याने आपण होऊन तोडून टाकलें. इतकेंच नव्हे तर तळिरामासारखा नरपशु त्याने आपला परममित्र मानला. साऱ्या संभावित व उदार जगाशीं फटकून राहिल्यावर आर्यमदिरामंडळांतील दारूबाज हेच त्याचे जिव्हाळ्याचे मित्र बनले. या मित्रांच्या जगांतच तो सुख मानीत होता. या प्रतिष्ठित समाजांतून उठल्यानंतर हे दारूबाज दोस्त हाच त्याचा एकमेव आधार होता. या दारूबाज दोस्तांचा त्याला वाटणारा आधार तुटावा अशीच मुळी गडकऱ्यांनी योजना केली आहे. हा शेवटचा आधार तुटल्यावर त्याला दुसरी कोणती गति आहे? ज्या माणसांच्या घोळक्यांत सुधाकराचें व्यसनी आयुष्य चाललेलें होतें त्यांच्या वृत्तींत भिनलेला अतिरिक्त नीचपणा सुधाकराच्या प्रतीतीला यावा याच उद्देशाने गडकऱ्यांनी लागोपाठ सहा जणांची

३८. 'मासिक मनोरंजन,' सप्टेंबर १९१९, पृ. ९३-९४

सुधाकराशीं भेट घडवून आणली आहे. आपण ज्यांच्यामध्ये वावरलों तीं माणसें नसून माणासांचीं रूपें असलेले पशु आहेत याचा साक्षात्कार घडल्याबरोबर सुधाकराचा उरलेला एकमेव आधार तुटला व तो वैतागला. बंडगार्डनवरील चवथ्या गृहस्थाने सुधाकराला नोकरीसंबंधीं मानभावीपणाने उपदेशाचे शब्द ऐकवले व त्याची चेष्टा केली, हा प्रकार बाह्यात्कारीं विनोदी भासला तरी त्यांत मानवी जीवनांतील विसंगतींवर केलेली विदारक उपहासगर्भ टीका आहे हें विसरणें योग्य नाही. ढोंगीपणा हें अनेक वेळां अंतर्यामींच्या नीचपणाचें केवळ बाह्य रूप असतें. या नीचपणाचें साक्षात् दर्शन झाल्यामुळे आणि अगतिक झाल्यामुळे सुधाकराचें मन विषारी निराशेने भरून गेलें व त्याचा वैताग अतिरेकाला जाऊन मरणाचे विचार त्याच्या मनांत थैमान घालूं लागले तर त्यांत असंभाव्य किंवा असंबद्ध असें कांहीहि नाही.

## निर्वाणीच्या निराशेंतील वैताग

आपल्या आयुष्याचा शेवट कोणत्या प्रकारें होणार आहे तें सुधाकराला कळून चुकलें आहे. मृत्यु हाच आपला एकटा एकच मित्र व हितकर्ता उरलेला आहे अशी खात्री झाल्यामुळे त्या मित्राच्या भेटीची तीव्र उत्कंठा त्याला लागली आहे. मृत्यूची शक्य तितक्या त्वरेने भेट होण्याचें साधन दारू हेंच होय असें आताच्या मनःस्थितीमुळे त्याला वाटूं लागलें आहे. ज्या मदिरेने आतापर्यंत त्याचा घात केला त्याच मदिरेचें साहाय्य घेऊन सर्वस्वाचा घात करण्याची ईर्ष्या त्याच्या ठायीं प्रबळ झाली आहे. मध्यंतरीं थोडा वेळ जो विलक्षण मनोनिग्रह त्याने केला होता तो अमर्याद होतांच त्याच्या मनाचा तोल सुटतो; व संयमाचा पूर्ण त्याग करून अतिरेक–अगदी घातकी अतिरेक–करावयाचा, प्राण जाईपर्यंत अतिरेक करावयाचा, असले कांही भीषण विचार त्याच्या मनांत थैमान घालूं लागतात.

या विचारांच्या संभ्रमांत तो घरीं सिंधूकडे परत न जातां थेट मदिरामंडळांत जातो, आणि एकदम पेला भरतो. शास्त्री व खुदाबक्ष त्याची चेष्टा करीत आहेत. त्याला तें दिसतें. पण कोणाच्याहि चेष्टेचा कसलाहि परिणाम आता त्याच्यावर होणें शक्य नाही. ज्या मूर्ख जोडीदारांच्या पशुतुल्य वर्तनामुळे तो वैतागला त्याच जोडीदारांच्या सहवासांत परत येणें त्याला भाग पडलें आहे. जी दारू सोडून देण्याची शपथ त्याने नुकतीच घेतली होती त्याच दारूच्या गळ्यांत पुन्हा घट्ट मिठी मारण्यासाठी तो धावत आला आहे. मित्र म्हणविणाऱ्या लोकांनी आपलें नांव टाकलें व आपली हेटाळणी केली याचा त्याला अत्यंत कटु अनुभव थोडयाच वेळापूर्वी बंडगार्डनवर आला होता. साऱ्या जगाने आपलें

नांव टाकलें व ओळख सोडली, तरी दारू तसें कधीहि करणार नाही, साऱ्या जगाने अप्रामाणिकपणा व मानभावीपणा दाखविला तरी दारू मात्र तसें कधीहि करणार नाही, या विश्वासामुळे एका दारूखेरीज त्याला आता गत्यंतर उरलें नाही. यापुढे सुधाकराच्या तोंडून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द निर्वाणीच्या निराशेंतल्या तीव्र कडवटपणांत अंतर्बाह्य घोळलेला आहे. या अवस्थेंत स्थिर विचार, समजूतदारपणा, कुटुंबाच्या जबाबदारीची जाणीव, आपल्या भीषण भवितव्याची जाणीव, इत्यादि गोष्टी हां हां म्हणतां विरून गेल्या तर त्यांत कसलेंहि नवल नाही. "माझ्या जोडीदार मूर्खांनो, तुम्हांला माझ्या स्वभावाची परीक्षा झाली असें नाहीं, पण मला माझ्या दुर्दैवाची परीक्षा झाली नाहीं ! ......यावेळीं मला छेडूं नका ! जखमी झालेल्या सिंहाचं[३९] विव्हळणं ऐकूनसुद्धां भेकड सावजांना दूर व्हावं लागतं ! मला हंसायचं आहे? माझी कुचेष्टा करायची आहे? करा, खुशाल करा. पण एका बाजूला जाऊन करा !......सुधाकर ज्या रस्त्यानं जाणार आहे तिथं संगतीसोबतीची त्याला जरूरी नाहीं." मदिरामंडळांतील नरपशु यानंतर त्याच्या डोळ्यांसमोरून अदृश्य झाले. आता फक्त मदिरा तेवढी उरली आहे. मदिरेला शरण गेलेल्या सुधाकराला तिच्या सामर्थ्याचा व मोठेपणाचा अपार गौरव करण्यावाचून इलाज नाही. "मदिरे, तूं देवता नाहींस, हें नव्यानं सांगायला जगांतल्या पंडितांचा तांडा कशाला हवा? तुझ्या जुलमी जादूनं जडावलेल्या जनावरालासुद्धां कळतं कीं, तूं एक राक्षसी आहेस ! तूं घातकी राक्षसी आहेस ! तूं क्रूर राक्षसी आहेस ! पण तूं प्रामाणिक राक्षसी आहेस ! गळा कापीन म्हटल्यावर तूं गळाच कापीत आली आहेस ! घरादाराचा सत्यानाश करण्याचं वचन देऊन तूं कधीं अन्यथा कृति केली नाहींस ! मृत्यूच्या दरवाज्यापर्यंत सोबत करण्याचं कबूल केल्यावर तूं कधीं माघार येत नाहींस ! सुंदर चेहेऱ्याचं तुझ्यामुळं भेसूर सोंग झालं तरी त्या चेहेऱ्याची तुला चटकन् ओळख पटते ! एखाद्याचं नांव बुडविलंस तरी अनोळखी पाजीपणानं तूं त्याचं नांव टाकीत नाहींस ![४०] चल, मदिरे ! आपल्या अघोर, घातुक शक्तीनं, सुधाकराच्या गळ्याला मगरमिठी मार ! मग या कंठालिंगनानं सुधाकराचे प्राण कंठाशीं आले तरी बेहेत्तर !" (अंक ४ प्र. ४)

---

३९. निर्वाणीच्या निराशेंतला वैताग अतिरेकाला गेलेला असला तरी आपल्या पूर्वीच्या तेजस्वीपणाचा सुधाकराला विसर पडूं शकत नाही हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

४०. चिरपरिचित दोस्तांनी ओळख न देण्याचा जो प्रकार बंडगार्डनवर केला त्याची कडु आठवण सुधाकराच्या मनांत सतत घोळत आहे. 'पाजी संभावितपणा,' किंवा 'अनोळखी पाजीपणा' यांच्या अनुभवाने विटलेल्या व वैतागलेल्या सुधाकराच्या' दृष्टीने मदिरा क्रूर व घातक असली तरी अत्यंत प्रामाणिक आहे.

## मदिरेच्या अपार सामर्थ्याचा महिमा

मदिरेच्या अपार सामर्थ्याची सुधाकराला स्वतःला जी घोर प्रतीति आली आहे तिच्यामुळेच तो तिच्या सामर्थ्याचा महिमा वर्णीत आहे. केवळ स्वतःच्या दृष्टीनेच तो साऱ्या जगाकडे पाहत आहे. जग त्याला स्वतःला जसें दिसलें व मदिरेचा त्याला स्वतःला जो अनुभव आला, त्यांचाच आविष्कार यावेळीं तो अत्यंत उत्कटतेने करीत आहे. दुसऱ्याच्या डोळ्यांनी जगाकडे पाहण्याची शक्ति त्याच्या ठायीं केव्हाहि नव्हती, आणि आता निर्वाणीच्या निराशेमध्ये तर तो पूर्णपणें स्वयंकेंद्रित झाला आहे. या स्वयंकेंद्रित अवस्थेंत स्वतःपलीकडे त्याला जगच उरलेलें नाही. ज्या आत्यंतिक मनोवृत्तीने त्याच्या स्पृहणीय आयुष्याला आडवाटेला नेलें व त्याचा घात केला, त्याच आत्यंतिक मनोवृत्तींची तीव्रता निर्वाणीच्या निराशेंत कमालीची दाहक न झाली तरच नवल! यामुळेच वस्तु, घटना, दृश्यें अथवा कल्पना यांची मूळ स्थिति पालटून त्या यावेळीं त्याच्या मनांत ज्या साकार झाल्या आहेत त्या प्रमाणशून्य व अतिरंजित अशाच आहेत. त्याची कल्पनाशक्ति यावेळीं प्रमाणाबाहेर तरल झाली आहे. यामुळे त्याच्या मनांत तरळणारीं प्रतिमानें देखील कमालीचीं अतिरंजित तरी झालीं आहेत, किंवा कमालीचीं भव्य व उत्तुंग तरी झालीं आहेत. मदिरेच्या अद्‌भुत सामर्थ्याचें तो वर्णन करीत असो, अथवा मृत्यूच्या सामर्थ्याचें वर्णन करीत असो, या अतिरंजित, भव्य व उत्तुंग प्रतिमानांचेंच विलसित सर्वत्र दिसून येईल. "कोवळ्या पाडसाचा अघोर घांस ओढून घेण्यासाठीं आधीं वाघाच्या उपाशी जबड्यांत हात घाल; गिळलेला मणी उगाळून घेण्यासाठीं दृष्टाळलेल्या नागाच्या तोंडांत हात घाल; आणि मग माझ्या समोरचा हा प्याला उचलण्यासाठीं आपला तो हात पुढें कर!...... अजाण मुला,[४१] दारू ही एक शक्ति आहे, दारू हें काळाच्या भात्यांतलं अस्त्र आहे, दारू ही जगाच्या चालत्या गाड्याला घातलेली खीळ आहे......हजारों परोपकारी पुरुषांनी आपल्या देहांचीं धरणं बांधलीं तरीसुद्धां जिचा अखंड ओघ चारी खंडांत महापुरानं वाहत राहिला, वेदवेदांचीं पानं जिच्या ओघावर तरंगत गेलीं, कठोर शक्तीचे राजदंड जिच्या गाळांत रुतून बसले ती दारू म्हणजे कांहीं सामान्य वस्तु नव्हे! दारूची विनाशक शक्ति तुला माहीत नाहीं!

---

४१. बुद्धिमत्तेच्या विलक्षण अभिमानामुळे आपल्याशिवाय बाकीचे सारे लोक बेअकल आहेत अशीच साऱ्या हयातभर सुधाकराची कल्पना होती. निर्वाणीच्या निराशेंतल्या या शेवटच्या क्षणीं सुद्धा रामलालला देखील 'अजाण मुला,' या शब्दांनी तो संबोधत आहे.

मुसळधार कोसळणाऱ्या पावसांत टिकाव धरून राहणारी इमारत दारूच्या शिंतोड्यांनी मातीला मिळेल ! .....वाटेल तो बत्तीसलक्षणी आणि सर्वसद्गुणी पुरुष पुढें उभा कर आणि त्याच्यावर दारूचे चार थेंब टाक; डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोंच तुला त्या मनुष्याचा अगदीं पशू झालेला दिसूं लागेल !"[४२]

## वैयक्तिक अनुभूतींतून झालेला भावनोद्रेक

आपल्या स्वतःच्या आयुष्यांत सुधाकराला जो अनुभव आला तो आपल्यापुरताच मर्यादित नसून प्रत्येक दारूबाजाच्या बाबतींत तो खरा असलाच पाहिजे असें त्याला वाटत आहे. याचाच अर्थ असा की, तो आपल्या दृष्टीनेच साऱ्या जगाकडे बघत आहे, आपल्या अनुभवाचा तो साऱ्या जगावर अध्यारोप करीत आहे. अतिरेकाला गेलेली आत्मकेंद्रित वृत्तीच याच्या मुळाशीं आहे. आणि यामुळेच "प्रत्येक व्यसनी मनुष्याच्या दारूबाज आयुष्याच्या संमोहावस्था, उन्मादावस्था व प्रलयावस्था अशा तीन अवस्था हटकून होतात" असें 'प्रत्येक' दारूबाज माणसाच्या बाबतींत सुधाकर विधान करीत आहे. व्यसनी माणसाच्या दारूबाज आयुष्यांतील तीन अवस्थांचें जें इतकें तपशीलवार वर्णन सुधाकराने केलें आहे तें कांही टीकाकारांना आक्षेपार्ह वाटतें. उदाहरणार्थ, श्री. खांडेकर म्हणतात—"तासापूर्वी नोकरी मिळाली असती तर ज्यानें दारू सोडून दिली असती, तो सुधाकर आतां दारू पीत पीत रामलालच्या पुढें मद्यपानाची मीमांसा करूं लागतो. दारूचें व्यसन लागण्याचीं निरनिराळीं कारणें, दारूबाजीनें झोंपडीपासून राजवाड्यापर्यंत सर्वत्र व सर्वकाळ मांडलेला प्रलय, दारूबाजीच्या तीन अवस्था इत्यादि विषयांवरील त्याच्या लांबलचक व्याख्यानाकरतां गडकऱ्यांनीं जवळजवळ दहा पृष्ठें खर्च केलीं आहेत. कल्पकता, परिणामकारकता आणि मद्यपानाच्या व्यसनाची चिकित्सा या दृष्टीनें हीं पृष्ठें अत्यंत वाचनीय आहेत. पण या भाषणांतील भावनात्मक भाग सुधाकराच्या तोंडीं ठेवून विवेचनात्मक भाग प्रस्तावनेच्या रूपानें वाचकांना सादर करणें कलेच्या दृष्टीनें इष्ट होतें. रंगभूमि, स्वाभाविकता व नाटकांतील रस या

---

४२. स्वतःच्या विलक्षण कडू अनुभवांमुळेच सुधाकर हें बोलत आहे. केवळ आपल्याच दृष्टीने तो जगाकडे बघत आहे. आणि यामुळे दारूच्या भयंकर परिणामांचें तो स्वैरपणें वर्णन करीत आहे. सुधाकराच्या तोंडून दारूच्या दुष्परिणामांवर व्याख्यान देण्याची खुद्द गडकऱ्यांचीच इच्छा आहे असें म्हणतां येणार नाही. व्यसनासक्त झालेला भगीरथ व्यसनमुक्त होतो, व आर्यमदिरामंडळांतील कांही लोक पूर्ण व्यसनी असूनहि सुखी व वैभवाचें आयुष्य भोगीत आहेत, हें त्यांनीच दाखविलें आहे हा याला पुरावा होय.

तिन्हींच्याहि दृष्टीनें सुधाकराचीं लांबलचक व्याख्यानें थोडीं सदोष वाटतात."[४३] दारूबाजाच्या व्यसनी आयुष्यांतील तीन अवस्थांचें किंवा दारूच्या दुष्परिणामांचें तात्त्विक विवेचन सुधाकराला करावयाचें आहे असें जें खांडेकरांना वाटतें तेंच मुळांत बरोबर नाही. निर्वाणीच्या निराशेने वैतागलेल्या सुधाकराच्या भावनोद्रेकाचाच हा अत्यंत उत्कट आविष्कार आहे. प्रत्येक दारूबाजाच्या बाबतींत सुधाकर बोलत आहे असें त्याच्या भावनोद्रेकांत कांही ठिकाणीं 'प्रत्येक' असा जो शब्द आला आहे त्यावरून भास होण्याचा संभव असला तरी 'प्रत्येक दारूबाज' असा त्याच्या तोंडचा उल्लेख जगाला लागू नसून फक्त त्याला स्वतःलाच लागू आहे हें विसरणें बरें नाही. आपल्याच दृष्टीने यावेळीं तो जगाकडे बघत आहे. यामुळे आपली जी अवस्था तीच प्रत्येकाची अवस्था असली पाहिजे असें आताच्या मनःस्थितींत त्याला वाटणें स्वाभाविक आहे. वस्तुस्थिति अशी आहे की, "कसला कपाळाचा तो निश्चय!" या वाक्यापासून सुरू होणारें व "तो निकाल जवळ आणण्यासाठीं अशी भराभर दारू पीत बसणं एवढंच या जगांत माझं काम आहे" या वाक्याशीं संपणारें सुधाकराचें चार पानी भाषण म्हणजे दुसरें तिसरें कांही नसून त्याच्या स्वतःच्या व्यसनी आयुष्यांतील वैयक्तिक अनुभवांचा अतिशय उत्कट आविष्कार आहे. या 'लांबलचक' भाषणांत तात्त्विक विवेचन अथवा 'मद्यपानाच्या व्यसनाची चिकित्सा' वगैरे कांहीहि नसून उत्कटतेच्या परिसीमेला पोचलेल्या भावनांचा हा तितकाच उत्कट उद्रेक आहे; हें सुधाकराचें उत्कट आत्माविष्करण आहे. आणि उत्कटतेची परिसीमा झालेली असल्यामुळे हा भावनोद्रेक काव्याच्या सरहद्दीवर घोटाळत आहे. हा वेळपर्यंत सुधाकराला आत्माविष्करण करण्याची एकहि संधि मिळाली नव्हती. यामुळे हें त्याचें उत्कट आत्माविष्करण अस्थानीं आहे असें कसें म्हणतां येईल? नाटकाचा प्रयोग करणाऱ्या धंदेवाईक कंपन्यांना व्यवहाराच्या सोयीच्या दृष्टीने सुधाकराचीं हीं भाषणें फार मोठीं वाटलीं तरी उत्कट आत्मानुभूतींचा उत्कट आणि काव्यात्म आविष्कार ज्यांना स्पृहणीय वाटतो अशा रसिकांना तरी सुधाकराच्या या भावनोद्रेकाची थोरवी समजली पाहिजे. सुधाकराने आपल्या व्यसनी आयुष्यांतील किती तरी सूक्ष्म व मार्मिक अनुभव अगदी मोकळेपणाने नमूद केले आहेत. त्यांची उपेक्षा करून कसें चालेल? व्यसनी आयुष्यांतील विविध अवस्थांतरांची मानसशास्त्रीय चिकित्सा करणाऱ्या तात्त्विक विवेचकांनाहि सुधाकराच्या या आत्माविष्कारांत विपुल सामग्री

---

४३. 'गडकरी (व्यक्ति व वाङ्मय)', द्वितीयावृत्ति, पृ. १९५–१९६.

मिळेल.[४४] सुधाकराची भूमिका विवेचकाची अथवा चिकित्सकाची नसून त्याला केवळ आपल्या गतायुष्यांतील अनुभवांचा उत्कट आविष्कार करावयाचा आहे. 'प्रत्येक दारूबाजाचा' त्याने पुन्हा पुन्हा उल्लेख केलेला असला तरी त्याने फसण्याचें कारण नाही. सुधाकराच्या वैयक्तिक अनुभवांचा अत्यंत प्रामाणिकपणें झालेला हा उत्कट आविष्कार आहे. "दारूची संवय सुटण्याची एकच वेळ असते आणि ती म्हणजे प्रथम दारू पिण्यापूर्वीचीच" हें अत्यंत कटु सत्य त्याला स्वतःच्या अनुभवाने समजलें आहे. "मद्यपानाचे भयंकर दुष्परिणाम भावी काळीं आपल्याहि ठिकाणीं शक्य आहेत अशी दूरदृष्टीनं भाग्यशाली जाणीव झाली तर एखादा नवशिका दारूबाज अतिशय करारीपणानं, पोलादी निश्चयानं आणि अनिवार विचारशक्तीनं पहिल्या अवस्थेंत असतांना एखादे वेळीं तरी दारूचं व्यसन सोडायला समर्थ होईल पण या दुसऱ्या अवस्थेंत कांहीं दिवस घालविल्यानंतरहि दारूच्या पकडींतून अजिबात सुटणारा मनुष्य मात्र अवतारी ताकदीचा, ईश्वरी शक्तीचा आणि लोकोत्तर निग्रहाचाच असला पाहिजे" हें सुधाकराने स्वतःच्याच अनुभवांचें मोठें मार्मिक विश्लेषण केलें आहे. दूरदृष्टीचा अभाव, पोलादी निश्चयाचा अभाव, विचारशक्तीचा अभाव, आणि निग्रहाचा अभाव, हीं सारीं वैगुण्यें आत्यंतिक मनोवृत्ति असलेल्या सुधाकराच्या स्वभावांत अगदी भिनलेलीं आहेत. आणि यामुळेच, एकदा जो दारूच्या मोहाला बळी पडला तो तिचा 'कायमचा गुलाम' झाला हा त्याच्या स्वतःच्या अनुभवाचाच बोल आहे. दुसरे लोक (उदाहरणार्थ, भगीरथ) व्यसनाच्या आहारीं गेल्यावरहि व्यसनांतून कायमचे मुक्त होऊन चांगलें आयुष्य घालविण्याची शक्यता आहे; इतर अनेक लोक व्यसनांत आकंठ बुडूनहि आपलें आयुष्य मार्गावर ठेवूं शकतील; पण सुधाकरासारख्या आत्यंतिक मनोवृत्तीच्या माणसाला मात्र हें जमावयाचें नाही.

---

४४. उदाहरणार्थ— "दारूच्या आणखी तिसऱ्या परिस्थितींतले दुष्परिणाम त्याच्या इष्टमित्रांनी या वेळीं दाखविले म्हणजे ते त्याला अजिबात खोटे, अतिशयोक्तीचे किंवा निदान दुसऱ्याच्या बाबतींत खरे असणारसे वाटूं लागतात. सुरवातीच्या प्रमाणशीरपणामुळं स्वतःचं व्यसन त्याला शहाण्या सावधपणाचं वाटतं आणि अवेळीं दाखविलेलीं हीं चित्रं पाहून, आपले इष्टमित्र भ्याले असतील किंवा आपल्याला फाजील भिवविण्यासाठी तीं दाखविलीं जातात, अशी तरी स्वतःची मोहक फसवणूक करून घेऊन दारूबाज आपल्या उपदेशकांना मनांतून हसत असतो......परंतु मनुष्याच्या मनावर आणि शरीरावर संवयीचा असा एक परिणाम घडतो कीं, आज एका गोष्टीचा जितक्यामुळं जो परिणाम होतो तोच तितक्यामुळं उद्यां होत नाहीं." (अंक ४ प्र० ४)

त्याचा पिंडच याला अनुकूल नाही. स्वभावांतील— किंवा रक्तांतील म्हणा— कांही तरी विचित्र वैगुण्यच याला जबाबदार असलें पाहिजे. "[४५]

## मृत्यूची अनावर ओढ

सुधाकराला सकाळींच घडलेल्या रमणीय गोष्टींची चांगली आठवण आहे. त्याने दारू सोडण्याची शपथ घेतल्यामुळे सिंधूला झालेला उत्कट आनंद, त्याच्या स्वतःच्या मनांत निर्माण झालेला उत्साह— सारें कांही त्याला आठवत आहे. आपल्या चिमुकल्या जगांतला हा शेवटचाच आनंद आता दारूंत बुडविण्याचा त्याचा निर्धार झाला आहे. पश्चात्तापाच्या अवस्थेच्या किती तरी पलीकडे तो आता गेला आहे. त्याचा प्रत्येक शब्द 'विषारी निराशें'तून घोळून निघत आहे. मरण शक्य तितक्या जवळ आणणें हा एकच ध्यास त्याला आता लागला आहे. "तो निकाल जवळ आणण्यासाठीं अशी भराभर दारू घेत बसणं एवढंच या जगांत माझं काम आहे."

आता त्याचें मन मृत्यूच्या भीषण साम्राज्याकडे धाव घेऊं लागलें आहे. स्थलकालाच्या साऱ्या कल्पना विरून जाऊन आता त्याचें मन जीवन आणि मृत्यु यांच्या सीमारेषेवर घुटमळत आहे. मृत्यु हाच त्याच्या दृष्टीने आता 'जिवलग मित्र' आहे, 'निस्सीम हितकर्ता' आहे. त्याच्या सन्मानाचा प्रयत्न करणें हें सुधाकराला कर्तव्य वाटत आहे. "अशा परोपकारी काळपुरुषाला दोन पावलं आणायला गेलं तर त्यांत आपली माणुसकी दिसून येऊन त्याचे तेवढे कष्ट वाचतील..... मी ही आत्महत्या करीत आहें, तिचाच मला खून चढत चालला आहे!" (अंक ४ प्र. ४) मानवांचें विश्व ओलांडून अनंताच्या काळोखांत त्याचे विचार प्रवेश करूं लागले आहेत. या काळोखांतच त्याच्या यातनांचा शेवट होणार आहे, त्याच्या त्रस्त व निराश मनाला शांतता लाभणार आहे. जहरी निराशेचा हा शेवटचा क्षण आहे. मृत्यूची चाहूल त्याला लागलेली आहे. मृत्यु डोळ्यांसमोर दिसत आहे. आता त्याच्या विचारांवर मृत्यूच्या

---

४५. 'रीडर्स डायजेस्ट' या विख्यात नियतकालिकाच्या जून १९५४ च्या अंकांत एब्राहम स्टोन या डॉक्टरांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. या लेखांत डॉ. फ्रँक कॅप्रियो या तज्ज्ञाचें एक अवतरण लेखकाने घेतलें आहे. सुधाकराच्या ठायीं दिसणारी आत्यंतिक मदिरासक्ति ही त्याच्या स्वभावांतील एखाद्या मूलभूत व दृढमूल वैगुण्यांतूनच निर्माण झालेली असली पाहिजे असें फ्रँक कॅप्रियोच्या विधानावरून दिसतें. फ्रँक कॅप्रियो म्हणतो—" Infidelity, like alcoholism or drug addiction, is an expression of a deep basic disorder of character which has its roots in childhood experiences."

दरबाराची सत्ता सुरू झाली आहे. मृत्यूच्या भयानक स्वरूपाशीं त्याची दृष्टि एकरूप झाली आहे. अशा या स्थितींत मानवी जीवनांतील सारीं भावबंधनें विरून गेलीं तर नवल नाही. त्याच्या मनोवृत्ति बधिर होऊन गेल्या आहेत, किंबहुना सारीं चांगलीं मूल्येंच उफराटीं झालीं आहेत. मानवी मनांतील उपजत सद्भावनांचा लोप होऊन त्यांची जागा विकृत क्रूरपणाला ज्या कडवट निराशेच्या अतिरेकाच्या क्षणीं घेतां येते तो क्षण यावेळीं सुधाकराच्या आयुष्यांत आला आहे. " मनुष्यहृदयांतल्या सहज काव्यस्फूर्तीतहि हा दृष्टींतला क्रूरपणा खेळूं लागतो. अशा वेळीं तीव्र निराशेनं कडवटलेल्या मृत्यूच्या क्रूर काव्यदृष्टीनं पाहतांना सुंदर वस्तूंबद्दलसुद्धां भयाण कल्पना आठवतात. त्या दृष्टीनं पाहतांना, आईच्या मांडीवर समाधानानं स्तनपान करणारं मूल दिसलं कीं, तें तिथल्या तिथं मेलं तर त्या आईला काय दुःख होईल, असं चित्र अशा क्रूर कल्पनेपुढं उभं राहतं ! हळदीनं भरलेली नवी नवरी पाहतांच वपनानंतर ती कशी दिसेल याबद्दल कल्पना विचार करूं लागते ! रामलाल, मी हल्लीं त्या अवस्थेंत आहे आणि माझ्या कल्पनेला मद्यपानाच्या ज्योतीची ज्वाला प्रदीप्त करीत आहे ! अशा वेळीं मी उचंबळून बोलत आहें ! "

## निर्वाणीच्या निराशेंत स्फुरलेलें काव्य

'अशा वेळीं मी उचंबळून बोलत आहें !' हा सुधाकराचा उद्गार किती यथार्थ आहे ! त्याच्या मनांत यावेळीं तरळत असलेल्या क्रूर व भीषण कल्पनांबद्दल त्याला दूषण देण्याचा विचार आपल्या मनांत उत्पन्न होण्याइतका अवसरच नाही. कारण सुधाकराचें यानंतरचें प्रत्येक वाक्य म्हणजे भव्य व उत्तुंग प्रतिमानांनी ओसंडून वाहणारा कल्पनेचा अप्रतिहत विलासच होय. प्रत्येक प्रतिमान विशाल आहे, प्रत्येक प्रतीक भव्य आहे. ऐन पावसाळ्यांत एखादा खळाळणारा डोंगरी ओढा ज्याप्रमाणें अनावर वेगानें खडकावरून झेपावत जात असतो व पाहणाराची दृष्टि ठरूं देत नाही, त्याप्रमाणें सुधाकराच्या या वेळच्या प्रत्येक उद्गाराचें स्वरूप आहे. यांत काव्य आहे, पण तें उत्तुंग गिरिशिखराप्रमाणें भव्य आहे. त्यांत आवेग आहे पण तो शेंकडो फूट उंचीवरून खाली कोसळणाऱ्या प्रचंड धबधब्याचा आवेग आहे. सुधाकराच्या या वेळच्या काव्यात्म उद्गारांत जी भव्यता आहे, जो आवेश आहे, जें थरारणारें चैतन्य आहे, तशा प्रकारची भव्यता, तसा आवेश, किंवा तें चैतन्य मराठी नाट्यवाङ्मयांत अक्षरशः अभूतपूर्व असेंच आहे. या काव्यांतील भावनांचा आवेग जितका अनावर आहे तितकीच त्याच्यांतील लयबद्धताहि मनाला भारून टाकणारी आहे. सबंध विश्वाला पालाण घालण्याची ईर्ष्या त्यामध्ये आहे. अनादि काळापासून चालत आलेली भवितव्यतेची अप्रतिहत क्रीडा, आणि

त्या क्रीडेपायीं चिरडून जाणारा दुबळा मानव व त्याचें आर्त आक्रंदन, यांचीं विदारक चित्रें रंगविणाऱ्या या काव्यांत अथांगपणा आहे व भव्यपणा आहे:

"......खवळलेले सप्तसमुद्र सूडाच्या बुद्धीनं या इवल्याशा टीचभर प्याल्यांत सामावून बसले; आणि आदित्यानं आपली जाळण्याची आग त्यांच्या मदतीला दिली! मनुष्याच्या दृष्टीला भूल पाडणारा मोहकपणा आणण्यासाठीं तरण्याताठ्या विधवांच्या कपाळाचं कुंकू कालवून या बुडत्या आगीला लाल तजेला आणला! ......नीट पहा, म्हणजे श्रीकृष्णाच्या तोंडांत विश्वरूपदर्शनप्रसंगीं यशोदेला जे चमत्कार दिसले नसतील ते या रिकाम्या प्याल्यांत तुझ्या दृष्टीला पडतील. काबाडकष्ट उपसून आलेला थकवा घालविण्याच्या आशेनं दारू पिणाऱ्या मजुरांच्या या पहा झोपड्या! निरुद्योगाचा वेळ घालविण्यासाठीं म्हणून दारू पिणाऱ्या श्रीमंतांच्या या हवेल्या! केवळ प्रतिष्ठितपणाचं लक्षण म्हणून चोचल्यानं दारू प्यायला शिकलेल्या पढतमूर्खांचा हा तांडा! अक्कलेच्या मार्गानं न साधणारी गोष्ट मजलशींत एखाद्याजवळ साधून घेण्यासाठीं धूर्ततेनें त्याच्याबरोबर थोडीशी घ्यायला लागून पितां पितां शेवटीं स्वतःही बुडालेल्या व्यवहारपंडितांची ही पागा! उद्योगी गरीब, आळशी श्रीमंत, साक्षर पढतमूर्ख, निरक्षर व्यवहारी, सर्वांना सरसकट जलसमाध देणारा हा पहा एकच प्याला! दारूबाज नवऱ्यांच्या बायकांचीं हीं पहा पांढरीं फटफटीत कपाळं! दारूबाजांच्या पोरक्या पोरांच्या या उपासमारीच्या किंकाळ्या! कर्त्यासवरत्या मुलांच्या अकालीं मरणानं तळमळणाऱ्या वृद्ध मातापितरांचं विव्हळणं! चोरीस गेलेल्या चौदा रत्नांच्या मोबदल्यासाठीं या एकच प्याल्यांत सामावलेल्या सप्तसमुद्रांनीं दारूच्या रूपानं भूमातेचीं कैक नररत्नं अकालीं पचनीं पाडलीं! स्त्रीजातीला नटविण्यासाठीं समुद्राच्या उदरांतून जितकीं मोतीं बाहेर निघालीं त्याच्या दसपट आसवांचीं मोतीं दारुमुळं स्त्रीजातीनं या एकच प्याल्यांत टाकलीं आहेत! बेवारशी बायकांची बेअब्रू, बेशरम बाजारबसव्यांची बदचाल, बेकार बेरडांची बदमाषी, बेचिराख बादशहाती, जिवलग मित्रांच्या मारामाऱ्या, दगलबाजी, खून — रामलाल, हा पहा, जगावर अंमल चालविणारा बादशहा शिकंदर, दारुच्या अमलाखालीं केवळ मारेकरी बनून आपल्या जिवलग मित्राचा खून करीत आहे! तो पहा, मेलेल्याला सजीव करणारा दैत्यगुरु शुक्राचार्य आपल्या त्या संजीवनीसह या एकच प्याल्यांत स्वतःच मरून चूर झाला आहे! जगाच्या उद्धारासाठीं अवतरलेल्या श्रीकृष्णपरमात्म्याचे हे पहा छप्पन्न कोटि यादववीर दारूच्या एकच प्याल्यांत बुडून अधःपात भोगीत आहेत!......अनादिकालापासून समुद्रांत बुडालेलीं जहाजं, मनुष्यसंसाराचा अफाट पसारा, हीं सारीं एकवटून लक्षांत आणलीं म्हणजे सामान्य मनुष्यबुद्धीला त्या सर्वांनीं गजबजलेला समुद्राचा तळ भयानक वाटूं लागतो!......"

सुधाकराचे हे उद्‌गार म्हणजे केवळ आलंकारिक भाषेच्या हव्यासांतून निर्माण झालेलें शोभाकर काव्य आहे, अथवा भीषणतेच्या अतिरेकामुळे मनावर पडलेलें दडपण थोडेंसें कमी करून त्याला थोडा विरंगुळा द्यावा यासाठी त्याची योजना गडकऱ्यांनी केली आहे, अशी कल्पना करणें योग्य होणार नाही. सुधाकराच्या मनांत विषारी निराशेचा अतिरेक झाल्यामुळे मृत्यूचे जे विचार तांडव करीत आहेत त्या विचारांचीच ही अपरिहार्य परिणति आहे असेंच मानलें पाहिजे. जें 'उग्र आणि भयानक चित्र' सुधाकराच्या अंतश्चक्षूं-समोर तरळत आहे तेंच या ठिकाणीं अनेक प्रतिमानांच्या साहाय्याने साकार झालें आहे इतकेंच.

## दुर्दैवी जीवनाचें भीषण भरतवाक्य

आणि उचंबळून आलेल्या या अवस्थेंतच सुधाकर घरीं जातो. त्याचे लटपटणारे पाय पाहतांच सिंधूला ब्रह्मांड आठवतें. त्याला कशाचीहि शुद्ध राहिलेली नाही. सिंधू आपल्याला दारूसाठी पैसे देत नाही आणि मुलाच्या दुधासाठी ते देते हें पाहतांच थोडा वेळ दडपून टाकलेली त्याची पशुवृत्ति जागी होते आणि त्या भरांत तो सिंधूला वाटेल तें बोलूं लागतो. "तें कारटं त्या रामलालचं आहे ! माझं नाहीं !"[४६] असला अभद्र उद्‌गार काढण्यापर्यंत त्याची मजल जाते. संतापाच्या भरांत तो मुलाला काठी मारतो व मूल तत्काळ मरतें. मुलाला वाचविण्यासाठीं पुढे आलेल्या सिंधूलाहि जबर जखम होते व ती बेशुद्ध होऊन खाली पडते.

पूर्वी एकदा ( अंक ४ प्र. २ ) सिंधूच्या दारुण यातना प्रत्यक्ष दिसतांच ज्याप्रमाणें त्याचे डोळे उघडले होते त्याप्रमाणें आताहि आसन्नमरण सिंधूच्या यातना पाहून त्याचे डोळे पुन्हा साफ उघडतात. सिंधू आता जगत नाही हें त्याला कळून चुकलें आहे. मागे आत्महत्या करण्याचा त्याला धीर होत नाही. ( अंक ४ प्र. ३ ) आणि मरण जवळ आणण्यासाठी तो पुन्हा दारूंतच बुडतो. पण आता ती चूक त्याला पुन्हा करावयाची नाही. जलाल विष दारूंत कालवून तें विष तो पिऊन टाकतो. विष अंगांत भिनूं लागलें असतां त्याच्या तोंडून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द कमालीचा कडू आहे. "या सुधाकराचं जग दारूच्या एकच प्याल्यांत बुडून गेलं !" हें त्याच्या दुर्दैवी संसाराचें भरत-वाक्य आहे !

---

४६. सुधाकराच्या या विचित्र उद्‌गाराचें मूळ अंक ३ प्र. ४ मधील "तुमची सनद गेली त्यावेळीं थानं बाईसाहेबांना मिठी मारली !" या तळिरामाच्या उद्‌गारांत आहे हें मागे स्पष्ट केलेंच आहे. पृष्ठ ९ पाहावें.

## निर्वाणीच्या निराशेंतील व्यक्तित्वाचा आविष्कार

नाटकाच्या सुरवातीला सुधाकराच्या सुखी कौटुंबिक जीवनाचें मोठें आकर्षक चित्र गडकऱ्यांनीं रंगविलें आहे. परंतु 'ट्रॅजिक हीरो 'च्या ठायीं जी भव्यता ( ग्रँजर ) असावयास पाहिजे अशी आपली अपेक्षा असते ती भव्यता सुधाकराच्या ठायीं दिसत नाही. कोर्टांतील चमत्कारिक घटनेच्या वेळीं, अथवा त्यानंतर अपमानाच्या जाचण्या असह्य झाल्यामुळे दारूच्या मोहाला तो प्रथम बळी पडला त्याहि प्रसंगीं, या 'ट्रॅजिक ग्रँजर 'ची सुधाकराच्या ठायीं मुळीच प्रतीति येत नाही. परंतु चवथ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांत सिंधूच्या यातना प्रत्यक्ष पाहिल्यावर त्याचें मन द्रवतें, आणि गीतेचे फटकळ शब्द तो शांत मनाने ऐकून घेतो, आणि कठोर आत्मपरीक्षण करूं लागतो. या प्रसंगापासून त्याच्या ठिकाणीं पूर्वीं नसलेल्या भव्यतेची प्रतीति येण्यास सुरवात होते. बंड-गार्डनवरील प्रवेशानंतर ( अंक ४ प्र. ३ ) त्याचें व्यक्तित्व नाट्याच्या दृष्टीने ( नैतिक दृष्टीने नव्हे ! ) एकदम आकर्षक बनूं लागतें. चवथ्या अंकाच्या चवथ्या प्रवेशांत तो पुन्हा तळिरामाच्या घरीं येऊन पिऊं लागतो. या क्षणा-पासून त्याच्या ठिकाणीं ट्रॅजेडीच्या नायकाला आवश्यक असलेल्या भव्यतेचा प्रकर्ष झालेला दिसतो, आणि नाट्याच्या दृष्टीने त्याचें व्यक्तिव्य कमालीचें उठावदार होतें. सुखी जीवनांतील सुधाकराच्या व्यक्तित्वांत भव्यता नव्हती; परंतु जगाचा कडु अनुभव आल्यानंतर जी विषारी निराशा त्याच्या मनांत भिनली त्या विषारी निराशेंत, निर्वाणीच्या निराशेंत, त्याच्या व्यक्तित्वाला कांही विलक्षण आकर्षक रूप प्राप्त होतें, आणि नाट्यात्मक परिणामाच्या दृष्टीने तें उठावदार होतें. जगांतील कडू अनुभवांच्या अतिरेकामुळे उत्पन्न झालेल्या जहरी निराशेंत सुधाकर जगांतील साऱ्या पाजी संभावितपणावर आग पाखडतो आणि भवितव्यतेच्या पकडींत सापडलेल्या क्षुद्र मानवाच्या दुबळे-पणाचें चित्र रेखाटतो तेव्हांच त्याची खरी भव्यता प्रकट होते. ज्या दारूने त्याचा सत्यानाश केला तिचा अघोरीपणा वर्णींत असतांनाच त्याच्या प्रत्येक वाक्यांतून काव्यात्मता ओसंडून वाहूं लागते. आपल्या आत्यंतिक मनोवृत्तीमुळे अनर्थांच्या सर्व पायऱ्या ओलांडून अखेर विषारी निराशेचा अतिरेक झाल्यामुळे मृत्यूला सामोरा जाण्यास उतावीळ झालेल्या प्रलयावस्थेंतील सुधाकराच्या व्यक्तित्वांतच गडकऱ्यांना खरी स्फूर्ति मिळाली आहे, आणि सुधाकराच्या या व्यक्तित्वानेच त्यांच्या प्रतिभेला बहर आला आहे.

* * *

## सिंधूची घराशीं झालेली एकरूपता

सुधाकर आपल्या आत्यंतिक मनोवृत्तीमुळे स्वतःचा नाश करून घेतो; आणि सिंधूचें नशीब सुधाकराच्या नशिबाशीं पूर्णपणें निगडित झालेलें असल्यामुळेच तिचाहि नाश होतो.

रामलाल विलायतेला जाणार या कल्पनेनेच खिन्न होणारी, सुधाकराला सोडून चार दिवस माहेरीं जातांना सुद्धा हवालदील होणारी, सिंधू म्हणजे कमालीच्या हळवेपणाची व प्रेमळपणाची मूस आहे. आपल्या संसारांत, सुधाकरांत, व प्रेमळ नातेवाईकांत तिच्या साऱ्या वृत्ति तन्मय झाल्या आहेत. यापलीकडे जग म्हणून कांही आहे याची तिला कल्पनाच नाही. आपल्या घराशीं ती पूर्णपणें एकरूप झालेली आहे. स्त्रीच्या ठायीं उपजतच असलेल्या लाघवीपणाचा व हळवेपणाचा तिच्या वृत्तींत प्रकर्ष झालेला आहे. पहिल्यापासूनच तिचा प्रत्येक उद्‌गार याची साक्ष देईल. घराविषयींची अनिवार ओढ, घराशीं झालेली एकरूपता, आणि कमालीचा हळवेपणा, या तिच्या स्वभावांत मुरलेल्या वैशिष्ट्यांची सर्व नाटकभर प्रतीति येईल. घर हेंच तिचें सारें विश्व आहे. यामुळे कौटुंबिक जीवनांतील गोष्टींबाहेर तिच्या मनाची झेप जाऊंच शकत नाही. तिच्या प्रत्येक उद्‌गारांत एक प्रकारचा आकर्षक घरगुतीपणा ओतप्रोत भरलेला दिसून येईल. तिचे दाखलेदृष्टान्तहि असेच पूर्ण घरगुती वातावरणाला शोभणारेच आहेत. [४७]

पहिल्या अंकांत सुधाकर व सिंधू यांच्या संसाराचें जें चित्र आहे तें अगदी स्पृहणीय व सुखपूर्ण असेंच आहे. सुधाकरासारख्या आत्यंतिक मनोवृत्तीच्या पुरुषाशीं तिचें लग्न झालें आहे. तथापि त्याच्या या आत्यंतिक मनोवृत्तीचा संघर्ष घरांत सिंधूशीं झाल्याचा कसलाहि पुरावा नाही. त्याच्या लौकिक बुद्धिमत्तेची व उग्र मानीपणाची झळ अजून तिला लागलेली नाही.

---

४७. "पूर्वजन्मीं केलं तें उमटलं, त्याला तूं काय करणार ? मागल्या जन्मीं उपाशी ब्राह्मण ताटावरून उठवला असेल, म्हणून आज अन्नासाठीं दाही दिशा पहाणं आलं; अतीत अभ्यागताला रित्या हातीं दवडलं असेल, म्हणून घरची लक्ष्मी पारखी झाली; हिरव्या कुरणांतून गाईगुजीला हांकललं असेल, तेव्हां आज बाळाला दूध मिळत नसेल !" ( अंक ४ प्र. ५ )

"असं झालं तर अमृतेश्वराला लक्ष वाती लावून........ओवाळणी करीन !" ( अंक ४ प्र. २ )

"अर्ध्या डावावरून लक्ष्मी उठून गेली आणि आपल्या हातीं कवडया राहिल्या !" ( अंक ४ प्र. २ )

कदाचित् त्याच्या आत्यंतिक मनोवृत्तीशीं जुळतें घेण्याची किमया स्वभावधर्मानुसार तिला साधलेली असेल. आणि यामुळे त्याच्या स्वभावांतील विचित्र अतिरेकांना आपला प्रभाव दाखविण्यास अवसर मिळाला नसेल. तें कांहीहि असो, सुधाकर बाहेर लोकांना कितीहि उर्मट व अहंकारी वाटत असला तरी सिंधूमध्ये त्याच्या चित्तवृत्ति केंद्रित झालेल्या आहेत व तिच्याशीं वागतांना त्याच्या मनोवृत्तींतील अतिरेकी वैगुण्यें दबलेलीं आहेत, असेंच पहिल्या अंकांतील त्यांच्या सुखी संसाराचें चित्र पाहून वाटतें. कदाचित् ही सारी सिंधूच्या प्रेमळपणाची, समजूतदारपणाची, सहनशीलतेची, व हळवेपणाची कर्तबगारी असण्याचाहि पूर्ण संभव आहे.

## सुधाकराभोवतीं घुटमळणारें मन

सुधाकराच्या स्वभावांतील चांगल्या गोष्टींचा जसा रामलालने तिच्याजवळ उल्लेख केला आहे तसाच त्याच्या दृढमूल वैगुण्यांचाहि त्याने स्पष्टपणें उल्लेख केला आहे ( अंक १ प्र. १ ). कमी प्रतीचे लोक सुधाकराच्या यशामुळे त्याचा द्वेष व मत्सर करतात; आणि प्रतिष्ठित व नामांकित वकील तो उर्मट व अहंकारी आहे असें मानतात हें सिंधूला माहीत आहे. " धंद्याच्या पटांगणांत त्याचं कौतुक करणारा, त्याला धीर देणारा, त्याचं समाधान करणारा, आणि रागाच्या ऐन भरांत त्याचा तोल संभाळणारा कोणी तरी जिव्हाळ्याचा मनुष्य सध्यां त्याच्या नेहमीं जवळ असणं अवश्य आहे " असें विलायतेला जातांना रामलालने तिला बजावून ठेवलें होतें ( अंक १ प्र. १ ). रामलालच्या या बोलण्यामुळेच अंक १ प्र. ३ मध्ये पद्माकर तिला माहेरीं घेऊन जाण्यासाठी आला असतां तिचें मन घर सोडून जावयास तयार होत नाही. बाळंतपणासाठी माहेरीं जाणें अपरिहार्य असलें तरी तिचं मन सुधाकराच्या भोवतींच घोटाळत राहणार हें ठरलेलें आहे. अगदी निघतां निघतां ती सुधाकराला म्हणते— " पण भाईनं सांगितलेलं लक्षांत आहे ना ? माझ्या जिवाला नाहींतर टांगल्यासारखं होईल. इथं एकटं रहायचं—" सिंधूचा हा उद्गार बहुतेक रामलालने त्याच्या मनोवृत्तीविषयीं जी सूचना दिली होती तिलाच अनुलक्षून असला पाहिजे. आपण माहेरीं गेल्यावर सुधाकराला धीर कोण देणार, आणि रागाच्या भरांत चुकून त्याचा तोल गेला तर त्याचें समाधान कोण करणार हीच कल्पना सिंधूच्या मनांत प्रबळ झाली असली पाहिजे.

## भावी अनर्थाच्या कल्पनेने आलेली खिन्नता

होऊं नये तें घडलें आणि सुधाकराची सनद सहा महिने रद्द झाली हें तिला माहेरीं कळलें असलें तरी बाळंतपणामुळे ती स्वतः कांहीच करूं शकत

नव्हती. सनद गेलेली कळल्याबरोबर तिच्या वडिलांनी सुधाकराला 'मोकळ्या मुठीनं पैसे पाठवायला सुरवात केली' हेंहि तिला चांगलें माहीत असलें पाहिजे. पण रामलालची प्रत्यक्ष तार येईपर्यंत घरीं चाललेल्या अनर्थाची तिला खरी कल्पना आली नसावी.[४८]

भावी अनर्थाची अथवा सुदैवाची अगाऊ कल्पना कांहीं स्त्रियांना तरी गूढ उपजत शक्तीने होत असते. सिंधू अशाच स्त्रियांपैकी आहे, 'कांहीं तरी वेडंवाकडं आहे' असें तिचें मनच तिला सांगत आहे. भावी अनर्थाच्या कल्पनेने कष्टी झाल्यामुळे अश्रु आवरणें तिला कठिण होतें.

सुधाकराला दारूचें व्यसन लागलें हें रामलालला गीतेकडून कळलें असलें तरी सिंधूच्या मनोवृत्तीची चांगलीच कल्पना असल्यामुळे ही भयंकर गोष्ट तिला सांगण्याचा रामलालला धीर होत नाही. "सिंधूनं एखादा शब्द ऐकला तर ती आपल्या जीवाचा अनर्थपात करील" अशी त्याला भीति वाटत आहे.

सिंधूच्या मनाची खिन्नता वाढतच गेली आहे. रामलालला यावयास थोडा उशीर लागला तरी तिच्या मनांत कालवाकालव होऊं लागते. "मला आपलं भलतंच स्वप्न पडायला लागलं आहे" असें आपलें मन ती शरद-जवळ बोलून दाखवीत आहे. शरदने कितीहि धीर दिला तरी तिच्या मनांतील कसमस कांही केल्या मोडत नाही. कांही तरी वेडेंवाकडें होणार या विचाराने तिच्या मनांत घर केलें आहे. कांही केल्या तो विचार नाहीसा होत नाही. "वन्सं, चंद्रसूर्यांसारख्या वेळा सांगून का येत असतात? बरं व्हायचं तें जपा-तपानं होतं आणि वाईट मात्र झाल्यावर कळायला लागतं. फळ पिकण्यापूर्वी पाडानं रंगून जातं; पण पुरतेपणीं कुजल्याखेरीज त्याला कधीं घाण सुटली आहे

---

४८. सुधाकराच्या स्वभावांतील विलक्षण तापटपणाच्या परिणामाची रामलालने स्पष्ट शब्दांत सूचना दिली असतां, आणि सुधाकराची सनद गेली त्याअर्थी त्याच्या हातून कांही तरी विचित्र प्रकार झाला असला पाहिजे याची कल्पना असतां, बाळंत-पणामुळे सिंधूला स्वतःला तातडीने सुधाकराकडे जाणें अशक्य होतें हें कबूल केलें तरी तिने आपल्या भावाला किंवा वडिलांना ताबडतोब सुधाकराकडे जावयास सांगणें अत्यंत जरूर होतें असेंच कोणीहि म्हणेल. शरदला तरी तिने पाठवून द्यावयासच हवें होतें. शिवाय, परिस्थिति इतकी बिकट असतां रामलालची तार येईपर्यंत ती थांबलीच कशी? बाळंतपणाचे अत्यंत आवश्यक दिवस माहेरीं काढून तिने लगेच धावत सुधाकराकडे जाणें जरूर होतें असें वाटतें.

का ? एकेकांच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे जिवाला अगदीं कसा चरका बसतो !" या तिच्या उद्‌गारांत तिच्या हळव्या मनाचें मर्म प्रकट झालें आहे.[४९]

## सिंधूची दुबळी निष्क्रियता

'सुधाकराला दारूचं व्यसन लागलं' हे शब्द रामलालच्या तोंडून बाहेर पडतांक्षणींच तिच्या हळव्या मनावर जबरदस्त आघात होतो आणि ती बेशुद्ध होते. तिचें रडण्याचें सुद्धा समाधान यावेळेपासून नाहींसें झालें आहे.

सुधाकराच्या भयंकर व्यसनीपणाची चांगली कल्पना आल्यावर, आणि सुधाकराची सनद कायमची रद्द झाल्याचें कळल्यावर पुढे काय करावयाचें ही विवंचना सिंधूपुढे उभी राहिली असलीच पाहिजे. अनपेक्षित अनर्थ दत्त म्हणून पुढे उभा राहिल्यानंतर सिंधू काय करते, त्या अनर्थाला कसें तोंड देते, सुधाकराच्या व्यसनाच्या बाबतींत व कुटुंबाच्या चरितार्थाच्या बाबतींत काय करते हें जाणून घेण्यासाठी आपण कमालीचे उत्सुक झालों असलों तर तें अगदी स्वाभाविक आहे. परंतु चमत्कारिक गोष्ट अशी की, गडकऱ्यांनी या बाबतींत कोणतीहि घटना प्रत्यक्ष दाखविली नाही. यामुळे केवळ तर्क करण्यापलीकडे दुसरें आपण कांहीहि करूं शकत नाही. अंक ३ प्र. ३ च्या शेवटीं 'असाल तसे निघून या' अशी पद्माकराला तार करण्याविषयीं रामलालने भगीरथाला सांगितलें आहे एवढीच या बाबतींत आपली माहिती आहे. दरम्यान घरांत सिंधू सुधाकराशीं कशी वागते, त्याला कांही समजुतीच्या गोष्टी ती सांगून पाहते कीं नाही, रामलालची मदत घेऊन कांही व्यवस्था करते कीं नाही, इत्यादि बाबतींत आपल्याला कसलीहि माहिती प्रत्यक्ष नाटकांत मिळत नाही. सुधाकराच्या व्यसनाच्या बाबतींत आपल्याला स्वतःला कांही करतां येण्यासारखें नाही, आणि अनर्थ तर दररोज वाढतच चालला आहे, रामलालच्या बोलण्याचाहि सुधाकरावर कांही देखील परिणाम होत नाही,[५०] इत्यादि

---

४९. दारूचें व्यसन हें असें चमत्कारिक आहे की, तें निकटच्या सहवासांतील माणसांपासून फार वेळ गुप्त राहूंच शकणार नाही. सिंधू परत येण्याच्या पूर्वीच सुधाकर इरसाल दारुबाज बनलेला होता. अशा स्थितींत अपरात्रीं तो घरीं परत आल्यावर त्याच्या बोलण्यावरून, हालचालीवरून, व इतर खुणांवरून त्याने दारू घेतली आहे हें (प्रत्यक्ष रामलालने स्पष्टपणें सांगण्यापूर्वी) सिंधूच्या एकदाहि लक्षांत येऊं नये याचें मोठें नवल वाटतें. इरसाल दारूबाजाचें वर्म बाहेर समाजांत कोणाला समजलें नाही तरी त्याच्या बायकोला तें समजल्यावाचून कसें राहील ?

५०. "याबद्दल सुधाकराजवळ गोष्ट काढायला मी गेलों, पण माझ्या सांगण्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं" असें खुद्द रामलालच म्हणत आहे. (अंक ३ प्र. ३)

गोष्टींमुळे आपल्या भावाला व वडिलांना सिंधू ताबडतोब तार करून बोलावून घेईल असें कोणालाहि वाटणें स्वाभाविक आहे. एका क्षणाचाहि विलंब न करतां सिंधूने या सार्‍या गोष्टी माहेरीं कळविणें जरूर होतें असेंच कोणीहि म्हणेल. पण सिंधूने अशी कांही हालचाल केल्याचा नाटकांत कसलाहि पुरावा नाही. आपलें बोलणें सुधाकर ऐकत नाही म्हणून रामलालच पद्माकराला व बाबासाहेबांना तार करण्याचें ठरवतो. सुधाकराचा तापटपणा आपल्या परिचयाचा आहे. त्याच्या व्यसनाचा फार अतिरेक झाला आहे हेंहि दिसत आहे. अशा स्थितींत अत्यंत हळुवार मनाच्या सिंधूच्या समजुतीच्या बोलण्याचा किंवा रागाचा सुधाकरावर कसलाहि परिणाम होणें शक्य नाही असें मानलें तरी सिंधूने या बाबतींत कांहीतरी प्रयत्न करून पाहणें जरूर होतें हा विचार कांही केल्या मनांतून जात नाही. तें कांहीहि असो, गडकर्‍यांनी अशी एखादी घटना रंगविणें नाट्याच्या दृष्टीने आवश्यक होतें इतकें मात्र खरें.

व्यसनाचा अतिरेक झालेल्या स्थितींत सुधाकराशीं सिंधू कोणत्या प्रकारें वागली असेल याची थोडीशी कल्पना अंक ३ प्र. ४ च्या सुरवातीच्या एका घटनेवरून येईल. सुधाकर झिंगावयास लागला असतांनाच सिंधू व शरद तेथे येतात. तळिराम पेला भरूं लागलेला पाहतांच "तळिराम, तळिराम, काय करता हें!" एवढाच उद्‌गार सिंधूच्या तोंडून बाहेर पडतो. आणि सुधाकराच्या सांगण्यावरून तळिराम प्रत्यक्ष तिचें मंगळसूत्र ओढूं लागतांच पूर्णपणें असहाय होऊन "देवा, भाई–" एवढेच केविलवाणे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडतात.

सुधाकराशीं सिंधू कोणत्या प्रकारें आतापर्यंत वागली असेल अथवा यापुढे कोणत्या प्रकारें वागेल याचें उत्कृष्ट निदर्शन ही घटना करीत आहे. ती अतिशय हळुवार मनाची आहे, कठोरपणाचा लेशहि तिच्या स्वभावांत नाही. कठोर होणें तिला प्रयत्न करूनहि जमणें शक्य झालें नसतें. याच्याच जोडीला कमालीचा सोशीकपणा तिच्या रक्तांतच आहे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सुधाकरावर तिचें प्राणापलीकडे प्रेम आहे. अशा स्थितींत सुधाकराला समजुतीच्या चार गोष्टी सांगणें, अथवा प्रसंगीं त्याच्यावर रागावणें, यांपैकी कांहीहि तिला जमणें शक्यच नाही. जें डोळ्यांसमोर चाललें आहे तें निमूटपणें पाहणें, आणि सोशीकपणाने प्रत्येक गोष्ट सहन करीत राहणें, एवढेंच काय तें तिला करतां येण्यासारखें आहे, आणि तेंच ती करीत आहे.

तळिराम सिंधूच्या गळ्यांतील मंगळसूत्र ओढीत आहे इतक्यांत रामलाल, पद्माकर व बाबासाहेब येतात. सुधाकर किंचितहि वरमत नाही. उलट, गलिच्छ शब्दांनी तो सार्‍यांचा उद्धार करतो. तो 'बेताल अनर्थ'

डोळ्यांनी पाहतांच पद्माकर संतापतो व "या घरांत पाणी प्यायलासुद्धां राहूं नकोस ! चल !" असें सिंधूला बजावतो.

## सिंधूच्या स्वभावाचा अपरिहार्य परिपाक

ही सिंधूच्या परीक्षेची खरी वेळ आहे. सुधाकराच्या दारूबाज जीवनाचें बीभत्स चित्र तिने प्रत्यक्ष पाहिलें आहे. तळिरामासारख्या नरपशूने तिच्या मंगळसूत्राला हात घालण्याचा आचरटपणा केलेला आहे. रामलालसारखा निस्सीम हितकर्ता व जिव्हाळ्याचा मित्र, पद्माकरासारखा अतिशय प्रेमळ मेव्हणा, व बाबासाहेबांसारखे हितचिंतक श्वशुर या सर्वांची सुधाकराने अतिशय नीच शब्दांनी अवहेलना केलेली तिने पाहिली आहे. असल्या अवस्थेला गेलेल्या दारुड्या नवऱ्याचें घर ताबडतोब सोडून सिंधूने आपल्याबरोबर माहेरीं यावें असें पद्माकराला व बाबासाहेबांना वाटणें अगदी स्वाभाविक आहे. तिने या प्रसंगीं काय करावयास हवें होतें याबाबतींत व्यावहारिक सल्ला देणें अगदी सोपें काम आहे. तें कोणीहि सहज करूं शकेल. सिंधूने ताबडतोब सुधाकराचें घर सोडून देऊन माहेरीं जावयास हवें होतें, इतकेंच नव्हे तर सुधाकर सुधारण्याची शक्यता नाही असें दिसतांच त्याला ताळ्यावर आणण्याचा रामबाण उपाय म्हणून वडिलांना व भावाला सांगून त्याची पैशाची मदतहि बंद करून टाकावयास हवी होती, असा व्यावहारिक उपदेश करणें शक्य आहे. परंतु माणसाच्या स्वभावांत अगदीं खोल मुरलेलीं जीं वैशिष्ट्यें ( अथवा वैगुण्यें ) असतात त्यांचाच प्रभाव पडावयाचा हें विधिलिखित आहे. व्यावहारिक उपदेश कितीहि पोक्त व समजुतीचा असला तरी तो स्वभावापुढे रद्द असतो. कोर्टात मुन्सफांना आपला मुद्दा समजावून देतांना शांतपणाने बोलावें, तापटपणा करूं नये, मुन्सफ रागावले तरी आपण रागावूं नये, आणि मुन्सफांनी चिडून सनद रद्द केली तरी आपण दारूला बळी पडूं नये—असा पोक्त व्यावहारिक उपदेश कोणताहि पंतोजी सुधाकराला करूं शकला असता ! परंतु खरा प्रसंग येतांच सल्लामसलत राहते बाजूला, आणि माणसाचा खरा स्वभाव उफाळून येतो. सिंधूच्या बाबतींत नेमकें हेंच झालें आहे. सुधाकर कसाहि वागला, आणि त्याने कितीहि अनर्थ केले, थोर माणसांचा कसाहि अपमान केला, तरी सिंधू त्याला सोडून जाणें शक्यच नाही.

वास्तविक ती माहेरीं गेली असती तर तिचें आयुष्य किती सुखाचें गेलें असतें ! पण ती सुधाकराजवळच राहणार, त्याच्या व्यसनाच्या साऱ्या पायऱ्या डोळ्यांनी पाहणार, त्याच्या हातून घडणारे सारे बेताल अनर्थ धीराने सोसणार, त्याच्या कसल्याहि इच्छेला तत्क्षणीं मान तुकावणार, आणि शेवटीं भयंकर

दारिद्र्याच्या यातनाहि सहन करणार—या साऱ्या गोष्टी तिच्या स्वभावानेच ठरवून टाकल्या आहेत. त्याला ती तरी काय करणार !

आणि यामुळेच पद्माकराला ती म्हणते—“ वेड्या, हे पाय जिथं असतील तिथंच माझा स्वर्ग, तिथंच माझं जीवन आणि तिथंच माझा कैलास ! ...या पावलांविरहित मात्र मला देवादारींसुद्धां नरकवास घडेल ! तुमच्या चौदा-चौकड्यांच्या राज्यांत राहून रौरवाची राणी होण्यापेक्षां दुर्दैवाची दासी होऊन दुःखांत दिवस कंठीन. मी या पायांजवळ अशी अष्टौप्रहर बसून राहीन. ” (अंक ३ प्र. ४)

‘ कपाळींच्या कुंकवासाठीं ’ नवऱ्याच्या पायधुळींत राहावयास तयार झालेल्या असल्या या बहिणीपुढे कोणता भाऊ काय करूं शकेल !

माहेरचा एक पैसाहि घरांत आणावयाचा नाही अशी शपथ तिला सुधाकर घ्यावयास लावतो आणि ती सुद्धा भावाच्या व वडिलांच्या समोर अशी शपथ ताबडतोब घेते. “ आपल्या पायावर हात ठेवून सांगतें, आजन्म हाल सोशीन, कावाडकष्ट करीन, पण दुसऱ्याच्या कष्टाची कवडी म्हणून या घरांत येऊं देणार नाहीं ! आपल्या दोघांच्या कष्टाविरहित सगळ्या जगांतील धनदौलत मला शिवनिर्माल्य आहे ! ”

## सिंधूच्या निर्णयाची मीमांसा

सिंधूच्या या उद्गारांतील भावनांचा उद्रेक क्षणभर बाजूला ठेवला तरी एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे. सुधाकराच्या व्यसनाच्या असल्या स्थितींत त्याला एकट्याला ठेवून निघून जाण्याची कल्पनाच तिला असह्य होत आहे. ही कांही तरी विचित्र आपत्ति सुधाकरावर आलेली आहे असेंच तिला वाटत आहे. अशा या आपत्तीमध्ये त्याला असहाय स्थितींत सोडून जाणें म्हणजे माणुसकीचा सत्यानाश आहे असेंच तिला वाटत असलें पाहिजे. दुर्धर रोगाच्या आपत्तीमध्ये असलेल्या माणसाजवळ राहणें धोक्याचें आहे हें दिसत असतांहि जिव्हाळ्याचे नातेवाईक सारा धोका पतकरूनहि त्याची शक्य तेवढी शुश्रूषा करतात हा अनुभव मुळीच खोटा नाही. सुधाकराच्या नशिबीं आलेल्या या दैवी आपत्तीच्या क्षणीं त्याला एकट्याला सोडून माहेरीं सुखाचे दिवस काढणें ही कल्पना सिंधूला विषासमान कां वाटत आहे याचा उलगडा होणें कठिण नाही. खुद्द तिनेच आपली (आणि जवळजवळ साऱ्या स्त्रीजातीचीच !) अंतर्यामींची भावना स्पष्ट शब्दांत प्रकट केली आहे. “ सुखाच्या संसारांतसुद्धां चार दिवस माहेरीं राहायचं आम्हां बायकांच्या जिवावर येतं आणि तुम्ही मला आतां घर सोडायला सांगतां ? इकडची अशी अवस्था झालेली, घरांत हा

प्रकार; आतां तर डोळ्यांत तेल घालून मला बसायला पाहिजे! मला कांहीं वेडंवाकडं झालं असतं, तर इकडून मला टाकणं झालं असतं का? माझ्या-करितां आकाशपाताळ एक करायचं झालं नसतं का? मग मला इकडच्या जिवासाठीं पडतील ते काबाडकष्ट उपसायला नकोत का? आमच्या गरिबीसाठीं मोलमजुरी करायला नको का?"

सुधाकराला एकट्याला सोडून भावाबरोबर सिंधू माहेरीं कां जात नाही या प्रकाराचें खरें कारण हेंच आहे असें मला स्पष्टपणें वाटतें. तिच्या या उद्-गारांत केवळ तिचेंच मन प्रकट झालें आहे असें नसून साऱ्या स्त्रीजातीचें मन प्रकट झालें आहे. सुधाकर व्यसनाच्या अतिरेकामुळे बीभत्स अनाचार करीत आहे हें तिला दिसलें आहे आणि यापुढे त्याचे अनाचार वाढतच जाणार हेंहि तिला दिसत आहे. रामलालसारख्या निःसीम मित्राला आणि जिव्हाळ्याच्या हितचिंतकाला उद्देशून सुधाकराने जे गलिच्छ शब्द वापरले ते तिने कानाने ऐकले आहेत. रामलाल झाला म्हणून काय झालें? त्याला सुधाकराचा तिरस्कार आला असला पाहिजे ही भीति तिला वाटली असेल तर तें स्वाभाविक आहे. यापुढें रामलालची आपल्याला मदत मिळावयाची नाही हें तिला दिसत आहे. आणि तिच्या भावाच्या व वडिलांच्या बाबतींत सुधाकराने केलेला प्रकार याही-पेक्षा भयंकर व घृणास्पद होता. 'हरामखोर' या शब्दाने सुधाकराने त्यांची संभावना केली होती. पद्माकराचा संताप कोणत्या थराला जाऊं शकतो हें तिला नुकतेंच दिसून आलें आहे. शिवाय घर सोडून माहेरीं येण्याची जी सूचना पद्माकराने तिला केली होती तीहि तिने कठोरपणें झिडकारली होती व पद्माकरालाच उलट तिने मूर्खांत काढलें होतें. अशा स्थितींत यापुढे पद्माकराची किंवा बाबासाहेबांची मदत मिळेल अशी आशा सुद्धा करावयाची सोय राहिली नाही. मग सुधाकराचें काय होणार? हा प्रश्न तिला सतावीत असलाच पाहिजे. आणि काय वाटेल तें झालें तरी या अनुकंपनीय अवस्थेंत एक क्षणभरहि सुधा-कराला सोडून जावयाचें नाही असा तिच्या मनाने एका क्षणांत कठोर निर्धार केला असला पाहिजे. सुधाकराचा कोणताहि अपराध असो, त्याच्या या असहाय अवस्थेंत आपणच डोळ्यांत तेल घालून बसावयास पाहिजे, दुसरें कोणीहि त्याच्याकडे ढुंकून सुद्धा पाहणार नाही, हाच विचार तिच्या मनांत यावेळीं प्रबळ झाला असला पाहिजे यांत शंका नाही. पहिल्या अंकाच्या पहिल्याच प्रवेशांत रामलालच्या तोंडीं एक मोठें मार्मिक वाक्य गडकऱ्यांनी घातलें आहे. सिंधूच्या आताच्या मनःस्थितीचें खरें द्योतक असें तें वाक्य आहे. रामलाल म्हणतो—"सुधा, तुला मनुष्यस्वभावाची–त्यांतून स्त्रीस्वभावाची चांगलीशी कल्पना नाहीं. आपल्या प्रियजनाचं आपल्या नजरेआड बरंवाईट झालं म्हणजे

परक्या माणसाच्या हलगर्जीपणामुळंच हें झालं असावं, अशी त्यांच्या मनांत शेवटपर्यंत रुखरूख राहते. वायकांच्याच अंगीं असलेल्या आपलेपणाच्या कळकळीनें वघायला कुणी असतं, तर हा प्रसंग टळला असता, असं प्रत्येक fatal केसमध्ये वाटत असतं." (अंक १ प्र. १) सिंधूच्या स्वभावाची आपल्याला जी माहिती आहे तिच्यावरून इतक्या वाईट अवस्थेंत सुधाकराला एकट्याला त्याच्या दुर्दैवाच्या ताब्यांत देऊन माहेरीं जाण्याची कल्पना तिच्या मनाला स्वप्नांत देखील शिवणें शक्य नाही हें मुद्दाम स्पष्ट करण्याची कसलीहि जरूर नाही. आपण त्याची काळजी घेऊं, त्याच्या मनाला धीर देऊं, आजारांत त्याची शुश्रूषा करूं, व त्याचें मन ताळ्यावर राहील अशी खटपट करूं, अशी आशा तिला वाटत असली तर तिच्यांत अस्वाभाविक असें कांहीहि नाही. आपल्या व्यवहारी दृष्टीने ही आशा वेडी असेलहि. पण थोडा वेळ सिंधूच्या ठिकाणीं आपण आहोंत अशी कल्पना करणें जर आपल्याला शक्य झालें तर जाणूनवुजून संकटांत उडी टाकावयास ती तयार झाली असली तरी तिची यामागील भावना तरी आपल्याला खास समजावून घेतां येईल.

आपण माहेरीं जाण्यामुळे प्रश्न सुटणार नसून तो अधिकच बिकट होईल अशी भीति तिला वाटली असली पाहिजे. त्याऐवजीं सुधाकराच्या दैवाशीं आपल्या दैवाची सांगड घालून त्याच्यासाठी होईल तें करावयाचें असा तिने निर्धार केला आहे. असा हा खरा प्रकार आहे.

एखाद्या दुराचारी व स्वैर मुलाची साऱ्या जगाकडून अवहेलना व उपेक्षा झाली असतां व तो प्रतिक्षणीं अनर्थाच्या उतरणीवरून खाली जात असतां, एखादी हळवी आई ज्या आग्रहाने ( अथवा दुराग्रहाने ) व कणखर-पणाने त्याला जपण्यासाठी जिवाचें करील व जगाचीं दूषणें सहन करील, त्याच आग्रहाने व कणखरपणाने सिंधूसारखी पत्नी प्रत्येक क्षणाला अवनतीच्या गर्तेंत अधिकच खोल जाणाऱ्या आपल्या पतीला जपण्यासाठी जिवाचें रान करावयास तयार झाली आहे. या प्रयत्नांत तिला यश येणें शक्यच नाहीं हें आपल्याला स्पष्ट दिसत आहे. आपल्याला यश येणार नाही अशी मनांतल्या मनांत तिलाहि धास्ती वाटली नसेल असें नाही. पण कांही असलें तरी जिव्हाळ्याचे सारे नातेवाईक व मित्र ज्याच्यापासून दुरावले आहेत अशा असहाय सुधाकराला एकटा टाकून माहेरीं जाणें ही गोष्ट निदान सिंधूच्या बाबतींत तरी सर्वस्वीं असंभाव्य आहे यावर आणखी विशेष भर देण्याचें कारण नाही.

पतिव्रतेच्या कर्तव्याविषयीं पुष्कळशा अतिरेकी शब्दांत सिंधू या वेळीं बोलत आहे हें खरें. आणि यामुळेच तिच्या भूमिकेविषयीं थोडा गैरसमज होणें अगदीं स्वाभाविक आहे. काय वाटेल तें झालें तरी सर्व प्रकारचीं दुःखें धीराने सोशीत मी माझ्या नवऱ्याजवळच राहणार असें ती बोलली असती तर तें सर्वांना केवळ मूर्ख व आत्मघातकी दुराग्रहाचें वाटलें असतें. आणि म्हणून पतिव्रतेच्या कठोर कर्तव्याविषयीं ती या वेळीं इतकें अतिरेकी बोलत आहे असें मला वाटतें. आपल्या निश्चयावर कोणी कांही बोलूं नये, तो साऱ्यांना अगदी बिनतोड वाटावा, यासाठी तिने मुद्दाम ठरवून हें वक्तृत्व केलें असें कोणीच म्हणणार नाही. अंतःस्फूर्तीनेच ती हें सारें बोलून गेली आहे. माणूस अगदी बिनतोड अडचणींत सापडला म्हणजे आपल्या वर्तनाच्या समर्थनासाठी असाच बिनतोड कोटिक्रम केवळ अंतःस्फूर्तीनेच करतो. तसेंच यावेळीं सिंधूचें झालें असलें पाहिजे असें मला वाटतें. सुधाकराच्या असल्या हीनदीन अवस्थेंत त्याला एकट्याला सोडून जाणें सर्वथा अशक्य झाल्यामुळे वाटेल त्या भयंकर यातना सोसूनहि त्याच्याजवळ राहण्याचा तिचा कठोर निश्चय झाला आहे, आणि पतिव्रतेच्या उग्र कर्तव्याचा तिने केलेला गौरव हा केवळ आपल्या कृत्याच्या समर्थनार्थ आहे असेंच या प्रकारांतील सत्य आहे.

आपण सुधाकराला ताबडतोब सुधारूं शकूं असें तिला पूर्वीहि वाटलें नव्हतें, आणि आता तर मुळीच वाटत नाही. यापुढे अधिकच बेताल अनर्थ पाहावा लागेल हें तिला नुकत्याच झालेल्या प्रकारावरून स्पष्टपणें कळून चुकलें आहे. घर सोडून ताबडतोब कोठे तरी निघून जाण्याची सूचना ती शरदला करीत आहे यावरून तिच्या मनांतील भीति स्पष्ट दिसून येत आहे. " घरांत असा प्रकार सुरू झाल्यावर तुमच्यासारख्यांना अन्नूनं दिवस निभावून नेणें मोठं कठिण आहे ! " या तिच्या उद्गारांत कांहींहि संदिग्ध नाही. शरद ही सुधाकराची पाठची बहीण. पण तिला सुद्धा कोणत्या क्षणाला कसल्या भयंकर प्रकाराला तोंड द्यावें लागेल तें सांगतां येत नाही याची चांगली जाणीव असल्यामुळेच सिंधू शरदला असें बजावीत आहे हें उघड आहे.

## दुबळेपणांतून निर्माण झालेला कठोरपणा

सुधाकराला सुधारण्याचें कसलेंहि सामर्थ्य आपल्याजवळ नाही याची पूर्ण खात्री असतांहि ती एकटी सुधाकराजवळ राहावयास तयार झाली आहे. होईल तो अनर्थ अगदीं शांतपणें सोशीत राहण्याखेरीज दुसरें ती कांहींहि करूं शकणार नाही; आणि तरी सुद्धा सुधाकराला या परिस्थितींत एकटा टाकून जाण्याचा विचारहि तिच्या मनांत येणें शक्य नाहीं हेंच तिच्या स्वभावधर्माचें फलित

आहे. हा कठोर निश्चय तिच्या स्वभावांतील दुबळेपणामुळेच निर्माण झाला आहे. याच दुबळेपणामुळे ती आपल्या भावाला व वडिलांना अगदी कठोरपणें बोलूं शकली. हा विरोधाभास आहे यांत शंकाच नाही. पण तो तसा आहे हेंहि तितकेंच खरें. आत्यंतिक दुबळेपणामुळे ती सुधाकराला सोडून जाऊं शकत नाही, आणि त्याला सुधारूंहि शकत नाही. परंतु हा दुबळेपणा तिच्या ठायीं अतिरेकाला गेलेला असला तरी कोणताहि दारुण निश्चय कृतींत आणण्याचा कठोरपणाहि या दुबळेपणांतूनच निर्माण झालेला आहे हें विसरतां येणार नाही.

## सिंधूच्या यातनांचा प्रभाव

सुधाकराचें व्यसन सुटावें म्हणून ती काय करूं शकेल? कांहीहि नाही! सुधाकराची आत्यंतिक मनोवृत्ति लक्षांत आणली म्हणजे व्यसनाच्या या अवस्थेंत तो तिचें कांहीहि ऐकून घेणार नाही हें अगदी उघड आहे. म्हणजे एकच गोष्ट करणें तिला आता शक्य आहे. सर्व प्रकारच्या यातना अगदी धीराने सोसणें हीच ती गोष्ट होय. निश्चय केल्याप्रमाणें ती तंतोतंत वागते. घरांतल्या वाढत्या दारिद्र्याला तोंड देण्यासाठी हीन प्रकारचे काबाडकष्ट उपसते, कागदाच्या घड्या घालते, दळण दळावयासहि तयार होते. कागदाच्या घड्या ती घालीत असतां तिच्या यातना न पाहवल्यामुळे गीता तिला मदत करूं लागते. पण "दुसऱ्याचे कष्ट आम्हांला अगदीं वर्ज्य आहेत!" असें म्हणून गीतेला ती काम करूं देत नाही. आपल्या दुर्दैवाने ओढून आणलेलीं सारीं दुःखें सोसणें —सतत व कुरकुर न करतां सोसणें—एवढेंच तिने ठरविलें आहे. गीतेशिवाय दुसऱ्या कोणाजवळ ती कुरकूरहि करूं शकत नाही. आणि गीतेजवळ सुद्धा तक्रारीचा एकहि शब्द ती चुकूनहि उच्चारीत नाही.

आणि रामलाल, पद्माकर, बाबासाहेब यांच्यापैकी कोणीहि जें करूं शकला नाही तें कठोर यातना धीराने सहन करणाऱ्या सिंधूला करतां आलें आहे, अथवा तिच्याकडून झालें आहे. समजुतीचे शब्द, उपदेश, संतापाने केलेली निर्भर्त्सना, यांपैकी एकाहि गोष्टीचा परिणाम व्यसनाच्या अतिरेकी अवस्थेंत सुधाकरावर होणें शक्य नव्हतें. त्याची आत्यंतिक मनोवृत्तीच याला जबाबदार आहे. अशा स्थितींत सिंधूच्या भयंकर यातना हाच त्याचे डोळे उघडण्याचा एकमेव मार्ग ठरला. सिंधूच्या यातना प्रत्यक्ष पाहतांच त्याला तीव्र पश्चात्ताप झाला. त्याच्या पश्चात्तापासाठी सिंधूला मात्र केवढी भयंकर किंमत द्यावी लागली आहे! आणि तिनेहि ती करारीपणाने दिली आहे. सुधाकराचा पश्चात्ताप अगदी थोडा वेळ टिकावा व तो पुन्हा पूर्वीपेक्षाहि अधिक अतिरेक करूं लागावा अशी विचित्र परिस्थिति निर्माण झाली हें तिचें दुर्दैव होय!

यापेक्षा दुसरें काय म्हणतां येणार ? साऱ्या नाटकावर भवितव्यतेची जी छाया पसरलेली आहे त्याच भवितव्यतेन सिंधूच्या यातनांचें फळ असें अल्पकालिक ठरविलें !

## तिचा भीषण अंत

सुधाकराच्या जवळ राहून वाटेल त्या यातना सोसण्याचा अत्यंत कठोर निर्धार तिने मागे केला होता व तो तितक्याच करारीपणाने तिने पाळला सुद्धा. मुळांत अतिशय हळव्या व दुबळ्या असलेल्या सिंधूने आणीबाणीच्या प्रसंगीं वृत्तीचा हा जो असामान्य कणखरपणा दाखविला त्याचा खरा अतिरेक अजून दिसावयाचाच आहे. बाहेरून झिंगूनच आलेला सुधाकर तिच्याकडून दारूसाठी पैसे मिळत नाहीत हें दिसतांच बेभान होतो. आणि अतिशय गलिच्छ शब्द तिला ऐकवून[51] स्वतःच्या मुलाला ठार करतो व सिंधूलाहि जबर जखम करतो. सुधाकराच्या पश्चात्तापामुळे 'चिरकालीन निराशेंत' तिला जो ब्रह्मानंद झाला होता त्या ब्रह्मानंदाची ही असली अघोर फलश्रुति तिच्या नशिबीं होती. काय वाटेल तें करून सुधाकराला जपावयाचें ह्या निर्धाराचें परिपालन आसन्नमरण अवस्थेंतहि ती करणार हें ठरलेलेंच आहे. पद्माकर फौजदाराला घेऊन आला असतां "यांनीं कांही केलं नाही" हाच तिचा हेका कायम आहे. "मी दोन दिवसांची उपाशी होतें. मला राहून राहून भोवळ येत होती. मुलाला घेऊन माळ्यावरून उतरतांना मला घेरी आली; पडल्यामुळे मला कपाळावर खोंक पडली! मूल माझ्या अंगाखाली चेंगरलं. इकडचा कांहीं संबंध नाही त्यांत !"[52] असें चक्क खोटें सांगून ती फौजदाराच्या तावडींतून सुधाकराला वाचवते, आणि तिच्या दृष्टीने भीषण ठरलेल्या या संसाराचा कायमचा निरोप घेते.

---

५१. "तें कारटं त्या रामलालचं आहे ! माझं नाहीं !" (अंक ४ प्र. ५)

५२. शेक्स्पियरच्यां 'ऑथेल्लो' नाटकांतहि असलाच अघटित प्रकार आहे. ऑथेल्लोने देस्देमोनाचा गळा दाबला आहे व ती शेवटचे क्षण मोजीत आहे. अशा वेळीं तिची दासी एमीलिया तेथे येते. झालेला घोर प्रकार पाहतांच ती एकदम विचारते—

O ! who hath done this deed ?

आणि शेक्स्पियरची देस्देमोना मरतां मरतां म्हणते—

Nobody; I myself; farewell.
Commend me to my kind lord. O ! farewell !

## सिंधूच्या स्वभावाचा अपरिहार्य परिपाक

सुधाकरावर अतिशय एकनिष्ठ प्रेम असल्यामुळे आणि कमालीच्या हळव्या मनोवृत्तीमुळे त्याला संकटांत एकटा टाकून माहेरीं जाण्याचें सिंधू नाकारते व वाटेल तो अनर्थ सोसण्याचा ती निर्धार करते. यातना सोसण्याचा हा तिचा निर्धार कठोर आहे यांत शंकाच नाही. पण तो तिच्या आत्यंतिक प्रेमळ व हळव्या वृत्तींतून स्फुरलेला आहे. याच कठोरपणाने ती आपल्या भावाला व वडिलांना सडेतोडपणाने बोलते; आणि वृत्तीच्या या कठोरपणाचें रूपांतर शेवटीं सुधाकराला वाचविण्यासाठी खोटें बोलण्यांत होतें. सुधाकराचा विनाश जसा त्याच्या स्वभावाने ठरवून टाकला आहे, तसा सिंधूचा विनाशहि तिच्या स्वभावानेच निश्चित करून टाकला आहे. पतीवरील आत्यंतिक प्रेमाचा प्रकर्ष, व कमालीच्या हळवेपणांतून निर्माण झालेला दुबळेपणा, या दोन गोष्टींनीच तिचें भवितव्य ठरविलें आहे. सिंधूच्या स्वभावांतील हीं वैशिष्टयें नीट लक्षांत ठेवून तिच्या कृतींकडे आपण पाहिलें तर ( तिच्या दारुण यातना आपल्याला कितीहि असह्य झाल्या तरी ) त्यांच्यामध्ये अनाकलनीय असें कांहीच दिसणार नाही. तिच्या स्वभावांतील मर्मस्थानें व तिच्या हातून घडलेल्या कृति यांच्यामध्ये कसलीहि विसंगति नाही, कसलीहि असंभाव्यता[५३] नाही. स्त्रियांमध्ये इतका दुबळेपणा असावा कीं नाही[५४] हा प्रश्न अगदींच स्वतंत्र आहे. आणि या प्रश्नाचें उत्तर देण्याची कोणतीहि जबाबदारी नाटककारावर नाही !

सिंधूच्या रूपाने आदर्श आर्य पतिव्रतेचें चित्र गडकऱ्यांना रंगवावयाचें आहे ही कल्पना अनेकांच्या मनांत दृढमूल झालेली आहे. पतिव्रतेचीं कर्तव्यें आणि पातिव्रत्याचा महिमा यांचा आविष्कार कांही ठिकाणीं झालेला दिसला तरी त्यांच्यामुळे फसण्याचें कारण नाही. पतीवर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या

५३. " एकच प्याला ' नाटकावर मुख्य टीका आहे ती हीच कीं, सुधाकराच्या रूपानं दारूबाजाचं आणि सिंधूच्या रूपानं पतिव्रतेचं अशीं जीं दोन स्वभावचित्रं गडकऱ्यांच्या त्या नाटकांत आहेत तीं प्रेक्षकांच्या मनाला वास्तव आणि संभाव्य वाटत नाहींत."—प्रो. ना. सी. फडके, ' किर्लोस्कर, देवल, गडकरी,' पृ. ११८.

५४. खांडेकरांचें पुढील विवेचन पाहावें. " ......स्वभावरेखनाच्या दृष्टीनें या भूमिकेकडे पाहिल्यावर अनेक प्रश्न पुढें उभे राहतात. सिंधू पतिव्रता खरी; पण सबंध नाटकांत नवऱ्याला दारूपासून परावृत्त करण्याचा एकदां देखील प्रयत्न न करणाऱ्या असल्या दुबळ्या पतिव्रता कितीशा इष्ट आहेत ?"—' गडकरी (व्यक्ति व वाङ्मय ),' द्वितीयावृत्ति, पृष्ठ १३८.

एका पराकाष्ठेच्या सोज्वळ, हळव्या व दुबळ्या स्त्रीची ही शोककथा आहे, दुसरें कांही नाही.

## रामलालच्या भूमिकेचें मर्म

रामलालचें नाटकांत नेमकें कार्य कोणतें या प्रश्नाने आपल्या बहुतेक साऱ्या टीकाकारांना सतावलें आहे. "रामलालचें नाटकांतील मुख्य कार्य सुधाकराला दारूपासून परावृत्त करण्याची पराकाष्ठा करणें हेंच आहे" असें श्री. खांडेकर म्हणतात.[५५] "पुढें तर काय सुधाकराच्या दारूपुराणासाठीं मुद्दाम निर्माण केलेला एक श्रोता यापलीकडे रामलालचें नाटकांत कांहींच कार्य नाहीं," असें प्रो. ना. सी. फडके म्हणतात.[५६] "मोहाचा घातकपणा सुधाकराच्या उदाहरणानें आपल्या मनांत ठसवीत असतां रामलालसारख्या सत्प्रवृत्त व ध्येयवादी माणसाचाहि मोहामुळें कसा अधःपात होतो हें दाखवून नाटककारानें आपलें उद्दिष्ट साधलें आहे. आणि एवढ्यासाठीं रामलाल या व्यक्तीची नाटकाला आवश्यकता आहे असें म्हणावयास जागा आहे" असें विवेचन मीं दहा वर्षांपूर्वी केलें होतें.[५७]

सुधाकराला दारूच्या व्यसनांतून मुक्त करण्याचें कार्य रामलालकडून करून घ्यावें याच एका उद्देशाने गडकऱ्यांनी ही व्यक्तिरेखा निर्माण केलेली दिसत नाही. सुधाकराचें व्यसन घालविण्यासाठी रामलालसारख्या परम मित्राने व निस्सीम हितचिंतकाने प्रयत्नांची जी पराकाष्ठा करावयास पाहिजे अशी कोणाचीहि अपेक्षा असणें अगदी स्वाभाविक आहे ती पराकाष्ठा तर रामलाल करीत नाहीच, पण साधे प्रयत्न सुद्धा तो कसोशीने व निकडीने करीत नाही, हा याचा पुरावा आहे. रामलाल या बाबतींत जवळजवळ कृतिशून्य कां आहे याचें कारण स्पष्ट करणारी एकहि घटना गडकऱ्यांनी रंगविली नाही. नाही म्हणावयास व्यसनाच्या बाबतींत सुधाकराजवळ तो कांही बोलला असावा असा पुरावा त्याच्याच एका उद्गारांत सापडतो.[५८] या व्यतिरिक्त सुधाकराला सुधारण्याच्या बाबतींत रामलालने कांही विशेष प्रयत्न केल्याचा निदान नाटकांत तरी पुरावा नाही. अंक २ प्र. ३ मध्ये सुधाकराला घेऊन जाण्यासाठी तो

---

५५. 'गडकरी (व्यक्ति व वाङ्मय),' द्वितीयावृत्ति, पृ. १९०

५६. 'मासिक मनोरंजन,' सप्टेंबर १९१९, पृ. ९७

५७. 'सुधाकर कीं एकच प्याला?', पृ. ६२

५८. "याबद्दल सुधाकराजवळ गोष्ट काढायला मी गेलों, पण माझ्या सांगण्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं." (अंक ३ प्र. ३)

भगीरथाबरोबर आर्यमंदिरामंडळांत जातो, आणि तेथे भगीरथाला तात्त्विक उपदेश करून परत येतो. सुधाकराची सनद कायमची रद्द झाल्यानंतर घरांतील अनर्थ झपाट्याने वाढूं लागले आहेत तरी सुद्धा "तार आतांच करून येऊं कां ?" असें भगीरथाने विचारल्यावर "इतकी कांहीं घाई नाही. आणखी थोड्या वेळानं केलीस तरी चालेल" असें तो अगदी शांतपणाने म्हणतो. या साऱ्या प्रकारावरून असें वाटतें की सुधाकराचें व्यसन कमी करण्यासाठी रामलालचा उपयोग करून घ्यावा असें गडकऱ्यांच्याच मनात नसावें. सुधाकराची आत्यंतिक मनोवृत्ति आणि त्याच्या व्यसनाचा झालेला अतिरेक या गोष्टी विचारांत घेतां रामलालच्या समजुतीच्या बोलण्याचा अथवा संतापाने केलेल्या निर्भर्त्सनेचा सुधाकरावर कोणताहि परिणाम होणेंच शक्य नव्हतें हें मी मागे स्पष्ट केलें आहे. तथापि या बाबतींत रामलाल करारीपणाने कसलीहि खटपट करतो अशी घटना गडकऱ्यांनी दाखविलेली नाही हेंहि खरें आहे. आणि यामुळेच सुधाकराला दारूपासून परावृत्त करण्याची पराकाष्ठा करणें हेंच रामलालचें नाटकांतील मुख्य कार्य आहे असें जें खांडेकरांना वाटतें तेंच बरोबर नाही असें म्हणावेंसें वाटतें.

मग रामलालचें पात्र गडकऱ्यांनी नाटकांत आणलेंच कशासाठी ? या प्रश्नाचें उत्तर अगदी स्पष्ट आहे. "मोहाची जी जी वस्तु असेल, त्या प्रत्येकीच्या बाबतींत हाच सिद्धान्त आहे" असें अंक ४ प्र. ४ मध्ये सुधाकर रामलालला बजावीत आहे. सुधाकर आत्यंतिक मनोवृत्तीचा व तापट असल्यामुळे कसलाहि विचार न करतां दारूच्या मोहाला बळी पडतो. परंतु रामलाल अतिशय शांत, समजूतदार, विवेकी, सरळ पाहणारा, व तत्त्वज्ञानी मनोवृत्तीचा असला तरी तोहि मोहाला बळी पडल्याशिवाय राहत नाही हेंच दाखविण्यासाठी गडकऱ्यांनी मोहाचीं हीं दोन चित्रें निर्माण केलीं आहेत. सुधाकराला दारूचा मोह झाला, तर रामलालला स्त्रीस्पर्शाचा मोह झाला. सिंधूशिवाय दुसऱ्या कोणत्याहि वस्तूचा आपल्याला मोह होणेंच शक्य नाही असें अहंकारी सुधाकराला जें वाटत होतें तें मोहाच्या पहिल्याच भेटींत खोटें ठरलें. आणि जिला अनेक वर्षें मुलीप्रमाणें मानलें त्या शरदविषयीं 'शांतपणानं आणि समतोल मनानं' वागण्याची सवय झालेल्या रामलालसारख्या समंजस माणसालाहि अभिलाषेने नामोहरम केलें, हेंच चित्र गडकऱ्यांना रंगवावयाचें आहे. रामलालसारख्या पोक्त, विरक्त, विवेकी व समजूतदार मनुष्य मानलेल्या मुलीच्या बाबतींत अशी अभिलाषा कशी बाळगील असा प्रश्न विचारणें योग्य होणार नाही. इतका विवेकी मनुष्यहि स्त्रीविषयक अभिलाषेला बळी पडतो हेंच मुळी गडकऱ्यांना दाखवावयाचें आहे. देशभक्तीचे व समाजसुधारणेचे उदात्त विचार प्रामाणिक-

पणाने व्यक्त करणारा, सच्छील वाटणारा मनुष्यहि स्त्रीविषयक अभिलाषेला केव्हा व कसा बळी पडेल तें सांगतां येणार नाही हेंच गडकऱ्यांना आविष्कृत करावयाचें आहे. मोहाला बळी पडण्याचें भय सुधाकराच्या बाबतींत सदैव प्रबळ आहे. परंतु जो असल्या मोहाला बळी पडेल अशी चुकून सुद्धा शंका आपल्या मनांत येणार नाही असा अतिशय विवेकी व ध्येयवादी रामलाल प्रत्यक्ष मानलेल्या मुलीच्या बाबतींतहि चळतो हें दाखवून गडकऱ्यांनी मानवी मनांतील एका अपरिहार्य विसंगतीचें अतिशय मार्मिक दर्शन घडविलें आहे. हें करीत असतां ज्या घटना त्यांनी रंगविल्या त्या नाट्यरचनेच्या दृष्टीने सदोष असल्या व त्यांच्यामुळे प्रमाणबद्धतेला वैगुण्य आलेलें असलें तरी सुद्धा रामलालचें चित्र रंगवितांना गडकऱ्यांच्या मनांत जो उद्देश होता त्याचें आकलन होण्याच्या बाबतींत कांहीहि अडचण येण्याचें कारण नाही. रामलालच्या तोंडीं गडकऱ्यांनी अनेक मोठीं व्याख्यानें घातलीं आहेत[५९] हें खरें आहे. परंतु रामलालला शरद-विषयीं जी कामुक अभिलाषा वाटली तिची घृणास्पदता ठसठशीतपणें जाणवावी यासाठीच कदाचित् गडकऱ्यांनी त्याच्या उदात्त ध्येयवादाचा इतक्या तपशिलाने आविष्कार केला असेल. देशाच्या स्वातंत्र्यासाठी अहर्निश तळमळणाऱ्या आणि सामाजिक सुधारणांचा अतिशय कळकळीने पुरस्कार करणाऱ्या ध्येयवादी माणसावरहि अपरिहार्य मानवी वैगुण्याला बळी पडण्याची पाळी येते ही घटना नाट्याच्या दृष्टीने प्रभावी व्हावी यासाठीच गडकऱ्यांनी रामलालच्या ध्येय-वादाच्या आविष्काराला इतका अवसर दिला असेल असें वाटतें. याला एक उत्कृष्ट पुरावा पांचव्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांत आहे. शरदच्या बाबतींत आपली फार चूक झाली याची तीव्र जाणीव होऊन रामलाल स्वगत म्हणतो— " विद्येनं मनाला उंच वातावरणांत नेऊन ठेवलं तरी आमचीं मनं आकाशांत फिरणाऱ्या घारीगिधाडांप्रमाणें अगदीं क्षुद्र अभिलाषानं सुद्धां ताबडतोब मातीला मिळतात. " स्वतःच्या प्रमादाची कबुली देण्याच्या निमित्ताने रामलालने या ठिकाणीं मानवी स्वभावांतील एका विचित्र विसंगतीचेंच प्रकटीकरण केलें आहे.

## दुबळ्या मनाची मोहवशता

वस्तुस्थिति अशी आहे की, आपले विचार व आचार अत्यंत उदात्त असले पाहिजेत अशी कितीहि खबरदारी रामलाल घेत असला तरी त्याचेंहि मन दुबळें आहे. त्याच्या वृत्तींत दिसून आलेली विचित्र विसंगति या कमकुवत-पणांतूनच निर्माण झाली आहे. शरदला त्याने स्वतःच्या मुलीप्रमाणें मानलें आहे हें खरें आहे. तिच्यावर त्याचे अनंत उपकार झाले होते हेंहि खरें आहे.

५९. अंक १ प्र. १; अंक २ प्र. ३; अंक ३ प्र. ३; अंक ५ प्र. ३

अनेक वर्षे तिच्याकडे त्याने पूर्ण निरभिलाष दृष्टीने पाहिलें असेलहि. तथापि तिच्यावर त्याने केलेल्या उपकाराच्या मोबदल्यांत तिच्याकडून वेगळयाच कांही गोष्टीची अपेक्षा करावयाचा मोह केव्हा तरी त्याला नकळत त्याच्या मनांत शिरला असला पाहिजे. विवेकाने हा मोह आवरून घरण्यांत सुरवातीला त्याला यश मिळालेंहि असेल. परंतु याच वेळीं एक विचित्र घटना घडली आहे. ही घटना अगदी अनपेक्षितपणें घडली आहे. भगीरथाला उपदेश करून त्याने त्याला व्यसनमुक्त केलें व त्यामुळे भगीरथ पुन्हा सन्मार्गाला लागला. रामलालविषयीं पराकाष्ठेची कृतज्ञता वाटत असल्यामुळे तो सारखा रामलालच्याच सहवासांत राहण्याची धडपड करूं लागला. सुधाकराच्या घरांत भयंकर प्रकार सुरू झाल्यावर सिंधूच्या सांगण्यावरून ( अंक ३ प्र. ४ पाहा. “ वन्सं......तुम्ही मात्र आतां या घरांत राहूं नका..... माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हांला !......तुम्हांला इकडल्याप्रमाणंच आपला भाई आहे ! ”) शरद रामलालच्या घरीं येऊन राहिली असेल. रामलालच्या घरीं भगीरथाचा व तिचा परिचय झाला असेल व निसर्गक्रमाप्रमाणें तो झपाट्याने वाढत गेला असेल. उदारमतवादाचा नेहमी पुरस्कार करीत असल्यामुळे रामलालने त्यांच्या या वाढत्या परिचयाकडे दुर्लक्षहि केलें असेल. परंतु त्याच्या कमकुवत मनाने त्याला अखेर दगा दिलाच. भगीरथाशीं शरद इतक्या मोकळेपणाने वागते हें दररोज दिसूं लागतांच भगीरथाचा त्याला मत्सर वाटूं लागतो. आणि इतके दिवस जी अभिलाषा दडपून टाकली असा त्याला भास होत होता ती अभिलाषा एक दिवस एकान्तांत उफाळून आली, आणि उदात्त तात्त्विक विचार तोंडाने बोलत असतांनाच तिला कामुक स्पर्श करण्याचा मोह त्याला आवरला नाही ( अंक ४ प्र. १ ). रामलाल कांही कारण नसतां आपल्याशीं असा तुटकपणें कां वागतो हें भगीरथाला प्रथम कळलें नाही. परंतु शरदकडून तो विचित्र प्रकार समजतांच रामलालच्या मनोव्यापारांची त्याला स्पष्ट कल्पना येते. रामलालचेंहि शरदवर प्रेम आहे, आणि शरद आपल्याशीं इतक्या मोकळेपणाने वागते यामुळे त्याला आपल्या मत्सर वाटत असला पाहिजे, हें भगीरथाच्या लक्षांत आल्यावाचून राहिलेलें नाही. रामलालच्या मनोव्यापाराची कल्पना भगीरथाच्या स्वगतावरून चांगली येईल. “ हा रोगांतला रोग, मनाला मारणारा, जिवाला जाळणारा, हा मत्सर आहे ! प्रेमाच्या स्पर्धेत निराश झालेल्या दीन जीवाचा हा निर्वाणीचा मत्सर आहे !......या वयांत अशा अपत्यस्नेहाच्या भरांत भाईसाहेबांसारख्या विवेकशाली पुरुषालासुद्धां प्रेमानं—हें प्रेम नाहीं; निराशेंत सात्त्विक प्रेम करुणावृत्तीचं रूप घेतं...... भाईसाहेबांनीं आधींच आपल्या प्रेमाची रतिमात्र तरी कल्पना मला दिली असती, तर शरदच्या स्नेहभावाला प्रेमाच्या पायरीवर चढविण्याऐवजीं मीं

केवळ परिचयाच्या उदासीन पदावर बसविलं असतं! पण त्यांनाच आधीं त्यांच्या मनाची वृत्ति कळली नसेल!" (अंक ५ प्र. १)

## रामलालचें आत्माविष्करण

भगीरथाच्या या स्वगतावरून रामलालच्या अंतर्मनांत थैमान घालीत असलेल्या विकारांचा परिचय होण्यास हरकत नाही. पण खुद्द रामलालचा कबुलीजबाब याहीपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. स्वतःच्या मनोव्यापारांचें उत्कृष्ट विश्लेषण त्याने केलें आहे. "माझ्या मनाचं घाणेरडं चित्र आता मला स्वच्छ-पणानं दिसायला लागलं! माझ्या अधःपाताला कांहींतरी सीमा आहे कां? पित्याच्या दृष्टीनं शरदकडे पाहतांना मानीव नात्याच्या मोठेपणानं रक्तमांसाचं अंगभूत तारुण्य डोळ्यांतून मुळींच नाहींसं झालं नाहीं. शरदबद्दल मला जी सहानुभूति, भूतदया म्हणून वाटत होती, ती दुबळ्या मनाच्या (जाड टाईप माझा.) हिंदुपुरुषाची पारावतवृत्ति कामुकता होती! गरीब गीतेला विद्यादान करतांना अनाथाला कल्याणाचा मार्ग दाखविल्यामुळंच आपल्याला हें समाधान होत आहे अशी माझ्या मनाची मी फसवणूक करीत आलों; पण तें तशा उदारपणाचं नव्हतं! गीतेला शिकतांना पाहून शरदला समाधान वाटत होतं म्हणून मला त्यावेळीं उत्साह वाटे! तोसुद्धां प्रियाराधनाचाच एक मार्ग होता!" रामलाल शरदच्या बाबतींत स्वतःच्या मनाची किती विचित्र फसवणूक करीत होता याचें त्याने स्वतःच केलेलें विश्लेषण जितकें विदारक आहे तितकेंच मानवी स्वभावांतील दृढमूल विसंगतींचेंहि तें निदर्शक आहे. कृतज्ञतेने विलक्षण भारावून गेलेला भगीरथ त्याच्याशीं मोकळेपणाने वागूं लागला. त्याच्या या सलगीचा आपल्याला राग येत आहे हें रामलालला कळत होतें. पण केवळ सलगी हेंच एक रामलालला भगीरथाचा तिटकारा येण्याचें कारण नव्हतें. शरद भगीरथाशीं अधिकाधिक सलगीने वागूं लागली म्हणूनच रामलालला भगीरथाचा तिटकारा येऊं लागला हा खरा प्रकार आहे. "भगीरथ आपल्याशीं मनमोकळेपणानं वागल्याचं शरदनं वेळोवेळीं सांगितल्यामुळं न कळत माझ्या मनांत जागृत झालेला मूढ मत्सर हेंच त्या कंटाळ्याचं कारण होतं! त्या तरुण जीवांचा परस्परांकडे ओढा दिसूं लागतांच माझ्या प्रौढ मनांतसुद्धां मत्सराची आग भडकली!···यत्किंचित् सुखाच्या क्षुद्र लोभानं पुत्राप्रमाणं मानलेल्या भगीरथाला दुखवून कन्येप्रमाणें मानलेल्या शरदच्या कोंवळ्या हृदयावर रसरशीत निखारे टाकून माझ्या वयाच्या वडीलपणावर, नात्याच्या जबाबदारीवर आणि विचाराच्या विवेकवृत्तीवरही पाणी सोडायला मी तयार झालों......'

## सामाजिक जीवनांतील विसंगति

स्वतःच्या अंतरंगांतील विकारांच्या विश्लेषणाच्या निमित्ताने आपल्या सामाजिक जीवनांतील विसंगतींचें आणि सुधारणेच्या बाबतींत होत असलेल्या आपल्या आत्मवंचनेचें जें विदारक चित्र रामलालने यावेळीं रेखाटलें आहे त्यामुळे रामलाल आपल्या स्वतःच्या मुखाने हे विचार बोलून दाखवीत नसून खुद्द गडकरीच त्याच्या मुखाने बोलत आहेत असा भास होण्याचा संभव आहे. परंतु अगदी सुरवातीपासूनच तात्त्विक प्रतिपादनाची जी विलक्षण हौस रामलालमध्ये दिसून येते ती लक्षांत घेतली असतां सामाजिक सुधारणांच्या बाबतींत होत असलेल्या आपल्या फसवणुकीसंबंधीं व सामाजिक जीवनांतील अपरिहार्य विसंगतीं-संबंधीं इतक्या आवेगाने तो यावेळीं बोलत असला तर त्यांत अस्वाभाविक असें कांहीहि नाही. " ......हा आमच्या आजच्या दुर्दैवी परिस्थितीचा परिपाक आहे. पराक्रमी पुरुषार्थानं मिळविलेली सत्ता मोकळेपणाच्या उदारपणानं मर्यादित करण्याचा आम्हांला सराव नसल्यामुळं दैवयोगानं प्राप्त झालेली अल्प सत्ता दुबळ्या जीवांवर आम्ही सुलतानी अरेरावीनें गाजवीत असतों. आज हजारों वर्षें मेलेल्या रूढीच्या ठराविक ओझ्याखालीं सांपडून आमचीं मनंही मुर्दाड झाल्यामुळं आज आमच्यांत वस्तुमात्रांतील ईश्वरनिर्मित सौंदर्य मिळविण्याची पवित्र अभिलाषबुद्धि नाहीं. त्या अभिलाषाची पूर्णता करणारी पुरुषार्थाची पराक्रमशक्ति नाहीं. आणि खरं कारण मिळतांच जिवलग सुखाचा त्याग करणारी उदार कर्तव्यनिष्ठा नाहीं ! पूर्वजांनीं तोंडावर टाकलेल्या अर्थ-शून्य शब्दांची बिचारी वेदान्ताची वटवट क्षुद्र सुखाच्या आशेनेंही तावडतोब बंद पडते. विद्येनं मनाला उंच वातावरणांत नेऊन ठेवलं तरी आमचीं मनं आकाशांत फिरणाऱ्या घारीगिधांडाप्रमाणें अगदीं क्षुद्र अभिलाषानं सुद्धां तावडतोब मातीला मिळतात....... "

## सामाजिक सुधारणेंतील आत्मवंचना

सामाजिक जीवनांतील विसंगतींचें चित्र रेखाटल्यावर सुधारणेच्या बाबतींत आपली जी वंचना होत आहे तिचें रामलालने आविष्करण केलें आहे. विधवेच्या बाबतींत हिंदु समाजाने केलेल्या घोर अन्यायांचें वर्णन अत्यंत आवेशाने रामलालने मागे ( अंक ४ प्र. १ ) केलें होतें. 'विधवा' या जाती-विषयींच आपल्याला सहानुभूति वाटते व म्हणून विधवांवर झालेल्या सामाजिक अन्यायांची आपल्याला चीड येते अशी तेव्हा तो स्वतःची फसवणूक करून घेत होता. परंतु कठोर आत्मपरीक्षण केल्यावर त्याची अशी खात्री झाली की,

विधवेविषयीं वाटणारी सहानुभूति ही शरदसारख्या सुंदर विधवेपुरतीच मर्यादित होती.[६०] शरद सुंदर नसती तर तिच्या वैधव्याबद्दल आपल्याला इतकी उत्कट सहानुभूति खरोखरच वाटली असती काय या प्रश्नाचें उत्तर देण्यास त्याचें मन भीत असलें पाहिजे. पण तें उत्तर तो आता देत आहे. " तुझ्यासारख्या कुरूप विधवेबद्दल सहानुभूति वाटण्याइतकी व्यापक सुधारणा अजून आपल्या समाजांत जन्मली नाहीं ! भगीरथासारखं अपवादभूत रत्न एखादंच सांपडण्याचा संभव ! बाकी बहुतेक समाज रामलालसारख्या मनाचाच आहे ! माझ्या उदाहरणावरून मला वाटायला लागलं आहे कीं, आमची सुधारणेंत बरीच आत्मवंचना आहे ! अनाथ बालविधवेची दया येण्याबद्दलहि आम्हांला चांगल्या चेहेऱ्याचा आधार लागतो.[६१] आमची सुधारणा अद्याप डोळ्यांपुरतीच झालेली आहे ! आमची विद्या अजून जिभेवरच नाचत आहे. जिभेचा शेंडा कापून टाकला तर आमच्यांत संस्कृत व प्रौढ मानलेला सुशिक्षित कोणता आणि अप्रबुद्ध व विचारशून्य मानलेला अशिक्षित कोणता, हें देवालाहि कळायचं नाहीं ! "

## रामलालच्या भूमिकेचीं दोन कार्यें

रामलालच्या व्यक्तिचित्राच्या द्वारें दोन गोष्टी साधावयाचा गडकऱ्यांचा विचार दिसतो. रामलालसारख्या शांत, समजूतदार, पोक्त व विवेकी तत्त्वज्ञ

---

६०. " शरद, तुझ्यासारखी सुंदर बालिका वैधव्याच्या यातना भोगतांना पाहिली म्हणजे आर्यावर्ताच्या अवनत इतिहासाची दीन मूर्तीच आपल्यापुढें उभी आहे असं वाटायला लागतं ! सौंदर्य कोणत्याहि स्थितींत आपली नाजूक शोभा सोडीत नाहीं. सौंदर्याला वैधव्याचा अलंकारसुद्धां करुणशोभाच देतो !" ( अंक ४ प्र. १ ). शरदला कामुक स्पर्श करण्याच्या एक क्षणच अगोदर रामलालने काढलेल्या या उद्‌गारांत त्याच्या अंतर्मनांतील दडपून टाकलेले विकार अभावितपणें प्रकट झाले आहेत.

६१. सामाजिक सुधारणेंतील आत्मवंचनेचें व सामाजिक विसंगतीचें एक मोठें मार्मिक चित्र ' एक समस्या ' या गडकऱ्यांच्या कवितेंत आढळेल.

> सुंदर तरुणी हिंडत होती त्या देवाच्या भंवतालीं,
> निरखुनि बघतां—हरहर ! होती विधवा ती बाला असली.
> उचंबळुनी ये करुणारस—नेत्रहि अश्रूंनीं भिजले !
> निर्दयता दैवाची बघुनी हृदय विचारें तें थिजलें.
> न्यायदेवता जागृत झाली त्या सौंदर्या बघतांच......

' गोंडवनांतील प्रियंवदा ' या डॉ. केतकरांच्या कादंबरींतील शारदाबाई उपहासानें म्हणते—"दाक्षिण्य खरेंखुरें फारच थोड्या लोकांत सांपडतें. सुंदर व तरुण स्त्रियांना उठून खुर्ची देणारे व वृद्ध स्त्रियांकडे दुर्लक्ष करणारे लोक आपल्या समाजांत पुष्कळ आहेत."

शरदसारख्या मानलेल्या मुलीच्या बाबतींत मोहवश होतो आणि तें सुद्धा सुधाकर अनर्थाच्या पायऱ्या भराभर ओलांडीत असतां व सिंधूवर दुर्धर प्रसंग कोसळलेला असतांना! मानवी मनाचा अनाकलनीय कमकुवतपणा रामलालच्या रूपाने गडकऱ्यांनी प्रकट केला आहे हें एक. दुसरें म्हणजे उदारमतवादाच्या गप्पा झोकणाऱ्या व सामाजिक सुधारणांचा मोठ्या आवेशाने पुरस्कार करणाऱ्या लोकांचा सुधारणावाद निःस्वार्थ नसून बहुंशीं कोणत्या तरी स्वार्थाच्या कल्पनेंतून तो निर्माण झालेला असतो, एक प्रकारच्या दांभिकपणाने तो दूषित झालेला असतो, व अशा प्रकारें खरी उदार समाजसुधारणा बाजूला राहून आपली केवळ आत्मवंचना होत असते, हें गडकऱ्यांना दाखवावयाचें आहे. 'प्रेमसंन्यास' नाटकांत गडकऱ्यांनी सामाजिक सुधारणेच्या दोन बाजूंचीं परस्परविरोधी चित्रें रंगविलीं होतीं. परंतु त्या नाटकांत एकंदरींत त्यांचा कल सुधारणांच्या आवश्यकतेकडेच झुकत आहे हें स्पष्ट आहे. 'एकच प्याला' लिहिण्याच्या वेळीं या बाबतींत थोडेंसें आत्मपरीक्षण करण्याचा विचार त्यांच्या मनांत जागृत झाला असेल आणि रामलालच्या रूपाने या विचाराचें आविष्करण करावें असें त्यांना वाटलें असेल.

## रचनेंतील शिथिलता

वास्तविक पाहतां सुधाकराच्या मोहवशतेला पूरक म्हणून रामलाल-सारख्या अत्यंत विवेकी माणसाची मोहवशता दाखवून गडकरी थांबले असते तरी त्यांत कांही बिघडलें नसतें. परंतु एका महत्त्वाच्या गोष्टीचें चित्र रेखाटीत असतां जातां जातां एखाद्या आनुषंगिक गोष्टीचें चित्रण करण्याचा मोह त्यांना आवरत नाही हें त्यांच्या प्रत्येक नाटकावरून दिसून येतें. यामुळे रामलालच्या मोहवशतेचें चित्रण करीत असतां आपल्या सामाजिक विसंगतींचें व सुधारणेंतील आत्मवंचनेचें आविष्करण करण्याची संधि त्यांना सोडवली नाही असा याचा अर्थ आहे.

आणि यामुळेच नाट्यरचनेंत गडकऱ्यांनी जाणूनबुजून शिथिलता आणली आहे, नाट्यवस्तूशीं संबद्ध नसलेल्या घटना आणून नाटकाच्या एकात्मतेची त्यांनी हानि केली आहे, अशासारखे आक्षेप घेण्याची टीकाकारांना संधी मिळाली आहे. रामलालचें उपकथानक निर्माण करण्यामध्ये गडकऱ्यांचा कोणता हेतु होता, या उपाख्यानाच्या द्वारें कोणत्या गोष्टी त्यांना साधावयाच्या होत्या, या गोष्टींचें स्पष्टीकरण झालें तरी केवळ नाट्यरचनेचा विचार प्रस्तुत असतां रचनेच्या बांधेसूतपणाची ज्यांच्या योगें हानि होईल, नाट्यवस्तूच्या एकात्मतेंत ज्यांच्या योगें वैगुण्य येईल, अशा घटना रंगवितांना गडकऱ्यांना

संकोच वाटत नाही, किंबहुना स्वैरपणांतच त्यांची प्रतिभा रमते, असा निर्वाळा द्यावयास हरकत नाही.

## भगीरथाच्या उपाख्यानामागील भूमिका

हाच रचनेचा स्वैरपणा भगीरथ व शरद या उपाख्यानांतहि दिसून येईल. रामलालचें उपाख्यान रचण्याच्या बाबतींतील गडकऱ्यांची जी भूमिका होती तिचें स्पष्टीकरण जसें देतां येतें तसेंच स्पष्टीकरण भगीरथ व शरद यांचें उपाख्यान निर्माण करण्यामागे असलेल्या भूमिकेचेंहि देतां येईल. पण असें स्पष्टीकरण देऊनहि, नाटककाराची भूमिका समजावून घेऊनहि, नाट्यरचनेच्या बाबतींत निर्माण होणाऱ्या वैगुण्याचा प्रश्न उपस्थित करणें कांही टीकाकारांच्या दृष्टीने आवश्यक ठरेल.

प्रथम भगीरथाचें उपाख्यान निर्माण करण्याच्या बाबतींतील गडकऱ्यांची भूमिका समजावून घेण्याचा प्रयत्न करूं. सुधाकराची व्यसनासक्ति व भगीरथाची व्यसनासक्ति या दोहोंमध्ये एक साम्य आहे. कोर्टांत झालेल्या भयंकर मानहानी-मुळे होणाऱ्या यातनांचा विसर पडावा यासाठी सुधाकराला दारूची जोड घेणें भाग पडलें. प्रेमभंग झाल्यामुळे होणाऱ्या दारुण व्यथांचा विसर पडावा म्हणून भगीरथ दारू पिऊं लागला आहे.[६२] 'दारूपासून सुख नाहीं' हें त्याला पटलेलें असलें तरी 'दुःखी जीवाला दारू सुखाचें स्वप्न' खास दाखवते या कल्पनेने तो व्यसनासक्त झाला आहे.

मनोभंगाची व्यथा विसरण्यासाठी सुधाकर आणि भगीरथ दारूच्या मोहाला बळी पडतात. या ठिकाणीं या दोघांतील साम्य संपलें आहे. सिंधू-सारखी अत्यंत प्रेमळ पत्नी, रामलालसारखा जिव्हाळ्याचा हितचिंतक, आणि पद्माकर व बाबासाहेब यांच्यासारखे कळकळीचे आप्त यांच्यापैकी कोणालाहि समजुतीच्या शब्दांनी सुधाकराचें व्यसन कमी करण्याच्या बाबतींत कसलेंहि यश आलें नाही. आणि उलट रामलालने थोडासा तात्त्विक उपदेश करतांच भगीरथ दारू सोडण्याची शपथ घेतो, ती कटाक्षाने पाळतो, व सन्मार्गाला लागतो. समजुतीच्या शब्दांचा किंवा संतापाने केलेल्या निर्भर्त्सनेचा सुधाकरावर कसलाहि परिणाम होत नाही, आणि भगीरथ मात्र थोडासा उपदेश ऐकतांच सुधारतो, या प्रकारांतील मर्म समजावून न घेतल्यामुळे कांही टीकाकारांचा विलक्षण

---

६२. "मी दुर्दैवाची दिशाभूल होऊन या आडवाटेला लागलों आहे. संसाराच्या सुरवातीलाच माझा प्रेमभंग झाला आहे. ज्या मुलीवर माझं प्रेम होतं तिचं दुसऱ्याशीं लग्न लागलं आणि संसाराला रामराम ठोकून मी असा फकीर बनलों !" (अंक २ प्र. २)

घोटाळा झाला आहे. या प्रकारांत गडकऱ्यांचेंच कांही तरी चुकलें आहे असें त्यांना वाटतें.[६३]

सुधाकर व्यसनमुक्त होत नाही याला त्याची आत्यंतिक मनोवृत्ति हेंच कारण आहे हें मागे विस्ताराने स्पष्ट केलें आहे. भगीरथ हा प्रेमभंगामुळे आडवाटेला लागलेला असला तरी शुद्धीवर असतांना कोणी चांगल्या शब्दांत उपदेश केला तर सुधारण्यासारखीच त्याची मनोवृत्ति आहे असाच याचा अर्थ आहे. दोघेहि व्यसनी; पण दोघांच्या मनोवृत्तींत केवढें विलक्षण अंतर आहे !

प्रेमभंगाच्या व्यथा असह्य झाल्यामुळे भगीरथ दारूकडे वळला आहे. रामलालच्या उपदेशाने तो व्यसनमुक्त झाला आहे. ज्या कारणामुळे–प्रेमभंगाने झालेल्या मानहानीमुळे—तो प्रथम दारूकडे वळला तें कारणच नष्ट व्हावें व तो पुन्हा दारूकडे वळूं नये, यासाठीच त्याला गडकऱ्यांनी शरदच्या प्रेमांत गुंतविलें आहे. शरदच्या सहवासांत त्याला दारूची चुकून सुद्धा आठवण होत नाही. रामलालचा सहवास, आणि विशेषतः शरदचें प्रेम, हेंच याचें कारण होय. शरदच्या प्रेमाचा लाभ वेळींच झाला नसता तर मनाच्या व्यथा विसरण्यासाठी तो कदाचित पुन्हा मोहवश झालाहि असता. परंतु शरदच्या प्रेमामुळे त्याचें आडवाटेला लागलेलें मन ताळयावर आलें.

सुधाकराच्या बाबतींत साराच विपरीत प्रकार घडला आहे. भयंकर मानहानीमुळे तो दारू पिऊं लागला. सिंधूच्या विलक्षण यातना पाहून त्याला तीव्र पश्चात्ताप झाला व दारू सोडण्याचा त्याने निर्धार केला. पश्चात्तापाच्या या अवस्थेंत त्याची पुन्हा कोणतीहि मानहानि होणें धोक्याचें होतें. आणि त्याच्या दुर्दैवाने नेमकें हेंच घडलें. पुन्हा चांगलें जीवन सुरू करावें या उत्साहाने

---

६३. खांडेकर म्हणतात—"......भगीरथानें दारूला एकदम ठोकलेला रामरामहि फारसा स्वाभाविक वाटत नाहीं. तत्त्वप्रतिपादनाची तर या प्रसंगानें नांगीच मोडून टाकली आहे........दारूचा पहिला थेंब जिभेला लावला कीं मनुष्य बुडाला, मदिरेच्या मोहपाशांतून मग तो कधींहि मुक्त होणार नाहीं अशी घोषणा सर्व नाटकभर चालू असतांना रामलालसारख्या मनुष्याच्या तेवीस ओळींच्या व्याख्यानानें त्याच नाटकांतील एक दारूबाज दारू सोडून देतो ही आश्चर्याची गोष्ट नव्हे काय ?......"

—'गडकरी ( व्यक्ति व वाङ्मय ),' द्वितीयावृत्ति, पृ. १६९

प्रो. ना. सी. फडके विचारतात—"भगीरथ जर रामलालच्या हातून व्यसननिवृत्त होऊं शकतो तर सुधाकर कां होऊं नये ?"—'मासिक मनोरंजन,' सप्टेंबर १९१९, पृष्ठ ९०

तो नोकरी शोधण्यासाठी बाहेर पडला, आणि मन पराकाष्ठेचें दुबळें असतांनाच बंडगार्डनवरील प्रवेशांत त्याला पुन्हा विलक्षण मानहानि सहन करावी लागली. हें दुःख असह्य झाल्यामुळे तो पुन्हा दारूच्या बळी पडला, आणि तो कायमचाच!

सुधाकराच्या व भगीरथाच्या व्यसनी आयुष्यांत घडलेलीं हीं स्थित्यंतरें रंगविण्यांत गडकऱ्यांनी उच्च प्रतीचें कौशल्य व्यक्त केलें आहे हें कबूल केलें पाहिजे.

शरदच्या प्रेमाची प्राप्ति झाल्यामुळे (आणि कांही अंशीं रामलालच्या सहवासामुळे) भगीरथ पूर्णपणें सुधारतो व चांगल्या मार्गाला लागतो एवढेंच दाखवून गडकरी थांबले नाहीत. त्यांनी आणखी एक गुंतागुंत निर्माण केली आहे, व त्या गुंतागुंतींत भगीरथ, शरद व रामलाल या तिघांनाहि अडकवून टाकलें आहे.

कर्तव्यासाठी स्वतःच्या परम सुखाचा त्याग करण्याची जी कल्पना मागे 'पुण्यप्रभाव' नाटकांत वसुंधरेच्या व कालिंदीच्या रूपाने, आणि 'राजसंन्यास' नाटकांत साबाजी, रायाजी व शिवांगी यांच्या द्वारें मांडली होती त्याच त्यागाच्या कल्पनेचा आविष्कार त्यांनी या ठिकाणीं पुन्हा भगीरथाच्या द्वारें केलेला आहे. आणि याच उदात्त त्यागधर्माचा 'भावबंधनां'त ते पुन्हा एकदा आविष्कार करणार आहेत.

## भगीरथाचा अलौकिक त्याग

फार थोड्या अवधींत भगीरथ व शरद यांच्यामधील प्रेम उत्कट होतें. अशा स्थितींत रामलाल शरदला कामुक स्पर्श करतो. (अंक ४ प्र. १). तिची प्रतिक्रिया अनुकूल नसल्यामुळे रामलाल कमालीचा भांबावतो. आपली चूक त्याला कळून येते. पण मनांतील भावना तो दडपून टाकूं शकत नाही. शरदचें भगीरथावर प्रेम आहे याची खात्री होतांच तो भगीरथाशीं एकदम तुटकपणें वागूं लागतो. प्रेमनिराशेच्या पोटीं उत्पन्न झालेला मत्सरच याला कारण आहे. रामलालच्या मनोवृत्तींतील फरक कोणत्या कारणामुळे झाला आहे याची जाणीव होतांच[६४] भगीरथ एकदम एक विलक्षण निश्चय करतो. शरदच्या प्रेमाचा ओघ रामलालकडे वळविण्याचा प्रयत्न करणें हा तो निश्चय होय.

पांचव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत भगीरथाच्या मनांतील भावनांचा संघर्ष प्रकट झाला आहे. रामलालसारख्याच्या मनांत शरदविषयीं कामुक विचार प्रबळ व्हावेत या गोष्टीची त्याला किळस आली आहे. तथापि रामलालने केलेल्या

---

६४. मागे पृ. ७९ पाहावें.

अलौकिक उपकारांच्या ओझ्याखाली तो दबून गेला आहे. रामलालविषयीं त्याच्या मनांत निस्सीम आदराची व आत्यंतिक कृतज्ञतेचीच भावना आहे. यामुळे रामलालविषयीं अनादराची भावना आपल्या मनांत निर्माण होऊं लागलेली दिसतांच तत्क्षणीं तो आपल्या मनाला आवर घालतो. रामलालचें शरदवर प्रेम आहे याची अगोदर थोडीशी जरी कल्पना आली असती तरी त्याने शरद-विषयींच्या आपल्या भावनांना आवर घातला असता, व परिचयाचें प्रेमांत रूपांतर होऊं दिलें नसतें. पण त्याचें शरदवर व शरदचेंहि त्याच्यावर उत्कट प्रेम जडल्यानंतर रामलालच्या प्रेमाची त्याला माहिती झाली आहे. एका बाजूला शरदवरील उत्कट प्रेम, व दुसऱ्या बाजूला रामलालविषयींची आत्यंतिक कृतज्ञता, या कात्रींत तो सापडला आहे. पण कर्तव्यनिष्ठा व कृतज्ञता यांचा विजय होतो, आणि उपकारकर्त्या रामलालच्या सुखासाठी स्वतःच्या परम सुखाचा—शरदच्या प्रेमाचा—त्याग करावयास तो तयार होतो. " तें कांहीं असो; माझ्या जीविताची वाटेल ती वाट लागली तरी भाईसाहेबांच्या सुखाच्या वाटेंत मी कधींही आड येणार नाहीं. भगीरथ प्रयत्नांनीं शरदच्या प्रेमाच्या ओघ भाईसाहेबांकडे वळविलाच पाहिजे " या त्याच्या उद्‌गारांत (अंक ५ प्र. १) त्याच्या त्यागाच्या कल्पनेचें स्वरूप स्पष्ट झालें आहे. रामलालचें शरदवर प्रेम आहे ना, मग शरदने आपल्या आग्रहासाठी रामलालवरच प्रेम केलें पाहिजे, अशी त्याची विचारसरणी आहे. म्हणजे हा त्याग एकेरी नसून दुहेरी आहे. शरदवरील आपलें उत्कट प्रेम मारून टाकण्याचें दिव्य भगीरथ करणार आहे; आणि उलट भगीरथावरील दृढ प्रेम मारून टाकून रामलालवर प्रेम करावयास शिकण्याचें—निदान त्याच्याशीं लग्न करण्याचें—दिव्य शरदला करावें लागणार आहे. परंतु हा त्याग केवळ दुहेरी नसून त्यांत आणखी एक गुंतागुंत आहे. रामलालने केलेल्या उपकारामुळे भगीरथाच्या मनांत त्याच्याविषयीं आत्यंतिक कृतज्ञता वास करीत आहे. कर्तव्यापुढे त्याला स्वतःच्या सुखाची कसलीहि किंमत वाटत नाही. रामलालसाठी तो स्वतःच्या कोणत्याहि सुखाचा त्याग करावयास आनंदाने तयार आहे. परंतु त्याचा त्याग म्हणजे शरदच्याहि सुखाचा त्याग असा प्रकार आहे. रामलालवर प्रेम नसतांना त्याच्यावर प्रेम करण्याची पाळी येणें हा तिच्यावरील अनर्थच होय. पण हा अनर्थ तिने आपल्यावरील प्रेमासाठी सोसलाच पाहिजे असा भगीरथाचा आग्रह आहे. कर्तव्याच्या पूर्ती-साठी ' पुण्यप्रभावां 'तील वसुंधरा व कालिंदी आपल्या मुलाचें बलिदान करावयास तयार होतात; ' राजसंन्यासां 'तील रायाजी असाच कर्तव्यपालनासाठी आपल्या प्रेयसीचा बळी देण्यास तयार होतो व तीहि त्याच्यावरील प्रेमापायीं या घोर बलिदानाला खुषीने तयार होते, यासारखाच प्रकार भगीरथ व शरद यांच्या

बाबतींत पुन्हा करावयाचा असें गडकऱ्यांनी ठरविलेलें दिसतें. "भगीरथाच्या सुखासाठीं वाटेल तें दुःख भोगायला तूं तयार आहेस का ?" असें सांकडें घालून भगीरथ आपल्या मनांतील विचार शरदला स्पष्टपणें बोलून दाखवीत आहे. "तुला भाईसाहेबांची विनंति [६५] मान्य करावी लागेल. रामलालशीं तुला पुनर्विवाह करावा लागेल," ही 'कर्तव्याची स्वार्थवृत्ति' आहे, 'कृतज्ञता विचारशील नसते,' अशा उदात्त शब्दांची पखरण करून शरदचें मन त्यागासाठी तयार करण्याची त्याची धडपड चालली आहे. परमेश्वराच्या ठिकाणीं असलेल्या रामलालच्या सुखासाठी वाटेल तो त्याग करण्याची त्याची तयारी झाली आहे. "या परमेश्वराच्या इच्छेसाठीं सर्वस्वीं आत्मयज्ञ करण्याला मला तत्पर व्हायला नको का ? ......रामलालांच्या सुखासाठीं अखिल ब्रह्माण्डहि ब्रह्मार्पण करणं हा भगीरथाचा एकच धर्म आहे. रामलालचं सुख तेंच भगीरथाचं सुख हें मी तुला सांगतों, आणि भगीरथाचं सुख तेंच शरदचं सुख हें तूं मला सांगितलंस." असें हें भगीरथाचें तर्कशास्त्र आहे. शरदने रामलालशीं लग्न केलें तर तो सुखी होईल, भगीरथाची कृतज्ञता संतुष्ट होईल, आणि 'आपलं सर्वस्व अर्पण केल्यामुळं' शरदलाहि समाधान वाटेल, अशी भगीरथाची ही त्यागाची मोहक कल्पना आहे. 'आत्मत्यागाचा ब्रह्मानंद लुटण्यासाठी तो अधीर झाला आहे, आणि यामुळे हा 'मनोहर मनोभंग' त्याला भाग्यशाली वाटत आहे. त्यागधर्माच्या या आग्रही परिपालनामुळे आपण शरदवर तिच्या इच्छेविरुद्ध त्यागाची कल्पना लादीत आहों व तिच्या भावनांचा विश्वासघात करीत आहों याची जाणीव असली तरी तो आपला आग्रह सोडावयास तयार नाही. "मी तुझा त्याग करणं हें कितीहि अन्यायाचं असलं तरी त्याला तूं आपली संमति दे. ..... या दोन अन्यायांतून एकाचा तरी मला अवलंब करावा लागणारच......माझ्या मृतप्रेमाची अखेरची इच्छा म्हणून मी तुला सांगतों कीं, भाईसाहेबांच्या विनंतीचा— आणि आतां ती माझीहि विनंती आहे—या विनंतीचा अनादर करूं नकोस."

---

६५. रामलालने शरदला पुनर्विवाहाची 'विनंति' केल्याचा कसलाहि पुरावा नाटकांत नाही. अंक ४ प्र. १ मध्ये तो शरदच्या पाठीवरून हात फिरवतो व लगेच चपापून हात काढून घेतो. शरदचा आपल्यावरील विश्वास पूर्णपणें उडाला आहे हें पाहून तो बेचैन होतो. "माझं मन खरंच चलित झालं आहे कीं—छे, मला कांहींच सुचेनासं झालं आहे !" एवढाच उद्गार शरद निघून गेल्यावर तो स्वतःशीं काढतो. यानंतर शरदला पुनर्विवाहाची विनंती त्याने केली असा एकहि पुरावा नाही. या विनंतीचा भगीरथाने याच प्रवेशांत आणखी एकदा उल्लेख केला आहे. "भाईसाहेबांच्या विनंतीचा ......अनादर करूं नकोस."

भगीरथाच्या अंतरंगांतील भावनेची एक सूक्ष्म छटा या ठिकाणीं प्रकट झाली आहे. रामलालशीं लग्न करण्याचा आग्रह भगीरथ शरदला करीत आहे. परंतु कसलाहि निषेध न करतां या गोष्टीला तिने संमति दिली असती तर तें भगीरथाला मुळीच आवडलें नसतें. स्वतःची मुळीच इच्छा नसतां केवळ प्रियकराच्या इच्छेमुळेच ती रामलालशीं लग्न करावयास जिवाच्या करारावर तयार झाली आहे, या घटनेमुळेच भगीरथाला अपरिमित सुख होणार आहे. तिने मनापासून रुकार देऊं नये, नाइलाज म्हणून इच्छेविरुद्ध रुकार द्यावा, अशीच त्याची अंतर्यामींची तळमळ आहे. "हिच्या या रडण्यामुळें या त्यागाचा मला केवढा आनंद वाटत आहे! माझ्या विनंतीला ही चुकून तरी मनापासून रुकार देईल कीं काय, अशी मनाला भीति वाटते. हिच्या इच्छेविरुद्ध आणि केवळ माझ्या इच्छेमुळेच ही हा स्वार्थत्याग करीत आहे या कल्पनेंतच माझ्या आनंदाचें रहस्य आहे." या भगीरथाच्या आत्माविष्कारांत मानवी मनांतील आणखी एका दृढमूल विसंगतीचें (अथवा वैगुण्याचें) उत्कट व मार्मिक दर्शन झालें आहे.

## रचनेंतील वैगुण्य

रामलाल, भगीरथ, व शरद यांचें उपाख्यान निर्माण करण्याच्या मागची गडकऱ्यांची भूमिका समजावून घेतली तरी नाट्यरचनेच्या दृष्टीने त्याचें औचित्य विचारांत घेतलें पाहिजे असें अनेकांना वाटेल. नाट्यवस्तूच्या एकात्मतेचा कांटेकोर विचार केला तर रामलालला शरदचा मोह होतो ही घटना नाट्यवस्तूला पोषकच ठरेल हें मान्य करण्याच्या बाबतींत फारशी अडचण यावयाची नाही. त्याचप्रमाणें भगीरथ व्यसनमुक्त होतो ही घटनाहि विरोधपद्धतीचें उदाहरण म्हणून मान्य केली जाण्याची शक्यता आहे. परंतु शरद व भगीरथ यांचें प्रेमप्रकरण, रामलालच्या शरदवरील प्रेमाचें प्रकरण, आणि रामलालसाठी भगीरथाने केलेल्या त्यागाचें सर्वांगपरिपूर्ण चित्र, या घटनांच्या तपशीलवार चित्रणामुळे नाट्यरचना सदोष झाली आहे व नाटकाच्या एकात्मतेला बाध आला आहे या आक्षेपाचें निराकरण करणें कठिण आहे हें कबूल केलें पाहिजे.

रामलाल आणि भगीरथ यांच्यामधील तात्त्विक चर्चेच्या बाबतींतहि आक्षेप येणें स्वाभाविक आहे. भगीरथाला उपदेश करून रामलाल त्याला व्यसनमुक्त करतो ही घटना अंक २ प्र. ३ च्या शेवटीं घडलेली आहे. रामलाल व भगीरथ यांचा स्नेह अतिशय झपाट्याने वाढत गेला असला पाहिजे असें दिसतें. कारण, रामलालच्या उपदेशाने भगीरथ ज्या दिवशीं दारू सोडण्याची शपथ घेतो त्याच्या दुसऱ्याच दिवशीं सुधाकराची सनद कायमची रद्द झाली ही बातमी

बाबतींत पुन्हा करावयाचा असें गडकऱ्यांनी ठरविलेलें दिसतें. " भगीरथाच्या सुखासाठीं वाटेल तें दुःख भोगायला तूं तयार आहेस का ? " असें सांकडें घालून भगीरथ आपल्या मनांतील विचार शरदला स्पष्टपणें बोलून दाखवीत आहे. " तुला भाईसाहेबांची विनंति[६५] मान्य करावी लागेल. रामलालशीं तुला पुनर्विवाह करावा लागेल, " ही ' कर्तव्याची स्वार्थवृत्ति ' आहे, ' कृतज्ञता विचारशील नसते, ' अशा उदात्त शब्दांची पखरण करून शरदचें मन त्यागासाठी तयार करण्याची त्याची धडपड चालली आहे. परमेश्वराच्या ठिकाणीं असलेल्या रामलालच्या सुखासाठी वाटेल तो त्याग करण्याची त्याची तयारी झाली आहे. " या परमेश्वराच्या इच्छेसाठीं सर्वस्वीं आत्मयज्ञ करण्याला मला तत्पर व्हायला नको का ? ......रामलालांच्या सुखासाठीं अखिल ब्रह्माण्डहि ब्रह्मार्पण करणं हा भगीरथाचा एकच धर्म आहे. रामलालचं सुख तेंच भगीरथाचं सुख हें मी तुला सांगतों, आणि भगीरथाचं सुख तेंच शरदचं सुख हें तूं मला सांगितलंस. " असें हें भगीरथाचें तर्कशास्त्र आहे. शरदने रामलालशीं लग्न केलें तर तो सुखी होईल, भगीरथाची कृतज्ञता संतुष्ट होईल, आणि ' आपलं सर्वस्व अर्पण केल्यामुळं ' शरदलाहि समाधान वाटेल, अशी भगीरथाची ही त्यागाची मोहक कल्पना आहे. ' आत्मत्यागाचा ब्रह्मानंद लुटण्यासाठी तो अधीर झाला आहे, आणि यामुळे हा ' मनोहर मनोभंग ' त्याला भाग्यशाली वाटत आहे. त्यागधर्माच्या या आग्रही परिपालनामुळे आपण शरदवर तिच्या इच्छेविरुद्ध त्यागाची कल्पना लादीत आहों व तिच्या भावनांचा विश्वासघात करीत आहों याची जाणीव असली तरी तो आपला आग्रह सोडावयास तयार नाही. " मी तुझा त्याग करणं हें कितीहि अन्यायाचं असलं तरी त्याला तूं आपली संमति दे. ..... या दोन अन्यायांतून एकाचा तरी मला अवलंब करावा लागणारच......माझ्या मृतप्रेमाची अखेरची इच्छा म्हणून मी तुला सांगतों कीं, भाईसाहेबांच्या विनंतीचा— आणि आतां ती माझीहि विनंती आहे— या विनंतीचा अनादर करूं नकोस."

---

६५. रामलालने शरदला पुनर्विवाहाची ' विनंति ' केल्याचा कसलाहि पुरावा नाटकांत नाही. अंक ४ प्र. १ मध्ये तो शरदच्या पाठीवरून हात फिरवतो व लगेच चपापून हात काढून घेतो. शरदचा आपल्यावरील विश्वास पूर्णपणें उडाला आहे हें पाहून तो बेचैन होतो. " माझं मन खरंच चलित झालं आहे कीं—छे, मला कांहींच सुचेनासं झालं आहे !" एवढाच उद्‌गार शरद निघून गेल्यावर तो स्वतःशीं काढतो. यानंतर शरदला पुनर्विवाहाची विनंती त्यानें केली असा एकहि पुरावा नाही. या विनंतीचा भगीरथानें याच प्रवेशांत आणखी एकदा उल्लेख केला आहे. " भाईसाहेबांच्या विनंतीचा ......अनादर करूं नकोस."

भगीरथाच्या अंतरंगांतील भावनेची एक सूक्ष्म छटा या ठिकाणीं प्रकट झाली आहे. रामलालशीं लग्न करण्याचा आग्रह भगीरथ शरदला करीत आहे. परंतु कसलाहि निषेध न करतां या गोष्टीला तिने संमति दिली असती तर तें भगीरथाला मुळीच आवडलें नसतें. स्वतःची मुळीच इच्छा नसतां केवळ प्रियकराच्या इच्छेमुळेच ती रामलालशीं लग्न करावयास जिवाच्या करारावर तयार झाली आहे, या घटनेमुळेच भगीरथाला अपरिमित सुख होणार आहे. तिने मनापासून रुकार देऊं नये, नाइलाज म्हणून इच्छेविरुद्ध रुकार द्यावा, अशीच त्याची अंतर्यामींची तळमळ आहे. "हिच्या या रडण्यामुळें या त्यागाचा मला केवढा आनंद वाटत आहे! माझ्या विनंतीला ही चुकून तरी मनापासून रुकार देईल कीं काय, अशी मनाला भीति वाटते. हिच्या इच्छेविरुद्ध आणि केवळ माझ्या इच्छेमुळेच ही हा स्वार्थत्याग करीत आहे या कल्पनेंतच माझ्या आनंदाचें रहस्य आहे." या भगीरथाच्या आत्माविष्कारांत मानवी मनांतील आणखी एका दृढमूल विसंगतीचें (अथवा वैगुण्याचें) उत्कट व मार्मिक दर्शन झालें आहे.

## रचनेंतील वैगुण्य

रामलाल, भगीरथ, व शरद यांचें उपाख्यान निर्माण करण्याच्या मागची गडकऱ्यांची भूमिका समजावून घेतली तरी नाट्यरचनेच्या दृष्टीने त्याचें औचित्य विचारांत घेतलें पाहिजे असें अनेकांना वाटेल. नाट्यवस्तूच्या एकात्मतेचा कांटेकोर विचार केला तर रामलालला शरदचा मोह होतो ही घटना नाट्यवस्तूला पोषकच ठरेल हें मान्य करण्याच्या बाबतींत फारशी अडचण यावयाची नाही. त्याचप्रमाणें भगीरथ व्यसनमुक्त होतो ही घटनाहि विरोधपद्धतीचें उदाहरण म्हणून मान्य केली जाण्याची शक्यता आहे. परंतु शरद व भगीरथ यांचें प्रेमप्रकरण, रामलालच्या शरदवरील प्रेमाचें प्रकरण, आणि रामलालसाठी भगीरथाने केलेल्या त्यागाचें सर्वांगपरिपूर्ण चित्र, या घटनांच्या तपशीलवार चित्रणामुळे नाट्यरचना सदोष झाली आहे व नाटकाच्या एकात्मतेला बाध आला आहे या आक्षेपाचें निराकरण करणें कठिण आहे हें कबूल केलें पाहिजे.

रामलाल आणि भगीरथ यांच्यामधील तात्त्विक चर्चेच्या बाबतींतहि आक्षेप येणें स्वाभाविक आहे. भगीरथाला उपदेश करून रामलाल त्याला व्यसनमुक्त करतो ही घटना अंक २ प्र. ३ च्या शेवटीं घडलेली आहे. रामलाल व भगीरथ यांचा स्नेह अतिशय झपाट्याने वाढत गेला असला पाहिजे असें दिसतें. कारण, रामलालच्या उपदेशाने भगीरथ ज्या दिवशीं दारू सोडण्याची शपथ घेतो त्याच्या दुसऱ्याच दिवशीं सुधाकराची सनद कायमची रद्द झाली ही बातमी

प्रथम भगीरथच सुधाकराच्या घरीं येऊन रामलालला सांगतो. ही गोष्ट अंक ३ प्र. १ मध्ये घडते. यानंतर भगीरथाचा शरदशींहि फारच झपाट्याने सहवास वाढत वाढत गेलेला दिसतो. कारण अंक ३ प्र. ३ मध्ये रामलालच्या घरीं एकान्तांत भगीरथ शरदला 'लोकभ्रम' हा निबंध समजावून देत आहे. साध्या परिचयाची अवस्था संपून त्या दोघांमध्ये उत्कट प्रेमभावना जागृत झाली आहे याच्या स्पष्ट खुणा त्यांच्या बोलण्यांत आढळतात. सुधाकराचें व्यसन अगदी भलत्या थराला गेलें आहे, त्याची सनदहि कायमची रद्द झाली आहे, घरांत सिंधूच्या यातना प्रतिक्षणीं अधिक बिकट होत आहेत, हें डोळ्यांसमोर दिसत असतां रामलालच्या घरीं एकान्तांत शरद भगीरथाकडून निबंध समजावून घेत आहे इतकेंच नव्हे तर त्याच्या प्रेमांतहि पडली आहे ही घटना चमत्कारिक वाटण्यासारखीच आहे. भगीरथ शरदला निबंध समजावून देत असतांनाच रामलाल येतो, आणि सुधाकराच्या परिस्थितीविषयीं पद्माकराला ताबडतोब तार करावयास तो भगीरथाला सांगतो. सुधाकराच्या व्यसनाची बिकट अवस्था व त्याला समजावून सांगण्याच्या बाबतींत रामलालसारख्या जिव्हाळ्याच्या हितचिंतकाला आलेलें संपूर्ण अपयश, या गोष्टी लक्षांत घेतां भगीरथाने ताबडतोब तार करावयास हवी होती असेंच कोणीहि म्हणेल. परंतु 'तार आतांच करून येऊं का?' असें तो विचारतो. आणि 'इतकी कांहीं घाई नाहीं. आणखी थोड्या वेळानं केली तरी चालेल' असें रामलालहि म्हणतो. आणि गंमत ही की, 'तितक्या वेळांत कालचा विषय पुरा करून' टाकण्याची विनंती भगीरथ करतो, व रामलालहि देशकालपरिस्थितीचा कसलाहि विचार न करतां 'लोककल्याणाचा मार्ग' या विषयावर भगीरथाला एक लांबलचक व्याख्यान देतो. व्याख्यान आटोपल्यावर त्याला सुधाकराची आठवण होते व पद्माकराला तार करण्याची तो भगीरथाला सूचना देतो.

तिसऱ्या अंकाचा चवथा प्रवेश म्हणजे सुधाकराच्या बेताल अनर्थांचा कळसच होय. रामलाल, पद्माकर व बाबासाहेब यांचा गलिच्छ शब्दांनी अपमान करून सुधाकर त्या साऱ्यांना हाकलून देतो व सिंधूच्या समोर राजरोस पिऊं लागतो. शरदने हा सारा भयंकर प्रकार डोळ्यांनी पाहिला आहे. हा प्रकार घडल्यावर सिंधूच्या आग्रहावरून ती रामलालच्या घरीं जाऊन राहिली असावी असें दिसतें. तथापि इतक्या हृदयद्रावक घटना घडल्यानंतर थोड्याच दिवसांनी अंक ४ प्र. १ मध्ये एकान्तांत शरदला रघुवंशांतील एक श्लोक समजावून देत असतां रामलाल शरदच्या बाबतींत मोहवश होतो व कामुक वृत्तीने स्पर्श करतो. ही घटना एरवी आकलनीय असली तरी सुधाकराची या वेळची

भयंकर परिस्थिति व सिंधूच्या दारुण यातना यांची आठवण होतांच अनाकलनीय व चमत्कारिक वाटूं लागते.

आणखी एक अजब प्रकार घडला आहे. अंक ४ प्र. ५ च्या शेवटीं सुधाकर आपल्या मुलाला ठार मारतो व सिंधूला जबर जखम करतो. इतक्यांत पद्माकर येतो. डोळयांनी हा घोर अनर्थ पाहिल्यावर पद्माकर ताबडतोब फौजदाराकडे जाणें हेंच माणुसकीच्या दृष्टीने स्वाभाविक आहे. यानंतरच्या पहिल्याच प्रवेशांत पद्माकर फौजदाराला घेऊन येतो हीच घटना रचनेच्या दृष्टीने अत्यंत स्वाभाविक किंबहुना आवश्यक अशीच आहे. मानवी स्वभावालाहि ती धरून आहे. परंतु पांचव्या अंकाचा सबंध पहिला प्रवेश भगीरथाच्या त्यागधर्माच्या आविष्काराला वाहिला आहे. हा प्रवेश साडेपांच पानांचा आहे. यानंतर अंक ५ प्र. ३ मध्ये रामलालचें आत्माविष्करण सुरवातीला असून मग भगीरथाचा त्याग व शेवटीं रामलालचा पश्चात्ताप आणि सुधारणेंतील आपल्या आत्मवंचनेविषयीं व सामाजिक विसंगतीविषयीं त्याचें प्रतिपादन आहे. हाहि प्रवेश पांच पानांचा आहे. तिकडे सुधाकराने मुलाला ठार मारलें आहे व सिंधूला जबर जखम केली आहे, पद्माकर फौजदाराला बोलावून आणण्यासाठी धावत गेला आहे. आणि इकडे रामलालच्या ‘ आश्रमां ’त प्रत्यक्ष सुधाकराची बहीण शरद, त्याचा निस्सीम हितचिंतक व मित्र रामलाल, आणि भगीरथ किती वेगळ्या विषयावर कसली चर्चा करीत आहेत! एरवी या घटनेवर आक्षेप घेण्याचें कारण नव्हतें. पण सुधाकराच्या घरीं भीषण अनर्थ झालेला असतां त्याच वेळीं सुधाकराच्या जीवनाशीं अतिशय निकटचा संबंध असलेल्या शरदने व रामलालने स्थळकाळाचा कसलाहि विचार न करतां आपल्याच वैयक्तिक गोष्टींत इतकें दंग असावें हें खरोखर चमत्कारिक आहे यांत शंकाच नाही. भगीरथाच्या त्यागधर्माचें संपूर्ण आविष्करण झाल्यावर आणि रामलालचें आत्माविष्करण पूर्ण झाल्यावर मग अंक ५ प्र. ५ मध्ये पद्माकर फौजदाराला घेऊन सुधाकराच्या घरीं आलेला आहे. तब्बल एकोणीस पानांचे तीन प्रवेश मध्यंतरीं होऊन गेल्यावर मग गडकऱ्यांना सुधाकराच्या मेलेल्या मुलाची व जखमी स्थितींत बेशुद्ध होऊन पडलेल्या सिंधूची आठवण होते. इतकी भीषण घटना घडल्यानंतरहि हे तीन प्रवेश गडकऱ्यांनी रंगविले असल्यामुळेच नाट्यरचनेच्या बाबतींतील वैगुण्यांकडे त्यांनी कधी लक्षच दिलें नाही असा आक्षेप घेण्याची संधी टीकाकारांना मिळाली आहे. आणि रामलाल, भगीरथ व शरद यांच्या उपाख्यानाच्या बाबतींत तरी हा आक्षेप बव्हंशीं मान्यच करावा लागेल.

## √ जगनिंदक तळिरामाच्या भूमिकेचें मर्म

मानहानीच्या दारुण व्यथांचा विसर थोडा वेळ तरी पडावा या विचाराने सुधाकर तळमळत असतां त्याला दारूचा उपाय सुचविला प्रथम तळिरामानेच. ज्या व्यसनापायीं सुधाकर माणसांतून उठतो व पशु बनतो व स्वतःचा नाश ओढवून घेतो तें व्यसन सुधाकराला जडवून एका अर्थाने तळिरामच त्याच्या नाशाला कारणीभूत झाला आहे, किंवा त्याचा होणार असलेला नाश तळिरामाने जवळ आणला आहे, असें म्हणणें शक्य आहे.

तळिराम इरसाल दारूबाज असून व्यसनाच्या साऱ्या पायऱ्या त्याने ओलांडल्या आहेत. दारूपायीं घरांतली सारी चीजवस्त विकून टाकावयासहि त्याने कमी केलें नाही. अखेर बायकोचें मंगळसूत्र ओढण्यासहि तो कमी करीत नाही.

असा हा अट्टल दारूबाज सुधाकराचा कराकून आहे. "मनुष्य मोठा चलाख, हुशार आणि जिवाला जीव देणारा आहे" अशी सुधाकराची त्याच्याविषयीं समजूत आहे ( अंक १ प्र. ३ ).[६६]

कोणत्याहि गोष्टीवर श्रद्धा नसलेला, कसल्याहि मृदु भावनेच्या आहारीं न जाणारा, जगांतील प्रत्येक चांगल्या व उदात्त गोष्टीची क्रूर टवाळी करणारा असा हा 'जगनिंदक' आहे; त्याचा नाठाळ पाखंडीपणा अक्षरशः परिसीमेला पोचलेला आहे. नाटकांतील त्याचे उद्गार पाहिले म्हणजे तो इरसाल 'सिनिक' आहे असेंच म्हणावें लागतें.[६७]

---

६६. तळिराम सारखा घरांत वावरत असतां त्याच्या अमर्याद व्यसनाची सुधाकराला एकदाहि कल्पना कशी आली नाही याचें कोडें पडणें स्वाभाविक आहे. या बाबतींत प्रो. ना. सी. फडके म्हणतात—"......तळिरामाची अमर्याद दारूबाजी त्याला ( सुधाकराला ) माहीत नसेल काय?........रामलालला ही गोष्ट ठाऊक असलीच पाहिजे... ...दारूचा पहिला प्याला सुधाकराला पाजणाऱ्या तळिरामाचें सुधाकराच्या घरीं नांदणें अशक्य कोटींतील आहे."—'मासिक मनोरंजन,' सप्टेंबर १९१९, पृ. ८९

६७. प्रा. श्री. के. क्षीरसागर म्हणतात—"ज्याला कशासंबंधीं श्रद्धा उरली नाहीं; आणि कुणाहिसंबंधीं आदर उरला नाहीं; आणि तरीहि ज्याची 'क्षुरस्य धारा इव' नितान्त तीव्र बुद्धिमत्ता बाकी उरली; आणि जो केवळ जीव आहे तोंवर इंद्रियलालन करावयाचें या नियमानुसार जीवन व्यतीत करीत आहे अशा तऱ्हेचा तो एक भयानक 'सिनिक' ( cynic ) आहे." — 'एकच प्याला,' सातव्या आवृत्तीची प्रस्तावना, ( १९४६ ), पृ. ५६

जगांतील प्रत्येक चांगल्या गोष्टीची निंदा करणें ही गोष्ट जशी त्याच्या स्वभावांत मुरली आहे तशीच जगाविषयीं तिरस्काराची भावनाहि त्याच्या ठायीं प्रबळ आहे. अत्यंत तीव्र उपहास आणि निंद्य गोष्टी सूचित करण्याची विलक्षण लालसा यांचें मिश्रण त्याच्या स्वभावांत झालें आहे. त्याच्या प्रत्येक शब्दांत जलाल विखार भरला आहे, आणि त्याचा डंख अतिशय दाहक आहे. एक प्रकारची दाहक बुद्धिमत्ता त्याच्या ठायीं उपजतच आहे. "तोंडावर तर सरस्वती बसली आहे तुमच्या!" हा गीतेचा उद्गार (अंक १ प्र. २) अगदी सार्थ आहे. त्याचा हजरजबाबीपणा विलक्षण आहे. कोणाचाहि कसलाहि शब्द तो खाली पडूं देत नाही. दारूचे फायदे वर्णन करावयाचे असोत, अथवा प्रीतिविवाहाची निंदा करावयाची असो, कमालीचा उपहास त्याच्या प्रत्येक शब्दांतून ओसंडून वाहत आहे. साऱ्या जगाला 'अजाण' मानून त्याची टवाळी करण्यांत त्याला कांही विशेषच आनंद वाटतो. "भगीरथ, तुम्ही एक पेला घ्या आणखी. म्हणजे तुमच्या जिभेवरून हे उदात्त वगैरे शब्द धुवून जातील." हीच त्याची प्रत्येक चांगल्या गोष्टीकडे पाहण्याची वृत्ति आहे. या वृत्तीमुळे प्रीतिविवाहाचा तीव्र उपहास करण्याची संधी तो वाया जाऊं देत नाही.[६८] हा उपहास अत्यंत दाहक असला तरी त्यांत त्याची तीव्र बुद्धिमत्ता स्पष्ट दिसून येते. हीच प्रखर बुद्धिमत्ता त्याच्या प्रत्येक कोटींत सामावलेली आहे.

सुधाकराचा द्वेष किंवा मत्सर करण्याचें तळिरामाला कांहीहि कारण नाही. किंबहुना सुधाकराच्या ठायीं असलेल्या स्पृहणीय गुणांची त्याला चांगली जाणीव आहे. "दादासाहेब तुम्ही म्हणतां त्यापेक्षांहि चांगले आहेत. पण त्यांचा स्वभाव फारच तापट आहे....एखाद्याचं नव्यानं नांव होऊं लागलं म्हणजे सारा गांव त्याच्या वाईटावर असतो. आमच्या दादासाहेबांचं बरं इथं कोणालाहि बघवत नाहीं." एखादा हितचिंतक ज्या पद्धतीने सुधाकराचें वर्णन करील त्याच पद्धतीने तळिरामाने हें वर्णन केलें आहे. पण हें वर्णन

६८. "रंगभूमीच्या आणि प्रेक्षकांच्या मध्यें दिव्यांची एक धगधगीत अग्निरेषा असते. नाट्यसृष्टीची ही मर्यादा ओलांडून प्रीतिविवाह सत्यसृष्टींत उतरला, म्हणजे त्याचे पोरखेळ निम्मे दरानंसुद्धां पहाण्याच्या लायकीचे नसतात. लोक म्हणतात, नाटक हें संसाराचं चित्र आहे. पण मी म्हणतों कीं, हल्लीं संसार हें नाटकाचं चित्र बनत चाललं आहे! प्रीतिविवाहाच्या पूर्वार्धाचा उत्तरार्धाशीं काडीइतकाहि संबंध नसतो; किंवा काडीइतकाच संबंध असतो. प्रीतिविवाह हा द्वंद्वसमास असून वकिलामार्फत त्याचा विग्रह करून घ्यावा लागतो." (अंक १ प्र. २)

संपतें न संपतें तोंच तळिराम म्हणतो—" तरी बरं, म्हातारा पुष्कळ पोक्त; म्हणून सहा महिन्यांच्या मुदतीपुरतीच त्यानं सनद रद्द केली. दुसरा कोणी, अहो, मी असतों तरीसुद्धां जन्माचं संसारांतून उठविलं असतं ! "

पण सुधाकराचा नाश करण्यासाठी टपलेला व्हिलन ही तळिरामाची भूमिका नाही. सुधाकराविषयीं त्याने हे जे उदगार काढले आहेत त्यांत त्याच्या विश्वद्वेषाचेंच प्रत्यंतर येईल. सुधाकराचा घात करावयाचा अशी पूर्वयोजना करून तो कांहीहि करत नाही. सुधाकराला त्याने दारूचा मोह निर्माण केला हें खरें आहे. पण सुधाकराचा घात करावा या बुद्धीनेच त्याने सुधाकराला दारूचा पेला दिले असें मानण्याचें कारण नाही. मानहानीमुळे होणाऱ्या दारुण यातना विसरणें शक्य व्हावें व त्याच्या मनाला थोडें बरें वाटावें या हेतूनेहि कदाचित् त्याने सुधाकरापुढे दारू ठेवली असेल. सुधाकराला प्रथम दारू पाजतांना तो कौशल्याने बोलतो व सुधाकराचें मन तयार करतो हें खरें आहे. पण तेवढयाने सुधाकराचा घात करावयाचा असें मनाशीं ठरवूनच त्याने सुधारला दारूचा पेला दिला असें म्हणतां यावयाचें नाही.

एकदा सुधाकर व्यसनाच्या आहारीं जाऊन अतिरेक करूं लागल्यावर वृत्तीने तो तळिरामाशीं आणि आर्यमदिरामंडळांतील दारूबाज सभासदांशीं एकरूप झाला. तळिरामाला तो जिवलग दोस्त मानूं लागला. सुधाकरासारखा एवढा प्रतिष्ठित, संभावित, व बुद्धिमान वकील इतक्या खालच्या दर्जाला येऊन आपल्याला जिवाचा दोस्त मानतो या कल्पनेने तळिरामाला आपला विजय झाला असें वाटलें असेल. सुधाकराचा प्रेमळ व सुखी संसार, त्याचें सिंधूवरील निःसीम प्रेम, त्याची कर्तबगारी, त्याचें वैभव, या साऱ्या गोष्टी तळिरामाच्या दृष्टीने अगदी अर्थशून्य होत्या. यामुळे सुधाकर आपल्या पंक्तीला येऊन बसला हें दिसतांच त्याच्यांत व आपल्यांत आतां कसलेंहि अंतर उरलें नाही, या विचाराने तळिरामाच्या दारूबाज आनंदाला बहर आला असेल. ज्याच्या दाराशीं पूर्वी आपण साधे कारकून म्हणून बसत होतों तोच सुधाकर आता आपल्या पूर्ण आहारीं गेला आहे हें पाहतांच आपल्या कर्तबगारीचाच हा विजय आहे असें त्याला वाटलें असेल. एका थोर, प्रतिष्ठित गृहस्थाचा प्रतिक्षणीं पशु बनत आहे. हें पाहून त्याच्या विश्वद्वेष्ट्या वृत्तीला संतोष झाला असेल.

तीव्र उपहास आणि निंद्य गोष्ट सूचित करण्याचा हव्यास यांचें त्याच्या 'सिनिसिझम् 'मध्ये मिश्रण झालें आहे असें मागे म्हटलें होतें याचें प्रत्यंतर अंक २ प्र. ३ मध्ये मिळेल. " उद्यां त्या लोकांच्या नाकावर टिचून दारू पिऊनच कचेरींत हजर व्हा " असें सुधाकराला तो डिवचतो. त्याच्या प्रत्येक

उद्गाराचा कांही विचित्र परिणाम आता सुधाकरावर होऊं लागलेला आहे. यामुळे सुधाकर खरोखरच दुसऱ्या दिवशीं दारू पिऊनच कोर्टांत जातो.

सुधाकराची सनद कायमची रद्द झाल्यावर तो बेताल अनर्थ करूं लागतो. तो अर्धवट शुद्धींत असतां मोठ्या हिकमतीने सूचक उद्गारांच्या साहाय्याने तळिराम सुधाकराचें मन अधिकच बिथरवतो, आणि सुधाकर भलतेंसलतें बडबडूं लागतो ( अंक ३ प्र. ४ ). "हें घर तुमचं नाहीं. हें घर रामलालचं आहे," "सगळयांनीं संगनमत करून आज पद्माकराला तार केली आहे" असलीं वाक्यें उच्चारून तो सुधाकराला डिवचतो. सुधाकराच्या सूचनेचा फायदा घेऊन सिंधूच्या गळ्यांतील मंगळसूत्र तोडूं लागतो. रामलाल आणि पद्माकर येतांच सूचक शब्द उच्चारण्याची व सुधाकराचें मन बेताल करण्याची तो शर्थ करतो. "तुमची सनद गेली त्यावेळीं यानं बाईसाहेबांना मिठी मारली!" असले अभद्र शब्द उच्चारून रामलालविषयीं सुधाकाराच्या मनांत जलाल विष कालवितो. रामलालला सुधाकर अत्यंत गलिच्छ शब्द ऐकवतो. पण एवढ्यानेच भागत नाही. तळिरामाच्या या उद्गाराने सुधाकराच्या मनांत कायमचें घर केलें असलें पाहिजे याचा पुरावा अंक ४ प्र. ५ मध्ये आढळेल. "तें कारटं त्या रामलालचं आहे! माझं नाहीं!" असें सुधाकर सिंधूला जें बोलतो त्याचें मूळ तळिरामाच्या या गलिच्छ उद्गारांतच असलें पाहिजे.

सुधाकर अशा प्रकारें विनाशाच्या उतरणीला लागेपर्यंत तळिराम त्याला सोबत करतो आणि अंतर्धान पावतो. तो यानंतर आपल्याला भेटतो तो आसन्नमरण अवस्थेंतच. मरण अगदी जवळ आलें आहे याची खात्री झाली असली तरी त्याचा नतद्रष्टपणा कांही कमी होत नाही, त्याच्या कोटींतील विषारी डंख व तीव्र उपहास मृत्युशय्येवरहि सौम्य होत नाही. मानवी जीवनांतील प्रत्येक गोष्टीचा तिरस्कार तळिरामाने साऱ्या हयातभर केला, पण दारूबाज दोस्तांत वावरून त्याने आपल्या तिरस्काराला भरपूर खाद्य पुरवलें. आता मरतेसमयींहि त्याचा तोंडाळपणा चालूच आहे. शेवटच्या क्षणीं आपल्या दारूबाज दोस्तांना तो म्हणतो—"शास्त्रीबुवा, खुदाबक्ष, मी आतां मरतों. माझं सांगणं लक्षांत ठेवा. आधीं त्या भगीरथाला सांगा, कीं तळिराम दारू पितां पितां मेला; अखेरपर्यंत प्रेमाच्या पकडींत सांपडला नाहीं."

'पुण्यप्रभाव' नाटकांत वसुंधरा व कालिंदी यांच्या द्वारें उच्च सद्गुणांचा आविष्कार करीत असतांनाच गडकऱ्यांनी नूपुर, कंकण व सुदाम या इरसाल पात्रांच्या तोंडून जगांतील साऱ्या सद्गुणांची व ध्येयांची हेटाळणी करून मानवी मनाच्या विकृतीचा नमुना चव्हाट्यावर मांडला आहे. तोच प्रकार

'एकच प्याला' नाटकांत त्यांनी पुन्हा केला आहे. जगांतील प्रत्येक चांगल्या गोष्टीची हेटाळणी करणारा जगनिंदक तळिराम मनाच्या हळवेपणाचा, प्रेमळपणाचा, भाविक श्रद्धेचा, प्रत्येक उदात्त ध्येयाचा, कटु शब्दांनी दारुण उपहास करतो. त्याचा हा उपहास अत्यंत मर्मभेदक असून आपल्या वृत्ति क्षणभर बधिर करून टाकतो यांत शंकाच नाही. ही दारूबाजाने दारूच्या धुंदींत केलेली बेताल अर्थशून्य बडबड आहे अशा विचाराने त्याच्याकडे दुर्लक्ष करणें जमत नाही. कारण या उपहासाचा डंख हृदयाला जाऊन भिडतो, आणि आत्मपरीक्षणाची आपल्यावर सक्ती करतो. जीवनांतील सारीं मूल्यें उरफाटीं करून टाकणाऱ्या तळिरामाच्या नतद्रष्ट नाठाळ पाखंडीपणाच्या रूपाने गडकऱ्यांनी जीवनाच्या दुसऱ्या भागावरील आवरण काढून घेऊन त्यावर अंतर्भेदी प्रकाशाचा तीव्र झोत टाकला आहे, आणि उच्च सद्‌गुणांचें व उदात्त ध्येयवादाचें निष्ठेनें पूजन करणाऱ्या भाविक श्रद्धेला अंतर्मुख व्हावयास लावलें आहे. जीवनाचें हें अतिशय विदारक असें भाष्य आहे.

## आर्यमदिरामंडळाची कामगिरी

तळिरामाच्या द्वारें गडकऱ्यांनी जें साधलें आहे तेंच आर्यमदिरामंडळाच्या बैठकींच्या द्वारेंहि साधलें आहे. नाट्यरचनेच्या कांटेकोर दृष्टीने पहिलें असतां मंडळाचे हे जवळजवळ एकाआड येणारे प्रवेश आक्षेपार्ह वाटतात हें खरें आहे. परंतु या प्रवेशांच्या द्वारें गडकऱ्यांनी फार मोठी कामगिरी बजावली हें कबूल केलें पाहिजे. एका प्रवेशांत गांभीर्याची व कारुण्याची परमावधि करून लगेच दुसऱ्याच प्रवेशांत बेलगाम हास्य उधळण्याचा हा प्रकार प्रमाणबद्ध नाट्यरचनेच्या कांटेकोर नियमांच्या चाकोरींत बसत नसेलहि. पण गडकऱ्यांनी हा प्रयोग मोठ्या बेडरपणाने करून पाहिला आहे. आणि हा प्रयोग नाट्यात्मक परिणामाच्या दृष्टीने यशस्वीहि झाला आहे हें उघड दिसत आहे. भीषण शोककथेंत स्वैर व अवखळ विनोदाला व हास्याला स्थान नाही असें रससिद्धान्ताचे पुरस्कर्ते आग्रहाने म्हणतील. परंतु विनोदाचें कार्य केवळ मामुली करमणूक करणें एवढेंच आहे असें मानल्यामुळेच सारा घोटाळा होत असतो. करुण नाट्याच्या दर्शनाने होणारा परिणाम आणि विनोदी प्रवेशांचा परिणाम यांच्यामध्ये स्वरूपाचा फार मोठा भेद आहे हें खरें असलें तरी 'एकच प्याल्यां'तील मदिरामंडळाच्या प्रवेशांनी साधलेलें कार्य फार वेगळें आहे. मानवी जीवनांतील व मानवी मनांतील अटळ असलेल्या विसंगतींचा अतिशय मर्मभेदी उपहास करून प्रेक्षकांच्या वृत्ति अंतर्मुख करावयास भाग पाडण्याची कामगिरी या प्रवेशांनी बजावलेली आहे. दुसरें असें की, या प्रवेशांमुळे हास्याचे कल्लोळ उठतात हें खरें असलें तरी जरा जाणीवपूर्वक त्यांचें अवलोकन

केलें तर कांही वेगळाच आशय त्यांत आढळेल. आसन्नमरण तळिरामाच्या उशापायथ्याशीं बसून हे इरसाल दारूबाज कोटयांचे जे फवारे उधळीत आहेत त्यांचें बाह्य रूप विनोदाचें असलें तरी त्यांच्या अंतर्भागीं कारुण्य व भीषणता याच गोष्टी दडलेल्या आहेत असें दिसून येईल. सुधाकराच्या मुलाचा मृत्यु झालेला आहे, सिंधू भयंकर जखमी झालेली आहे, आणि सुधाकर कसलाहि त्रागा करण्याची पूर्ण शक्यता आहे, अशी भयंकर स्थिति असतांना तळिरामाच्या मृत्यूचा प्रसंग गडकऱ्यांनी रंगविला आहे, व त्या प्रवेशांत तळिरामाच्या दारूबाज दोस्तांना स्वैर विनोद करण्याची मुभा दिली आहे. नाटयविषयाशीं हें सारें कमालीचें विसंगत आहे अशी वरवर पाहिल्यास आपली कल्पना होणें शक्य आहे. परंतु या प्रवेशांत वेगळाच अर्थ भरलेला आहे. मृत्यूसारख्या भीषण घटनेने माणसाचें मन हादरतें, तो स्तिमित होतो. पण या प्रवेशांत मृत्यूच्या कल्पनेचीच चेष्टा चाललेली आहे. ही मृत्यूची चेष्टा वरकरणी हास्योत्पादक वाटली तरी वस्तुतः तिच्यांत भीषणताच दडलेली आहे. किंबहुना प्रत्यक्ष मृत्यूचेंच हें अत्यंत विकट व भयानक हास्य आहे असें वाटल्यावाचून राहत नाही. या हास्यामुळे आपली निव्वळ करमणूक होते असें म्हणणें ही शुद्ध फसवणूक आहे. आपण बेचैन होतों, हवालदिल होतों, आपल्या वृत्ति बधिर होतात, आणि मानवी जीवनाच्या अंतिम परिणतीचा विचार मनाला कासावीस करूं लागतो. निराळ्या रीतीने विचार केला तर असें म्हणतां येईल की, भीषण दृश्याच्या दर्शनाने मनांत निर्माण झालेली वेदना विरलेली नाही तोंच विनोदाचा असला अवखळ शिडकावा तिच्यावर झाल्यामुळे मनाचा ताण कमी होण्या-ऐवजीं उलट वाढतोच, आणि वृत्ति अधिकच अंतर्मुख होते. परस्पराशीं अत्यंत विरोधी असलेल्या दोन गोष्टी—कारुण्य आणि हास्य—गडकऱ्यांनी जाणूनबुजून येथे एकमेकांत गुरफटून टाकल्या आहेत. यामुळे निर्माण झालेल्या विचित्र विसंगतीच्या योगें भीषणतेच्या परिणामाची उत्कटता वाढलेलीच आहे.

मुळांत मोहवश असलेल्या सुधाकराला व्यसनांत अधिकाधिक गुरफटून टाकण्यास कारण झालेल्या आर्यमदिरामंडळांतील दारूबाजांचें चित्र रंगवून समाजांत नेहमीच थैमान घालणाऱ्या पशुवृत्तींचें आविष्करण करावें हाच गडकऱ्यांचा हेतु आहे. यांच्यापैकी कांहींमध्ये मुळांतच पशुत्वाचा[६९] अंश

६९. ‘ नरपशु ’ या शब्दानेच शरदने व सुधाकराने तळिरामाचा उल्लेख केला आहे. “ तळिराम, तूं अगदीं नरपशु आहेस ” असें शरद म्हणते ( अंक ३ प्र. ४ ); “ त्या तुझ्या अंगाला तळिरामासारख्या नरपशूनं स्पर्श केला ” असें सुधाकर म्हणतो. ( अंक ४ प्र. २ )

जास्त आहे; आणि माणुसकीचा वीट आल्यामुळे पशुत्वाच्या आहारीं गेलेले कांही आहेत. ज्या पशुवृत्तीचें चित्र मदिरामंडळाच्या द्वारें गडकऱ्यांनी रंगविलें आहे तें खुद्द पशूंना सुद्धा तिरस्करणीय वाटेल असेंच आहे. माणसांचीं रूपें धारण करून हें पशुत्व वावरत असल्यामुळे त्याचा घातकपणा अधिकच वाढला आहे. सिंधूच्या गळ्यांतील मंगळसूत्र तोडण्यास तळिराम तयार होतो तेव्हा याचें प्रत्यंतर आलें आहे. इतर कांही मंडळीमध्ये दांभिकपणा व पाजी संभावितपणा यांचा अर्क सामावलेला आहे; व इतर कांही नुसत्याच दुगाण्या झाडीत संतोषाने जगत आहेत. अशी ही दारूबाजांची मजलस आहे.

पण नेहमी अडखळत बोलणाऱ्या आणि अडखळत चालणाऱ्या या बेवडेबाजांच्या माकडचेष्टांकडे आणि तालेवार बरळण्याकडे दुर्लक्ष करावें असें आपण म्हणूं लागलों तर तें मात्र जमावयाचें नाही. त्यांच्या कोट्यांतील मर्मभेदक उपहासाचे चाबकासारखे फटकारे बसत असतां त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें कसें शक्य आहे ? सामाजिक जीवनांतील अनेक विचित्र विसंगति, आणि मानवी मनांतील विसंगति, यांचें अतिशय विदारक आविष्करण करणारा जलाल उपहास या कोटयांमध्ये कांठोकांठ भरलेला आहे. आपल्याच मनाचें प्रतिबिंब आपणांसमोर दिसत आहे, हा विचार जागृत होतांच माणूस घाबरा होणें स्वाभाविक आहे. सामाजिक जीवनांतील विसंगतींचें विश्लेषण करणाऱ्या सबंध ग्रंथाला जें काम साधावयाचें नाही तें काम दाहक उपहासाने ओथंबलेल्या या बेवडेबाज कोटयांनी साधलें आहे असें म्हणावयास हरकत नाही. "नाट्य-सृष्टीची ही मर्यादा ओलांडून प्रीतिविवाह सत्य सृष्टींत उतरला म्हणजे त्याचे पोरखेळ निम्मे दरानं सुद्धां पहाण्याच्या लायकीचे नसतात;" "एकंदरींतच बघा, स्वतःच्या बायकोकडे पहाण्याची नवऱ्याची नजर इतकी फिरली आहेशी दिसते कीं, आतां परस्त्रीकडे सुद्धां स्वस्त्रीच्या दृष्टींनंच पहाणाराला देखील पुण्यश्लोक म्हणण्याची पाळी येत चालली आहे आणि परस्त्रीच्या ऐवजीं स्वस्त्रीच मातेसमान होत चालली आहे !" "कोटयानकोटी अस्सल आर्यांची कर्तबगारी कारकुनी पेशानं साहेबांच्या भेटीसाठीं बंगल्याबाहेर उभी आहे व बंगल्याच्या आंत पेल्यावर पेले घेण्याच्या कामामुळं सत्ताधारी साहेबांना बाहेर येण्याची फुरसत नाहीं !" "असे कैक पदवीधर हात धरून मी दाखवून देईन कीं, पदवीचा नांवापुरता पोकळ आधार नसता तर त्यांना आपला मूर्खपणा जगापुढें मांडण्याची छाती झाली नसती" हीं तळिरामाचीं सुभाषितें (अंक १ प्र. २) म्हणजे मर्मभेदक उपहासाचा उत्कृष्ट नमुना आहेत. मटण खातां खातां व दारूचे पेल्यावर पेले झोकीत असतां शास्त्रीबुवा सुधारकांची पुढीलप्रमाणें निर्भर्त्सना करीत आहेत. "सुधारणेच्या नांवाखालीं सुधारकांनीं

जो सावळा गोंधळ मांडला आहे, धर्माचा जो उच्छेद मांडला आहे, तो आम्हांला नको आहे ! सुधारणेचं नांव सांगून उद्यां तुम्ही जर अपेयपान करूं लागलांत, अभक्ष्य भक्षण करूं लागलांत, सुधारक म्हणून मांसाहार करूं लागलांत—खुदाबक्ष, आज मटण शिजलं आहे चांगलं, नाहीं ?"—(अंक २ प्र. ३) "असे भांडून सभेंत बखेडा घालूं नका ! ही काय देशांतल्या दोन्ही पक्षांतल्या विद्वानांची सभा आहे, म्हणून तुम्ही असा धिंगाणा घालावा ..... ही आम्हां दारुबाजांची सभा आहे. वर्षातून तीन दिवस चढणारी ही देशभक्तीची निशा नाहीं......तुम्ही देशभक्त आहांत का ? तुम्ही विद्वान आहांत का ? नाहीं ! मग एकेरीवर येऊन सुरळीत सभा मोडण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे ?" हें खुदाबक्षाचें मुक्ताफळ (अंक ५ प्र. २); आणि "हे आंकडे वसूल करण्यांत येतील अशी त्यांनीं भीति मुळीच बाळगूं नये ! आजवर कोणत्या स्मारकसभेनं आंकडे वसूल करून स्मारक केल्याचं कोणाच्या स्मरणांत आहे ? त्यावेळेपुरतंच पहिल्या उसळीच्या भरांत हे दर्शनी आंकडे टाकायचे असतात ! पुढें सर्वांनाच त्या आंकड्यासकट स्मारकाचाही विसर पडत जातो !" हें शास्त्रीबुवांनी स्मारकाच्या वर्गणीला घाबरलेल्या मगनशेठचें केलेलें समाधान (अंक ५ प्र. २.), हीं मंदिरामंडळांत झडणाऱ्या उपरोधपूर्ण कोटयांची केवळ मासल्यासाठी उदाहरणें दिली आहेत. प्रत्येक बेवडेबाज कोटी म्हणजे शुद्ध आसुडाचा फटकारा आहे. वेदना कमी झाली तरी त्याचा वळ मात्र बराच वेळ मागे राहतो !

## गद्य शैलीचें सोज्वळ रूप

'एकच प्याला' नाटकांत गडकऱ्यांच्या शैलीचें एक निराळेंच वळण दिसत आहे. हें वळण नुसतेंच निराळें आहे असें नव्हे. पूर्वीच्या नाटकांतलि काव्यमयतेचा हव्यास, अलंकारप्राचुर्य, चपखल विशेषणें शोधण्याची धडपड, व शब्दयोजनेंतील अतिरेकी चोखंदळपणा, या गोष्टी प्रस्तुत नाटकांत खूपच सौम्य झालेल्या असल्यामुळे शैलींतील पूर्वीचा कृत्रिमपणा बहुतांशीं लुप्त झाला आहे आणि ती स्वाभाविक व सोज्वळ बनली आहे. अर्थात् विषयाच्या स्वरूपाचाहि हा परिणाम असूं शकेल. पण 'प्रेमसंन्यास' हें नाटक संपूर्ण सामाजिक असूनहि त्या नाटकांतील भाषेंत अलंकारांच्या हव्यासाचा अतिरेक झालेला दिसून येईल. 'एकच प्याला' हेंहि सामाजिक नाटक आहे. पण 'प्रेमसंन्यासां'तील अतिरेकी काव्यमयतेला या नाटकांत थारा नाही. गडकऱ्यांनी हें ओळखलें आणि आपल्या शैलीला त्यांनी मोठें आकर्षक रूप प्राप्त करून दिलें.

अंतर्यामींच्या हळव्या भावनांचा उत्कट आविष्कार करणारी अगदी साधी व घरगुती भाषा सिंधूच्या तोंडांत सर्व नाटकभर आलेली आहे. स्त्रीमनाचा अर्क सिंधूच्या प्रत्येक उद्गारांत साठविलेला आहे.[७०]

गद्य शैलीचा दुसरा एक नमुना अंक ४ प्र. ३, अंक ४ प्र. ४, आणि अंक ५ प्र. ४ या प्रवेशांतील सुधाकराच्या भाषणांत दिसेल. सुधाकराच्या या साऱ्याच भाषणांत काव्यमयता खास आहे. पण या काव्यात्मतेंत एक प्रकारची स्तिमित करून टाकणारी भव्यता सामावलेली आहे. भावनांचा उद्रेक अनावर झाल्यामुळे सुधाकराच्या तोंडून स्रवणाऱ्या काव्यांत जीं कल्पनाचित्रें येऊन गेलीं आहेत तींहि अशींच भव्य, व स्तिमित करणारीं आहेत.[७१] या गद्यशैलींत आपोआप साधलेली एक आकर्षक लयबद्धताहि सामावलेली आहे. सुधाकराच्या तोंडचें हें उत्कट काव्य ऐकत असतां उत्तुंग गिरिशिखराचें किंवा खवळलेल्या समुद्रांतील आकाशाला पालाण घालणाऱ्या लाटांचें चित्र डोळ्यांसमोर उभें राहतें. अंक ४ प्र. ४ मधील "अशा वेळीं मी उचंबळून बोलत आहें" या वाक्यापासून सुरू होणारें आणि "तरच या सुधाकराचा दारूंत बुडालेला जीव सप्तपाताळाच्या खालीं असला तरी समाधानाचा एक निश्वास टाकील" या वाक्याने संपणारें सुधाकराचें भाषण काळजीपूर्वक वाचलें असतां मी आता जें विधान केलें त्याची प्रतीति येईल.

---

७०. "आमच्या इथं थट्टेला काळवेळ नाहीं, आणि सुमारहि रहात नाहीं. एक गंगायमुना सांपडायची खोटी, सर्वांसकट वाहून जायची तयारी!" (अंक १ प्र. १)

"माझ्या जिवाला नाहींतर अगदीं टांगल्यासारखं होईल." (अंक १ प्र. ३)

"वन्सं, संभाळा बाई तुमचं रत्न हें! तुमचीं माणसं भारी अचपळ!" (अंक ३ प्र. १)

"इकडची अशी अवस्था झालेली, घरांत हा प्रकार; आतां तर डोळ्यांत तेल घालून सला बसायला पाहिजे!" (अंक ३ प्र. ४)

"अर्ध्या डावावरून लक्ष्मी उठून गेली आणि आपल्या हातांत कवड्या राहिल्या! आपला हातगुण, त्याला कोण काय करणार? दोनप्रहर टळायला तर पाहिजे. ज्यांचे ते बघायला समर्थ का नव्हते? पण देवाघरीं चोरी केलेली; त्यानं असं मनीं योजलं! एरवीं हौस का होती कुणाला?" (अंक ४ प्र. २)

"देव बापडा कुठं तेवढंच ऐकत होता? त्यावेळीं त्याला माझा बाळहट्ट नाहीं पुरवतां आला, आतां सटवीच्या फेऱ्यांत सांपडून पुन्हा बाळपण लाभलं आणि दळण्याची हौस फिटली!" (अंक ४ प्र. ५)

७१. यांपैकी कांहीं कल्पनाचित्रांचें विवेचन मागे केलें आहे. पृष्ठें २७९–२८१ पाहावीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ८५८८८ दि. १०.७.५५
क्रमांक ............ नोंद दि. २४।१।५७



निर्वाणीच्या निराशेत भावनांचा उद्रेक प्रकर्षाला पोचल्यामुळे सुधाकराच्या तोंडून भव्य व उत्तुंग प्रतिमानांनी ओसंडणारें उत्कट काव्य स्फुरलें आहे. परंतु मनाची व विवेकाची थोडी स्थिरता असतांना, अथवा अंतर्मुख होऊन आत्मनिरीक्षण करीत असतां, सुधाकर आपल्या भावनांचें अतिशय सोज्वळ व हृद्य आविष्करण करतो. कोणतेंहि काव्यात्म प्रतिमान न वापरतांहि शैली किती सोज्वळ व आकर्षक करतां येते याचे दोन सुंदर नमुने आहेत.

" ज्या तुझ्या बापाच्या घरीं रोज सदावर्त चालावीं त्या तुला घासभर अन्नाला अशी महाग केली, कीं गीतेसारख्या मुलीनं तुझ्यावर दया करावी आणि तुला सहस्रभोजनाचा रस्ता दाखवावा! लहानपणीं बाहुलाबाहुलीच्या लग्नांत चिमुकला अंतरपाट धरण्यासाठीं तूं बेदरकारपणानं पैठणीच्या धांदोट्या केल्या असशील, त्या तुला आज फाटक्या कपड्यांमुळं बाहेर जाण्याची पंचाईत पडावी! तुझ्या बापाच्या घरीं खेळतां खेळतां ओंजळीच्या वैरणीनं तूं जात्यांत मोतीं भरडले असतेस तरी कुणाला त्याचं कांहीं वाटलं नसतं! त्या तुझी मीं अशी दशा करून टाकली कीं, पोटासाठीं आंसवांचीं मोतीं वेरून तुला मोलाचं दळण करणं भाग पडावं!" ( अंक ४ प्र. २ )

दुसरें इतकेंच सुंदर उदाहरण अंक ४ प्र. ३ च्या सुरवातीला आहे. सुधाकराच्या या स्वगतांत अपराधी मनाचा भितरा ओशाळेपणा अतिशय परिणामकारक रीतीने प्रकट झालेला दिसेल.

" काय चमत्कारिक माझी स्थिति झाली आहे! लहानपणापासून या बागेची शोभा माझ्या पुऱ्या ओळखीची; पण आज तिच्याकडे नव्यानं पाहिल्यासारखं वाटतं. सुंदर परंतु निर्दोष वस्तूकडे पतित मनाला ओशाळेपणामुळं उघड्या डोळ्यांनीं पाहण्याचा धीर होत नाहीं! .......या बागेकडेच काय पण एकंदर जगाकडेच पाहतांना माझ्या दृष्टींतला हा भितरा ओशाळेपणा कमी होत नाहीं. दारूसारख्या हलक्या वस्तूच्या नादानें ज्या सोज्ज्वळ समाजांतून, प्रतिष्ठित परिस्थितींतून, बरोबरीच्या माणसांतून, अगदीं माणसांतूनच मी उठलों त्या जगांत काळं तोंड पुन्हा घेऊन जातांना मला चोरट्यासारखं होत आहे. या सुंदर जगांत माझी जागा पुन्हा मिळेल का?.......अजून दारूच्या धुंदीनें अंधुक असलेल्या माझ्या दृष्टीला माझी हरवलेली जागा हुडकून काढतां येईल का?"

' प्रेमसंन्यासा 'तील कल्पनाचित्रांनी ओसंडून वाहणारी भाषा, किंवा ' राजसंन्यासा 'तील पराकाष्ठेची अनुप्रासप्रचुर व लयबद्ध भाषा लिहिणाऱ्या गडकऱ्यांचाच हा उतारा आहे कीं काय अशी शंका यावी इतकी त्यांच्यांतील शैली अकृत्रिम व सोज्वळ आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क.

आर्यमंदिरामंडळांत कोट्यांची अक्षरशः श्रावणझड लागलेली आहे. या कोट्यांत छद्मी उपहासाच्या साऱ्या तऱ्हा आढळतील. इतक्या धारदार कोट्या मराठींत अन्यत्र सापडणें फार कठिण आहे.

## अनुप्रासाच्या हव्यासाची सौम्यता

अनुप्रासाचा हव्यास 'राजसंन्यासां'त अतिरेकाच्या परिसीमेला पोंचलेला दिसून येईल. 'एकच प्याल्यां'त हा हव्यास किती तरी सौम्य झाला आहे. तरी सुद्धा मधून मधून आपला प्रभाव दाखविल्यावाचून तो राहत नाही. "... पदवीचा वेध लागण्याबरोबर मुलाला मतं आणखी मिशा फुटूं लागतात. मताच्या मंडपावर मूर्खपणाला मनमोकळेपणानं मिरास मिळते, आणि मिशांचा मोर्चा आंकड्यांच्यावळणावळणानं पोरीबाळींच्या प्रेमांकडं वळतो." (अंक १ प्र. २); "चौदा चौकड्यांच्या राज्यांत राहून रौरवाची राणी होण्यापेक्षा दुर्दैवाची दासी होऊन दुःखांत दिवस कंठीन;" "दैवाच्या दैवतापासून या दीन दासीला दूर लोटूं नका!" (अंक ३ प्र. ४) "पंचपतिव्रतांनी पुण्य-संपादनासाठीं प्रत्यही तुझी पूजा करावी अशी तुझी पावित्र योग्यता!" (अंक ४ प्र. २) "कवडी किंमतींच्या कंगालांनीं माझी पैजारांनीं पायमल्ली केली ......बेवकूब बाप – नालायक नवरा–मातीमोलाचा मनुष्य – दीडदमडीचा दारूबाज......" (अंक ४ प्र. ३); "मुलासकट माणुसकीला, सिंधूसकट संसाराला, सद्‌गुणांसकट सुखाला, जगासकट जगदीश्वराला सुधाकराचा हा निर्वाणीच्या निराशेंतला शेवटचा प्रणाम!" (अंक ४ प्र. ३) "तुझ्या जुलमी जादूनं जडावलेल्या जनावराला सुद्धा कळतं कीं......" (अंक ४ प्र. ४); अनुप्रासामुळे साधलेल्या आकर्षक लयबद्धतेचें एक उत्कृष्ट उदाहरण अंक ४ प्र. ४ मध्ये आहे. "बेवारशी बायकांची बेअब्रू, बेशरम बाजारबसव्यांची बदचाल, बेकार बेरडांची बदमाषी, बेचिराख बादशाहाती, जिवलग मित्रांच्या मारामाऱ्या, दगलबाजी, खून––"

वर अनुप्रासाचीं जीं उदाहरणें दिलीं आहेत तेवढींच सबंध नाटकांतील डोळ्यांत भरण्यासारखीं महत्त्वाचीं उदाहरणें होत. गडकऱ्यांच्या पहिल्या तीन नाटकांतील अनुप्रासाच्या हव्यासाच्या मानाने हें सारें अगदीच सौम्य भासेल.

# गडकऱ्यांच्या नाटकांवरील वाङ्मय

## १

## पुस्तकें

अधिकारी, गो. गो. — ' गडकरी यांच्या आठवणी ' ( १९२८ )
अळतेकर, म. मा. — ' शोककारण आणि मराठी शोकांतिका ' ( १९५२ )
कुलकर्णी, वा. ल. — ' मतें आणि मतभेद '
खांडेकर, वि. स. — ( १ ) ' मराठीचा नाट्यसंसार '
( २ ) ' गडकरी (व्यक्ति व वाङ्मय)' द्वितीयावृत्ति, (१९४९)
घारपुरे, वा. ह. — ' भावबंधन नाटकावरील टीका ' ( १९२७ )
दांडेकर, वि. पां. — ' मराठी नाट्यसृष्टि ' ( सामाजिक नाटकें )
देशपांडे, अ. ना. — ' आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास,' भाग पहिला.
देसाई, वसंत शांताराम — ' नट, नाटक आणि नाटककार '
फडके, ना. सी. — ' किर्लोस्कर, देवल, गडकरी ' ( १९५० )
फडके, र. कृ. — ' नाट्यपरामर्ष ' ( १९४७ )
भावे, शि. गो. — ' गडकऱ्यांचा विनोद ' ( १९२६ )
वरेरकर, भा. वि. — ' माझा नाटकी संसार,' खंड दुसरा.
वाळिंबे, रा. शं. — ' सुधाकर कीं एकच प्याला ?' ( १९४६ )
क्षीरसागर, श्री. के. — ' एकच प्याला ' सातव्या आवृत्तीची प्रस्तावना (१९४६)

*

अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक — ( प्रथमखण्ड, १९३१ ), श्री. वि. स. खांडेकर यांचा गडकऱ्यांवरील लेख.
दीनानाथ स्मृतिदर्शन — ( संपादिका, कु. लता मंगेशकर, १९५० )

## २

## नियतकालिकांतील लेख

उपासनी, म. रा. — ' गडकऱ्यांच्या नाटकांतील नाट्यदृष्ट्या श्रेष्ठ नाटक ',— ' प्रतिभा ', फेब्रुवारी १९३३.
' एक वाचक ' — ' पुण्यप्रभाव–दुसरी बाजू ',—' नवयुग ', ऑगस्ट १९१७.
कमतनूरकर, न. ग. — ' गडकऱ्यांच्या उपेक्षित मानसकन्या ',—' समीक्षक ', फेब्रुवारी १९४४.

**काळे, चिं. य.** — 'आमची सामाजिक सुधारणा व रंगभूमि ',— ' रत्नाकर ', सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर १९२७. डिसेंबर १९२७ च्या अंकांत ' प्रेमसंन्यासा 'चें विवेचन.

**कुलकर्णी, कृ. पां.** — ' तरुणांचे आवडते वाङ्मयकार गडकरी ',— ' समीक्षक ', फेब्रुवारी १९४४.

**' कोणीतरी '** — ' टीकाकारांची सिंधु व सिंधूचे टीकाकार ' — ' रत्नाकर ' फेब्रुवारी १९३१.

**खांडेकर, वि. स.** — ( १ ) ' गडकऱ्यांचीं नाटकें ',— ' यशवंत ' अंक १९.
( २ ) ' कोल्हटकर, खाडिलकर व गडकरी '— ' साहित्य ' ( नाट्यमहोत्सव अंक ), डिसेंबर १९४८.

**गुर्जर, वि. सि.** — ( १ ) ' अकाल सूर्यास्त ',— ' मनोरंजन ', फेब्रुवारी १९१९.
( २ ) ' आमचे मास्तर ',— ' समीक्षक ', फेब्रुवारी १९४४.

**टिळक, वि. सि.** — ' पुण्यप्रभावांतील नाट्यविषय ', — ' रत्नाकर ', मार्च-एप्रिल १९३१.

**टेंबे, गो. स.** — ' महाराष्ट्राचे अजरामर नाटककार '— ' समीक्षक ' फेब्रुवारी १९४४

**ताटके, वा. कृ.** — ' सिंधूची कैफियत,'—'रत्नाकर,' फेब्रुवारी १९४८.

**दांडेकर, वि. पा.** — ' नाटककार गडकरी,'— ' समीक्षक,' फेब्रुवारी १९४४

**देशपांडे, वाग्भट नारायण** —' गल्या २५ वर्षांतील नाटकें, त्यांचे गुणदोष, व सुधारणेच्या दिशा,'— ' विविधज्ञानविस्तार ,' ऑक्टोबर १९१५. पृ. ३८९ वर ' प्रेमसंन्यासा' च्या दुःखद अंताचें विवेचन.

**देसाई, वसंत शांताराम** — ( १ ) ' गडकऱ्यांच्या नाटकांतील विशेष,'— ' रत्नाकर,' जानेवारी १९३१
( २ ) ' रामलालचं कारटं,' – ' समीक्षक,' फेब्रुवारी १९४४

**पाटणकर, भा. ल.** — ' गडकऱ्यांची स्त्रीसृष्टि,'—'समीक्षक,' फेब्रुवारी १९४४

**पांडे, बा. ना.** — ' गडकऱ्यांचा वृंदावन,'– ' रंगभूमि,' ( तीन लेखांक ), जानेवारी, फेब्रुवारी, मार्च १९२८

**पुरोहित, वा. श्री.** — ' मरणोत्तर गडकरी,'–' समीक्षक,' फेब्रुवारी १९४४

**फडके, ना. सी.** — ( १ ) ' गडकऱ्यांची कालिंदी,'— ' रत्नाकर,' एप्रिल १९२९
( २ ) ' गडकऱ्यांचे दुर्जन,'–' रत्नाकर ,' जून १९२७
( ३ ) ' एकच प्याला,'–' मनोरंजन,' सप्टेंबर १९१९

फडके, र. कृ. — ( १ ) 'मालतीचें व्याख्यान अथवा सिंधूचें आख्यान,'— 'रत्नाकर,' ऑक्टोबर–नोव्हेंबर १९३१

( २ ) ' नाट्यचमत्कार,'—' रत्नाकर,' जानेवारी १९३१

( ३ ) ' कालिंदीची भ्रामक रमणीयता ', — ' रत्नाकर ', जून १९२९.

( ४ ) 'गुणगौरवाचा अतिक्रम ',–रत्नाकर,' फेब्रुवारी १९३१.

बनहट्टी, श्री. ना. — ' त्राटिका व भावबंधन ',—' रत्नाकर ', नोव्हेंबर १९२८.

मंगळमूर्ति, दामोदर — ' पुण्यप्रभाव ',—' नवयुग ', मे १९१७.

माटे, श्री. म. — ' गडकरी यांची प्रमत्त प्रतिभा ',—' समीक्षक ' फेब्रुवारी १९४४

' रामशास्त्री ' — ( १ ) ' प्रतिभेच्या न्यायमंदिरांत ',—' प्रतिभा ', ९ ऑगस्ट १९३५. गडकऱ्यांनी श्री. कृ. कोल्हटकर यांचें शिष्यत्व पतकरलें याची कारणमीमांसा.

( २ ) ' प्रतिभेच्या न्यायमंदिरांत ',—' प्रतिभा ' १५ मार्च १९३५. श्री. कृ. कोल्हटकर यांचें भावबंधनांतील विनोदा-विषयींचें विवेचन.

लेले, पु. रा. -- ' तपस्वी गडकरी ',—' समीक्षक ', फेब्रुवारी १९४४.

साठे, के. वि. -- ' पुण्यप्रभावांतील नायकनायिका ',–' समीक्षक ', फेब्रुवारी १९४४.

क्षीरसागर, श्री. के. -- ' गडकरी आणि महाराष्ट्रीय सौंदर्य ',—' समीक्षक ', फेब्रुवारी १९४४.

( नियतकालिकांतील लेखांची ही यादी परिपूर्ण नाही. )

REFBK-0009300

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

6300

## डॉ. रा. शं. वाळिंबे

### यांचे टीकात्मक प्रबंध

साहित्याचा ध्रुवतारा

सुधाकर कीं एकच प्याला ?

वाङ्मयीन टीका

मुक्तात्म्यापासून प्रमद्वरेपर्यंत

बालकवि

साहित्यांतील संप्रदाय

गडकऱ्यांचें अंतरंग

ज्ञानेश्वरींतील विदग्ध रसवृत्ति

साहित्यमीमांसा

नाटककार गडकरी

### संपादित

मुद्राराक्षसम् । ( इंग्रजी )

अभिज्ञानशाकुन्तलम् । ( मराठी )

वेणीसंहारम् । ( मराठी )

• • •

# नाटककार गडकरी

लेखक—डॉ. रा. शं. वाळिंबे,
एम्. ए., पीएच्. डी.

प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, राजसंन्यास, एकच प्याला, भावबंधन, या पांच नाटकांचें नाट्यदृष्ट्या व साहित्यदृष्ट्या विस्तृत विवेचन करणारा बहुमोल ग्रंथ.

पृष्ठें डेमी ४२५ : किंमत १० रुपये

◆

' नाटककार गडकरी ' या ग्रंथांतील पांच प्रकरणांपैकी प्रत्येक प्रकरण विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी स्वतंत्र पुस्तकाच्या रूपाने छापलें आहे.

| | | | | रु. नवे पैसे |
|---|---|---|---|---|
| **प्रेमसंन्यास** | (पृ. ८४) | ... | ... | २·५० |
| **पुण्यप्रभाव** | (पृ. १०४) | ... | ... | ३·०० |
| **राजसंन्यास** | (पृ. ३२) | ... | ... | १·०० |
| **एकच प्याला** | (पृ. १०२) | ... | ... | ३·०० |
| **भावबंधन** | (पृ. ९०) | ... | ... | ३·०० |

***मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन,***

**टिळकरस्ता, पुणें २.**